CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, १४ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३९ वे अंक २८५ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**!! जाहीर सूचना !!**

सोलापूर तरुण भारत जाहिराती तसेच सर्व विभागांसाठी ऑनलाईन रिसीट ॲप वापरण्यास सुरुवात केली आहे. ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा, कोणतेही पैसे जमा करताना ऑनलाईन रिसीटची मागणी करावी. ऑनलाईन रिसीट शेअर करण्याची देखील सोय केली आहे. आमच्या प्रतिनिधीकडून याची माहिती घ्यावी. ऑनलाईन रिसीटची मागणी हक्काने करावी.

सहकार्याबद्दल धन्यवाद.




## ▶▶ महत्त्वाचे...

### राकाँ पक्ष, चिन्हावरील सुनावणी लांबणीवर

**नवी दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नाव आणि चिन्ह तसेच राकाँचे नागालँडमधील आमदार अपात्रता ही प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी एकत्र करण्यात आली आहेत. हे प्रकरण मंगळवारच्या वेळापत्रकात न्यायालयात सुनावणीला होते. मात्र, वेळेअभावी ते सुनावणीपर्यंत येऊ शकले नाही. आता या याचिकेवर सुनावणी पुढच्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे.

### जीएसटी परिषदेची बैठक ९ सप्टेंबरला

**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांच्या अध्यक्षतेखाली वस्तू व सेवा कर अर्थात् जीएसटी परिषदेची ५४ वी बैठक ९ सप्टेंबर रोजी होणार आहे, अशी माहिती परिषदेने मंगळवारी एक्सवर पोस्ट करीत दिली. जीएसटी परिषदेत केंद्र आणि राज्यातील अर्थमंत्र्यांचा समावेश आहे आणि १ जुलै २०१७ मध्ये आणल्या गेलेल्या वस्तू व सेवा कराबाबत निर्णय घेणारी ही सर्वोच्च परिषद आहे.

# नगराध्यक्षांचा कालावधी आता पाच वर्षांचा

## राज्य मंत्रिमंडळाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**वृत्तसंस्था, मुंबई, १३ ऑगस्ट**

राज्यातील निवडून आलेल्या नगरपंचायत नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी पाच वर्षे करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. राज्यातील नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका २०२१-२२ मध्ये झाल्या असून, त्याचा कालावधी अडीच वर्षांचा आहे. तो आता संपत असल्यामुळे हा कालावधी पाच वर्षांचा करण्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येईल.

### सहा हजार किमी रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण

सुधारित हायब्रिड ॲन्युईटी योजनेत राज्यातील सहा हजार किमी रस्ते डांबरीकरण करण्यात येणार होते. मात्र, त्याऐवजी या रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्यासाठी मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत ३६,९६४ कोटी खर्चास सुधारित मान्यता देण्यात आली. डांबरीकरणासाठी यापूर्वी दिलेल्या मान्यतेनुसार २८,५०० कोटी खर्च अपेक्षित होता. या नव्या निर्णयामुळे सुधारित हायब्रिड ॲन्युईटी योजनेत शासनाच्या सहभागाची रक्कम २,५८९ कोटी इतकी वाढली असून, एकूण शासन सहभागाची रक्कम ११ हजार ८९ कोटीस मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या सहभागाची रक्कम ५,८७५ कोटी इतकी वाढली आहे. हे सहा हजार किमीचे रस्ते महामंडळाला १७.५ वर्षे कालावधीसाठी हस्तांतरित करण्यात येणार आहेत.

# विदर्भ, मराठवाड्यात दुग्ध विकासासाठी १४९ कोटी

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी

**वृत्तसंस्था**
**मुंबई, १३ ऑगस्ट**

विदर्भ आणि मराठवाड्यातील १९ जिल्ह्यांमध्ये दुग्ध विकासाला गती देण्यासाठी दुग्धविकास प्रकल्पाचा टप्पा-२ राबविण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यासाठी १४९ कोटीच्या निधीला मंजुरी देण्यात आली.

प्रकल्पाची एकूण किंमत ३२८ कोटी ४२ लाख इतकी असून, यापैकी १७९ कोटी १६ लाख इतका हिस्सा शेतकरी आणि पशुपालकांचा आहे. राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर्स करण्यात शेती व शेतीपूरक व्यवसायांचा समावेश असून, यात दुग्ध व्यवसायाचा वाटा आहे. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. विदर्भ आणि मराठवाड्यातील नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, वर्धा, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम, गडचिरोली, अमरावती, अकोला, छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली, जालना, नांदेड, लातूर, धाराशिव आणि परभणी या जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प २०२६-२७ पर्यंत राबविण्यात येईल. यापूर्वी २०१६ मध्ये हा प्रकल्प विदर्भ व मराठवाड्यातील ११ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आला होता.

या प्रकल्पात गोठीत रेतमात्रांचा वापर करून कृत्रिम रेतनाची व्यवस्था तसेच भ्रूण प्रत्यारोपण करून दुधाळ जनावरांची संख्या वाढविणे, शेतकऱ्यांना वैरण विकास कार्यक्रम, संतुलित आहार आणि दर्जेदार चारा पुरवठा करणे, पशु आरोग्य सुविधा पुरविणे, उच्च दूध उत्पादन क्षमता असलेल्या गाई-म्हशींचे वाटप करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून रोजगार निर्मिती करणे आदींचा समावेश आहे. येत्या तीन वर्षांच्या कालावधीत या १९ जिल्ह्यांत १३ हजार ४०० दुधाळ गाई आणि म्हशींचे वाटप करण्यात येईल. या प्रकल्पाचे मुख्यालय नागपूर येथे राहणार आहे. असून, जिल्हा प्रकल्प अधिकारी याची अंमलबजावणी करणार आहेत.

# अतुल कुलकर्णी सोलापूरचे नूतन पोलीस अधीक्षक

## अधिक्षक सरदेशपांडे यांची पुण्याला बदली

## राज्यातील २९ वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१३ ऑगस्ट:**

महाराष्ट्र पोलीस दलातील २९ अधीक्षक/उपायुक्त व अप्पर अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये धाराशिवचे जिल्हा पोलीस प्रमुख अतुल कुलकर्णी यांची सोलापूर जिल्हा ग्रामीण पोलिस अधिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर अधिक्षक शिरीष सरदेशपांडे यांची पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिक्षकपदी बदली करण्यात आली आहे.

गृह विभागाच्या वतीने मंगळवारी बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य सरकारला १५ ऑगस्ट पूर्वी आयोगाच्या निकषात बसणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे आदेश दिले आहेत त्यानुसार गेल्या आठवड्याभरापासून राज्यातील विविध विभागातील बदल्यांचे सत्र सुरू आहे.

पोलीस दलातील बदल्याबाबत प्रचंड उत्सुकता लागून राहिलेली होती. त्यामुळे या बदल्या टप्प्याटप्प्याने केल्या जात आहेत आज गृह विभागाने १८ पोलीस अधीक्षक उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या असून आहेत. तर ११ अप्पर अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. त्यामध्ये गेल्या दोन वर्षापासून धाराशिव जिल्ह्याचे पोलीस प्रमुख म्हणून काम पाहत असलेल्या अतुल कुलकर्णी यांची सोलापूर ग्रामीण अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ते येत्या काही दिवसात पदभार स्वीकारण्याचे शक्यता वर्तविण्यात आली.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### श्रावणीनिमित्त लोकसेवा विद्यामंदिरची दिंडी

**मंद्रुप, दि. १३ ऑगस्ट-**

दुसऱ्या श्रावण सोमवारनिमित्त मंद्रुपमधील लोकसेवा विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हुतात्मा चौकापासून मुख्य रस्त्यावरून महात्मा बसवेश्वर चौकामार्गे मल्लिकार्जून मंदिरापर्यंत मल्लिकार्जून देवाच्या पालखीसह दिंडी काढली. यावेळी शंकर पार्वतीच्या वेशभूषेतील विद्यार्थी सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. प्रारंभी माजी सभापती व संस्थेचे सचिव गुरुसिध्द म्हेत्रे यांच्या हस्ते पालखीची पूजा करून दिंडीस सुरूवात करण्यात आली. यावेळी लेझीम, टिपरी, झांज नृत्यावर विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य केले. यावेळी अनेक विद्यार्थिनींनी जलकुंभ घेऊन दिंडीची शोभा वाढविली. बालचिमुकल्या विद्यार्थ्यांनी एका हातावर नंदीध्वज घेत कसरत दाखविली. गावात ठिकठिकाणी दिंडीतील पालखीचे पूजन करून स्वागत करण्यात आले. मल्लिकार्जून मंदिर येथे दिंडीचा समारोप करण्यात आला. यावेळी सहसचिव पिरप्पा म्हेत्रे, प्राचार्य बसवराज कुमठेकर, पर्यवेक्षक मदगोंडा मलकारी, बसप्पा घाटे, सतीश मेंडगुदले, विश्वनाथ मेंडगुदले, नागनाथ म्हेत्रे, श्रीधर लोभे, राजकुमार कुंभार, नागनाथ कुंभार आदी उपस्थित होते.



### विंचूरच्या माणिक जोकारे यांचा सेवापूर्तीनिमित्त सन्मान

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

श्री पंचाक्षरी विद्यामंदिर विंचूर प्रशालेच्या इयत्ता दहावी शैक्षणिक वर्ष १९९९- २००० बॅचच्यावतीने माणिक जोकारे यांचा सेवापूर्ती सन्मान करण्यात आला. तसेच श्री सच्चिदानंद लाळसंगी चार विषयांमध्ये सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल, नरेंद्र स्वामी मुंबईला शिक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल, विष्णू साबळे यांची प्राध्यापक पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राध्यापक रवींद्र नवले, सिद्धाराम गायकवाड, सुनील कोळी, संदीप बिराजदार, अविनाश फडतरे, विलास राजमाने, गौतम साबळे, व्हनाप्पा शिंगे, अंबिका बिराजदार, सुनंदा परीट, परमेश्वर बिराजदार, नागनाथ फुलारी, नवनाथ कोळी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धाराम गायकवाड यांनी केले. रवी नवले यांनी आभार केले.



### रोहिणी चौधरी यांना सुमतीबाई गोरे ट्रस्टचा उपक्रमशील राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

सुमतीबाई गोरे ट्रस्ट यांच्यातर्फे चार वर्षापासून महाराष्ट्रातील उपक्रम शिक्षकांना पुरस्कार देऊन गौरविले जाते. यंदा नूतन मराठी विद्यालय या शाळेतील सहशिक्षिका रोहिणी चौधरी यांची या पुरस्कारासाठी निवड झाली. रविवार दिनांक ११ ऑगस्ट रोजी झिरो एनर्जी शाळेचे श्री दत्तात्रय वारे आणि प्रसिद्ध लेखिका इंदुमती जोंधळे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण पार पडले स्मृतिचिन्ह सन्मानपत्र २१ पुस्तकाचा संच शाल व बुके देऊन सौ चौधरी यांचा सत्कार करण्यात आला राज्यस्तरीय उपक्रमशील शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका वर्षा जेधे व सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले.

## निधन वार्ता

### भिमराव केदार



**सांगोला :** वासूद (अकोला) ता.सांगोला येथील माजी सैनिक भिमराव बापू केदार (वय-९२) यांचे सोमवार दि.१२ ऑगस्ट रोजी राहत्या घरी निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### चारुशीला पवार



**पिलीव :** पिलीव (ता. माळशिरस) येथील जवाहरलाल शेतकी विद्यालयाच्या फाऊंडर शिक्षिका चारुशिला गोविंदराव पवार (वय ८१) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांनी काही काळ रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय येथेही शिक्षिका म्हणून काम केले होते.

### धन्यवाद दुधगुंडी



**सोलापूर :** साखर पेठ येथील रहिवासी धन्यवाद दत्तात्रय दुधगुंडी (वय ७६) यांचे सोमवारी दुपारी निधन झाले. मंगळवारी सकाळी त्यांचा अंत्यविधी झाला. त्यांच्या मागे पत्नी तीन मुले सुना नातू असा परिवार आहे

# श्रीपूरच्या 'कर्मयोगी'ला देश पातळीवरील प्रथम पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १३ ऑगस्ट-**



नवी दिल्ली येथे नॅशनल शुगर फेडरेशनच्या वतीने श्रीपूर येथिल सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यास तांत्रिक कार्यक्षमतेचा प्रथम पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. पुरस्काराचे वितरण देशाचे सहकार राज्यमंत्री कृष्ण पाल व चौधरी लक्ष्मीनारायण सिंह- सहकार मंत्री उत्तर प्रदेश, आणि नॅशनल फेडरेशन कॉपरेटिव शुगर फॅक्टरी लि. नवी दिल्लीचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

पुरस्कार कारखान्याचे व्हा चेअरमन कैलास खुळे, सर्व संचालक, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी व अधिकारी यांनी स्वीकारला. कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यास पुरस्कर देताना २०२३-२४ मध्ये गाळप क्षमतेचा पुरेपूर वापर, स्टीमची बचत, कारखाना बंदचे अत्यल्प प्रमाण, बगॅसची बचत, जास्तीची वीज निर्मिती जास्तीचा साखर उतारा याशिवाय अन्य तांत्रिक गोष्टी या बाबींचा समावेश करण्यात आला. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघ लिमिटेड नवी दिल्ली यांच्याकडून मिळालेला पुरस्कार स्वीकारण्यासाठी कारखान्याचे व्हा.चेअरमन कैलास खुळे, दिनकर मोरे, दाजी पाटील, तानाजी वाघमोडे, बाळासाहेब यलमार, भगवानराव चौगुले, भास्कर कसगावडे, लक्ष्मण धनवडे, गंगामामा विभुते, सुदाम मोरे, विजय जाधव, हनुमंत कदम, दिलीप गुरव, शामराव साळुंखे, राणू पाटील, मुख्य अभियंता अमोल बारटक्के , मुख्य शेती अधिकारी कुमठेकर, मुख्य लेखापाल रविंद्र काकडे, तानाजी भोसले, सचिन विभूते उपस्थित होते. सन २०२४-२५ साठीच्या गळीत हंगामाची तयारी अंतिम टप्यात असून १० हजार प्रतिदिन गाळप होणार आहे. गळीत हंगाम शेवटच्या टप्प्यात येतो तेव्हा ऊस तोडणी मजूरांचा त्रास चालु होते हे टाळण्या साठी कारखान्याने पाच आधुनिक ऊस तोडणी यंत्र खरेदी केली आहेत. यावेळी ११ हजार हेक्टर ऊस क्षेत्र नोंदवले गेले असल्याची माहिती कार्यकारी संचालक डॉ यशवंत कुलकर्णी यांनी दिली.

**सामुहिक प्रयत्नांमुळे हे यश**

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक यांनी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सर्व संचालक व व्यवस्थापन काम करीत आहे तसेच कारखान्यावर निष्ठा ठेवून ऊस पुरवठा करणारे शेतकरी सभासद यांच्या सहकार्याने कारखानाना उत्तरोत्तर प्रगती करत आहे. या सर्वांच्या सामुहिक प्रयत्नांचे फळ म्हणजे आज देशपातळीवरील प्रथम पुरस्कार असल्याची भावना चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी व्यक्त केली.

## श्रावणमास प्रवचनमाला - ८

# गुरुसेवेत अनुकूल झालेली बुध्दी सद्गुरुंचे दर्शन घडवते

**● डॉ. जयवंत बोधले महाराज ●**



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ ऑगस्ट-**

गुरुसेवेतील तन्मयता माणसाला ईशकृपेपर्यंत घेऊन जाते. हे संत एकनाथांच्या चरित्रातून उघड दिसून येत आहे. निरंतर गुरुसेवेशी गुंतलेले मन संसारातील इतर गोष्टींना जागा देत नाही. श्रद्धेय डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले आठव्या सत्रात निरुपण करतात, नाथबाबा स्त्री-पुत्र, धन विसरुन गेले आहेत.

*गुरुसेवेसी गुंतले मन।*
*विसरला स्त्री पुत्र धन।*
*विसरला मनाची आठवण। मी कौण हे स्फुरेना।।*

नाथ महाराज गुरुसेवेत स्वतःलाही विसरुन गेले. नाथांच्या सेवेतील तत्परता पाहून जनार्दन स्वामींनी एका हिशोबाची जबाबदारी सोपवली. बिनचूक चालत असलेला हिशोब एके दिवशी काही केल्या जुळेना. त्या हिशोबाचं चक्र सातत्याने त्यांच्या डोक्यात चालू होते. पुष्कळ वेळा पडताळणी केली. अखेरीस रात्री २ वाजता हिशोब लागला. त्या आनंदात नाथबाबा टाळी वाजवतात. त्याचा आवाज जनार्दन स्वामी ऐकतात; रात्री अचानक टाळी वाजवत आहेस..... म्हटल्यावर नाथबाबा सांगतात, तो हिशोब जुळला गुरुजी! कौतुकाने स्वामी गहिवरुन गेले.

*वय अल्प प्रज्ञा थोर। तत्त्व शोधूनी सादर।*
*आता कळला हा निर्धार।*

लहान वय; प्रगल्भ बुध्दी नाथांच्या जीवनाला कलाटणी देत होती. गुरुसेवेत अनुकूल झालेली बुध्दी सद्गुरुंचे दर्शन घडवते, असे डॉ.श्रीगुरु जयवंत महाराज सांगतात. शिष्याची सेवा आणि गुरुंची कृपा यामध्ये ज्या घटना घडत असतात, त्यास अनुकूल बुध्दी असे म्हणतात.

पर्वतावर निर्जन स्थळी स्वामी ध्यानासाठी जाताना एके दिवशी ते नाथांना सोबत घेऊन जातात. त्या ठिकाणी एक गरीब फकीर येतो. स्वामीजी व फकीर दोघांमध्ये संवाद चालू होता. तिथे एक कुत्री येते. तिचे दूध काढून पिठात मिसळून प्रसाद म्हणून दोघेही खातात.



## माढ्यात ९१ जणांचे रक्तदान

**माढा, दि. १३ ऑगस्ट-**

माढ्यातील होतकरू विद्यार्थी स्व. संग्राम उर्फ मुन्ना कदम याच्या स्मृतीदिनानिमित्त स्व. संग्राम कदम प्रतिष्ठानच्या वतीने घेतलेल्या शिबिरात ९१ जणांनी रक्तदान केले. माढ्यातील माऊली हॉस्पिटल येथे झालेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य झुंजार भांगे, नगरसेवक आजिनाथ माळी, राष्ट्रवादी माढा शहराध्यक्ष दत्तात्रय अंबुरे, डॉ. सुभाष पाटील, समाधान राऊत, माणकोजी भुसारे, बाळू कदम उपस्थित होते. महात्मा बसवेश्वर ब्लड बँकेने रक्त संकलन केले. सूत्रसंचालन डॉ. आकाश देवकुळे यांनी तर आभार यशवंत आंबुरे यांनी मानले. कार्यक्रमासाठी आशिष गुंडाळ, शिवरत्न कदम, रोहन साठे, सूरज साठे, रोहित साठे, कृष्णा माळी, ओंकार पाटील, संदेश कदम, प्रीतम आंबुरे, प्रमोद कदम यांच्यासह प्रतिष्ठानच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

## संपात सहभागी न होण्याचा महासंघाचा निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १४ ऑगस्ट-**

अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ सोलापूर जिल्हयाच्यावतीने जिल्हा पुरवठा अधिकारी यांना निवेदन देऊन कळविले आहे की १५ ऑगस्ट पासून ज्या काही संघटनांकडून संप सुरू करणार आहेत त्यांना आमचा कोणताही पाठिंबा नाही किंवा त्या संपात आम्ही सहभागी होणार नाही, अशी माहिती महासंघाचे जिल्हाध्यक्ष विजय मंडलिक यांनी दिली. काही संघटनांनी १५ ऑगस्टपासून विविध गोष्टीसाठी व पंढरपूर येथील पुरवठा अधिकारी निलंबना बाबत संप पुकारलेला आहे मात्र या संपामध्ये महासंघ सघटेना सहभागी होणार नाही त्याचबरोबर पुरवठा निरीक्षक सदानंद नाईक यांच्या विषयी महासंघ दुकानदार संघटनेचा दुकानदाराची तक्रार नसल्याबाबत निवेदनातून कळल्याचेही त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील धान्य दुकानदार यांच्यासाठी शहरा मधील धान्य दुकानदार यांनी सुद्धा संप करू नये. आम्ही आमची कामे करून घेण्यासाठी आम्ही सक्षम आहोत. असे ग्रामीण भागामधील धान्य दुकानदाराचे मत आहे.तसेच इंष्टाक मुद्दा फक्त पंढरपूर तालुका पुरता मर्यादित नसुन तो सुपर्ण जिल्हा मध्ये प्रत्येक तालुकाचे किमान १५ ते २० हजार इंष्टाक शिल्लक आहे. असे महासंघ जिल्हा संघटनेचे व जिल्हा मधील सर्व महासंघ तालुका संघटनेचे तालुकाध्यक्ष यांचे मत आहे.त्या मुळे फक्त एक पुरवठा निरीक्षक हे इंष्टाक बाबत जबाबदार होऊ शकत नाहीत.

# सायबर क्राईमच्या गुन्ह्यांत होणारी वाढ चिंताजनक

- **सायबर क्राईम सेलचे प्रमुख प्रसाद पोतदार**
- **माऊली महाविद्यालयात व्याख्यान**

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

मोबाईल, इंटरनेट ही गरजेची साधने असली तरी देखील यातून उदयाला आलेल्या सायबर क्राईमच्या गुन्ह्यांत दिवसेंदिवस होत असलेली वाढ चिंताजनक असून सायबर गुन्हेगारी विश्वाबद्दल जनजागृती करणे हाच सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी ठोस उपाय असल्याचे प्रतिपादन पुणे येथील पर्वती पोलीस ठाण्यातील सायबर क्राईम सेलचे प्रमुख प्रसाद पोतदार यांनी केले.



वडाळा येथील माऊली महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त संशोधन व विकास समितीच्या वतीने सोमवारी पोतदार यांचे बौद्धिक संपदा व सायबर क्राईम जनजागृती या विषयावर व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठे अध्यक्षस्थानी होते. पुणे येथील स्टडी सेंटरचे राम कोकाटे, प्राचार्य डॉ.शिरीष भोसले, प्रा.डॉ.ए.ए.गढवाल यावेळी उपस्थित होते.

गेल्या वर्षात देशभरात ऑनलाईन पैशाच्या व्यवहारात २३ हजार कोटी रुपयांचे घोटाळे झाले असून सायबर क्राईमच्या माध्यमातून हजारो रुपयांपासून कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याच्या घटना आहेत. त्यामुळे मोबाईल, इंटरनेट वापरताना अतिशय सावधगिरी बाळगा, तरुणांनो सोशल मिडीयाच्या आहारी जाऊ नका, त्यातून आर्थिक फटका तर बसेलच शिवाय जीवावरही बेतेल, असाही सल्ला पोतदार यांनी दिला.

प्रा.डॉ.प्रतिभा बिरादार यांनी सूत्रसंचालन केले. संशोधन व विकास समितीचे समन्वयक प्रा.डॉ.सतीश घोरपडे यांनी प्रास्तविक केले. प्रा.डॉ.विकास शिंदे यांनी आभार मानले.

# ग्रंथ वाचनाने व्यक्तिमत्त्व फुलते

**उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे : जवाहर महाविद्यालयात ग्रंथपाल दिन उत्साहात**

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. १३ ऑगस्ट-**

ग्रंथ हेच आपले गुरु आहेत. ग्रंथातून आपल्याला जीवन जगण्याची दिशा मिळते. ग्रंथांच्या संपर्कात राहिल्याने विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व फुलते. संत तुलशीदास, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, वि. स. खांडेकर यांच्यासारखे विचारवंत आपल्याला ग्रंथाच्या माध्यमातून भेटतात, म्हणून ग्रंथांच्या सानिध्यात राहू या, असे मत महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे यांनी व्यक्त केले.



१२ ऑगस्ट ग्रंथालय शास्त्राचे जनक रंगनाथन यांची जयंती ग्रंथपाल दिन म्हणून संपूर्ण भारतात साजरी केली जाते. त्याचे औचित्य साधून जवाहर महाविद्यालय अणदूर येथे ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. रंगनाथन व शिक्षण महर्षी सि. ना. आलुरे गुरुजी यांच्या प्रतिमेच्या पूजनाने व दीप प्रज्वलित करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, डॉ. एस. जी. बिराजदार, डॉ.आर. व्ही. वरशेट्टी, डॉ. डी. एस. सूर्यवंशी, डॉ. एस. एन. गडसिंग, डॉ. अमोल पाचपिंडे, ग्रंथपाल प्रा. शैलेश शाईवाले, शुभांगी स्वामी उपस्थित होते. प्रास्ताविकामध्ये प्रा. शैलेश शाईवाले यांनी रंगनाथन यांच्या स्मृतींना उजाळा दिला. यावेळी हर घर तिरंगा अभियानाचे थेट प्रक्षेपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाचा लाभ प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी घेतला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. एम. बी.बिराजदार यांनी तर आभार डॉ. आर. एस.नळगे यांनी मानले.

# भास्कराचार्य टॅलेंट सर्च स्पर्धेचे आयोजन

**● प्रा.डॉ. भारत खराटे : चौथी-दहावी, अकरावी-बारावी विज्ञानच्या विद्यार्थ्यांना भाग घेता येणार**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ ऑगस्ट-**

श्री भास्कराचार्य प्रतिष्ठान गेली २२ वर्षे नियमितपणे भास्कराचार्य टॅलेंट सर्च स्पर्धा परीक्षेचे आयोजन करत आहे. इयत्ता चौथी ते दहावी आणि अकरावी-बारावी (विज्ञान) या वर्गामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी या स्पर्धेचे आयोजन कोल्हापूर, सांगली, सातारा, कोकण व सोलापूर या जिल्ह्यांसाठी केले असून या परीक्षेतील विजेत्यांना रुपये एक कोटीची शैक्षणिक स्कॉलरशिप आणि

रोख बक्षिसे देण्यात येणार आहे.

आजच्या काळातील स्पर्धा परीक्षांची गरज लक्षात घेता विद्यार्थी स्पर्धात्मक परीक्षांकरीता तयार होणे अत्यंत महत्वाचे आहे. भविष्यामध्ये विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःला सिद्ध करण्यासाठी स्पर्धेला सामोरे जाणे अनिवार्य आहे. म्हणून शालेय व महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धाविषयी जागरुकता निर्माण व्हावी या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या परीक्षेला आत्तापर्यंत एक लाखपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो असे चाटे शिक्षण समूह, कोल्हापूर विभागाचे संचालक प्रा. डॉ. भारत खराटे यांनी सांगितले. ही परीक्षा बहुपर्यायी प्रश्न बहुस्वरुपाचे असून यामध्ये इयत्ता चौथी ते दहावीसाठी मागील वर्षाच्या विज्ञान, गणित आणि बुद्धिमत्ता चाचणी या विषयांवर आधारित प्रश्न विचारले जाणार आहेत तर इयत्ता अकरावी व बारावीसाठी मागील वर्षाच्या फिजिक्स आणि केमिस्ट्री या विषयाशी संबंधित प्रश्न विचारले जाणार आहेत. ही परीक्षा विद्यार्थ्यांसाठी ऑफलाईन स्वरुपात घेण्यात येणार आहे. प्रत्येक वर्गासाठी जिल्हानिहाय रोख बक्षिसे, प्रमाणपत्र आणि स्मृतीचिन्ह असे बक्षिसांचे स्वरुप असून या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांचा स्पर्धा परीक्षेकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि आत्मविश्वास वाढणार आहे. या परीक्षेत विचारले जाणारे प्रश्न हे मराठी व इंग्रजी या भाषेत एकत्र विचारले जाणार असल्यामुळे परीक्षेसाठी मराठी माध्यम, सेमी इंग्रजी माध्यम, इंग्रजी माध्यम आणि सीबीएसईमध्ये शिकत असलेले सर्व विद्यार्थी पात्र ठरतात. स्पर्धेसाठी नावनोंदणी करण्याची अंतिम मुदत २४ ऑगस्ट असून नावनोंदणी शाळा किंवा वैयक्तिक स्वरुपात करण्यासाठी चाटे शिक्षण समुहाच्या आपल्यानजीकच्या शाखेवर किंवा स्थानिक प्रतिनिधीकडे संपर्क साधावा, असे स्पर्धेच्या संयोजन समितीच्यावतीने सांगण्यात आले.

# कासेगाव येथे विविध विकासकामांचे उद्घाटन

**लोकरत्न श्रीकांत वाडकर यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ ऑगस्ट-**

कासेगावचे लोकप्रिय माजी सरपंच तथा माजी पंचायत समिती सदस्य लोकरत्न कै. श्रीकांत (बप्पा) वाडकर यांच्या ६५ व्या जयंतीचे औचित्य साधून कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते १० कोटींच्या विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन करण्यात आले. तसेच आगामी निविदाप्रक्रियेत असणाऱ्या २० कोटी रुपयांच्या कामांची घोषणा करण्यात आली.



गावात अनेक ठिकाणी उद्घाटन झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथमे हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज व लोकरत्न कै. श्रीकांत वाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी व्यसपीठावर सिद्धाराम हेले, श्रीमंत हक्के, मधुकर चिवरे, सिताराम कदम, नेताजी खंडागळे, बालाजी कवडे, प्रशांत जाधव, आबा भागवत, भारत चीवरे, मनोज गुंड, वैभव हलसगे, दत्तात्रय खंडागळे, बब्रुवान खंडागळे, ज्ञानेश्वर रोकडे, राजाराम चौगुले, नेताजी पाटील, मल्लिनाथ येणगुरे, लक्ष्मण वाडकर, संभाजी चौगुले, प्रकाश हेडे, जालिंदर गायकवाड, शाहाजन शेख, नारायण जाधव, केदार ढेकळे, राजश्री येणगुरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी लहुजी शक्ती चौक येथे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन आ. कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले.माजी तंटामुक्त समिती अध्यक्ष निशिकांत पाटील यांनी प्रास्ताविक केले. आभार ग्रामपंचायत सदस्य भरत जाधव, सूत्रसंचालन ज्ञानेश्वर कदम यांनी केले.

**७६ जणांचे रक्तदान**

सकाळी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रक्तदान शिबिराचे उद्घाटन लेबर फेडरेशनचे अध्यक्ष शंकर चौगुले यांनी केले. दिलीप चौगुले, असलम तांबोळी, निशिकांत पाटील, पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी ७६ जणांनी रक्तदान केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## संक्षिप्त वृत्त

### अनगर अप्पर तहसील कार्यालयासाठी मोहोळ कडकडीत बंद

**मोहोळ, दि. १३ ऑगस्ट-**

अनगर येथे मंजूर झालेले अप्पर तहसील कार्यालय रद्द व्हावे, या मागणीसाठी मंगळवार (ता. १३) रोजी पुन्हा एकदा मोहोळ कडकडीत बंद ठेवून निषेध नोंदवत आंदोलनास पाठिंबा दर्शविला. त्यामुळे आजपर्यंत तीन वेळा मोहोळ शहर आंदोलनकर्त्यांच्या पाठिंबासाठी बंद ठेवण्यात आले आहे. त्याचबरोबर मोहोळ विधीज्ञ मंडळाच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने उपोषण स्थळी येऊन पाठिंबा घोषित केला आहे. याविषयी कागदपत्रांची पूर्तता करून लवकरच उच्च न्यायालयामध्ये रीट दाखल करीत आहोत, असे यावेळी विविध मंडळाचे अध्यक्ष ॲड. शमशाद मुलाणी यांनी सांगितले. अनगर येथे मंजूर असलेले अप्पर तहसील कार्यालय रद्द व्हावे या मागणीसाठी ४ ऑगस्ट पासून धरणे आंदोलनासह अन्य आंदोलने मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीने केली. ९ ऑगस्ट पासून माजी नगरसेवक सत्यवान देशमुख युवा सेना (उबाठा) चे जिल्हाप्रमुख महेश देशमुख, उबाठा शिवसेनेचे युवा नेते शिवरत्न दीपक गायकवाड आणि संतोष सोलनकर या ४ युवकांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. दरम्यान आमरण उपोषण सोडावे यासाठी पोलीस व महसूल प्रशासनाने सोमवारी उपोषण कर्त्यांशी चर्चा केली मात्र उपोषण कर्ते आपल्या मागण्यावर ठाम आहेत.सोमवारी सकाळी तिरडी आंदोलन करण्यात आले तर सोमवारी रात्री शहरातून मशाल मोर्चा काढण्यात आला त्यामध्ये दीड एक हजार नागरिकांनी सहभाग नोंदवला होता* *सोमवारी रात्री* उपोषण कर्ते संतोष सोलनकर यांचा रक्तदाब कमी झाल्याने त्यांना सोलापूर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र प्रकृती स्थिर होताच ते मंगळवारी पुन्हा उपोषणात सामील झाले आहेत. दरम्यान मंगळवारी दुपारी मोहोळ येथील वकील संघटनेने उपोषण स्थळी येऊन पाठिंबा दिल्याची माहिती संघटनेच्या अध्यक्षा ॲड. शमशाद मुलाणी यांनी दिली. येत्या दोन दिवसात मुंबई उच्च न्यायालयात या प्रकरणी सर्वानुमते रिट दाखल करणार असल्याचेही अध्यक्ष मुलाणी यांनी सांगितले.

### पराभवाच्या भीतीने ठाकरे यांची लाडकी बहिण योजनेवर टीका : बावनकुळे

**मुंबई, दि. १३ ऑगस्ट-**

महायुती सरकरच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला मिळणारी प्रचंड लोकप्रियता पाहून उद्धव ठाकरे यांना विधानसभा निवडणुकीत पराभवाची भीती वाटू लागली आहे. त्यामुळेच ते या योजनेवर टीका करून गालबोट लावण्याचा प्रयत्न करत आहेत, असा हल्लाबोल भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी केला. भाजपा प्रदेश कार्यलयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलताना ते म्हणाले, या योजनेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी महिला मोर्चातर्फे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राज्यातील २५ लाख महिला रक्षाबंधनाच्या दिवशी राख्या पाठवणार आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेचा पहिला हप्ता १७ ऑगस्टला महिलांच्या खात्यात जमा होणार आहे. मुख्यमंत्री लाडकी योजना ही कायमस्वरुपी योजना असून महिलांनी या १८ हजार रुपयांमधील किमान ३ हजार रुपयांचा विमा जरी उतरवला तरी त्यांच्या संपूर्ण परिवाराला सुरक्षा कवच मिळू शकेल, इतकी ताकद या योजनेत असल्याचे बावनकुळे यांनी नमूद केले. लाडकी बहीण योजनेबद्दल अपप्रचार करत उद्धव ठाकरे यांनी महिलांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. करोडपतींच्या घरात जन्माला आलेल्यांना या योजनेचे मोल कळणारच नाही. महिला वर्गासाठी उपयुक्त योजनेची खिल्ली उडवून उद्धव ठाकरे यांनी आपली



वैचारिक दिवाळखोरी दाखवून दिली आहे, असे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की,कॉंग्रेस आणि सहका-यांचे सरकार असलेल्या कर्नाटक,हिमाचल प्रदेश मध्ये निवडणुका डोळ्यासमोर ठेवून गृहलक्ष्मी योजनेचे आश्वासन देऊन मते घेतली आणि सत्ता आल्यानंतर योजना बंद केली. मध्यप्रदेश सरकारचे उदाहरण देत, भाजपा आणि सहका-यांचे सरकार असलेल्या राज्यांमध्ये निवडणुकीच्या तोंडावर मतपेढी वर लक्ष ठेवून योजना घोषित न करता कायमस्वरुपी योजना राबवल्या जातात असे बावनकुळे यांनी नमूद केले . कर्नाटक आणि मध्य प्रदेश या दोन राज्य सरकारांमधील फरक मांडत येत्या विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या पारड्यात जनता भरभरून मते देईल ,असा विश्वासही श्री. बावनकुळे यांनी बोलून दाखवला. ४२ लाख शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल भाजपा तर्फे त्यांनी महायुती सरकारचे अभिनंदन केले.

### रामदेव बाबा, पतंजलीविरोधातील अवमानना खटला बंद

**नवी दिल्ली, १३ ऑगस्ट**

दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रकाशित केल्याप्रकरणी दाखल मानहानीच्या खटल्यात योगगुरू रामदेव बाबा, त्यांचे सहकारी आचार्य बालकृष्ण आणि पतंजली आयुर्वेदने दिलेला माफीनामा मान्य केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने मानहानीचा हा खटला आता पूर्णपणे बंद केला आहे. या प्रकरणी रामदेव बाबा, आचार्य बालकृष्ण आणि पतंजलीची बाजू मांडणारे वकील गौतम तालुकदार यांनी याबाबतची माहिती आज दिली. न्या. हिमा कोहली आणि न्या. अहसानुद्दीन यांच्या न्यायासनाने मागील १४ मे रोजी या प्रकरणातील आपला निकाल राखून ठेवला होता. इंडियन मेडिकल असोसिएशन अर्थात् आयएमएने हा मानहानीचा खटला दाखल केला होता. कोरोना काळातील लसीकरण मोहीम तसेच अत्याधुनिक औषध व्यवस्थेविरोधात रामदेव बाबा आणि त्यांच्या पतंजली आयुर्वेद कंपनीने अपप्रचार करून दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रकाशित केल्या होत्या, असा आरोप करीत, आयएमएने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. याचिकेची दखल घेत न्यायालयाने २७ फेब्रुवारी रोजी रामदेव बाबा, आचार्य बालकृष्ण आणि पतंजली आयुर्वेदला नोटीस जारी केली होती.



**सातारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष माणिकराव सोनवलकर यांनी शरद पवार राष्ट्रवादी कॉंग्रेसची साथ सोडून सोमवारी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत आपल्या समर्थकांसह भाजपात प्रवेश केला. यावेळी माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, भाजपा महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील,माधवी नाईक आदी उपस्थित होते.**

# कोणी पक्षात परतले तरी सन्मान निष्ठावंतांचाच

- **खासदार सुप्रिया सुळे यांनी पक्षाचे धोरण केले स्पष्ट**
- **मी जेंव्हा संसदेत प्रश्न विचारते तेंव्हा माझ्या पतीला सरकारी यंत्रणांची नोटीस येते**

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

पवारसाहेबांना अडचणीत टाकून पक्ष सोडून गेलेले पुन्हा पक्षात येत असतील तर कोणाला परत पक्षात घ्यायचे हा निर्णस सर्वस्वी पक्षाचाच असणार आहे. तर पक्षात परत कोणीही आले तरी सन्मान मात्र निष्ठावंतांचाच होणार असल्याचे धोरण शरदचंद्र राष्ट्रवादीच्या नेत्या खा. सुप्रिया सुळे यांनी मंगळवारी सोलापुरात व्यक्त केले. विधानसभेच्या पार्श्वभूमीवर सोलापुरातील काही नेते पवारसाहेबांच्या भेटीला येत असल्याबाबत विचारता त्या म्हणाल्या उमेदवारीबाबतचा निर्णय स्थानिक नेत्यांना विचारूनच केला जाणार आहे.

मी जेव्हा जेव्हा संसदेत प्रश्न मांडते, तेव्हा तेव्हा मझ्या पतीला केंद्रीय गुन्हे अन्वेषण ब्युरो, आयकर विभाग किंवा सक्तवसुली संचालनालयाची नोटीस येते, असा आरोप राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केंद्र सरकारवर केला आहे. तर कायदा व सुव्यवस्था बिघडलेल्या महाराष्ट्राला अधोगतीला



नेत असल्याचाही टोला त्यांनी महायुती सरकारला लगावला.

सुप्रिया सुळे, खासदार अमोल कोल्हे व खासदार धैर्यशील पाटील यांनी मंगळवारी, १३ ऑगस्ट रोजी सोलापूरमध्ये पत्रकार परिषद घेतली. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाची शिवस्वराज्य यात्रा सोलापुरात दाखल झाली. त्यानिमित्त त्यांच्या पक्षातील नेत्यांनी सोलापुरात पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी खासदार सुळे यांनी मराठा आरक्षणावरही भाष्य केले. तसेच त्या म्हणाल्या, मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवताना ५० टक्के आरक्षणाची मर्यादा हा महत्त्वाचा मुद्दा आहे. सरकारने तो आधी सोडवला पाहिजे. खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यासाठी सरकारसमोर आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हा कळीचा मुद्दा आहे, जो केंद्र सरकार व संसदेच्या अखत्यारित आहे. त्यामुळे या मुद्द्यावर सर्वांनी संसदेत बोलायला हवं. मी प्रत्येक अधिवेशनावेळी हा मुद्दा संसदेत मांडते. त्याचबरोबर महाराष्ट्रातील इतर महत्त्वाचे प्रश्न देखील मी संसदेत मंडत असते. संसद हे असे प्रश्न मांडण्यासाठीचे महत्त्वाचं व योग्य व्यासपीठ आहे आणि मी त्या व्यासपीठाचा पुरेपूर वापर करते. आम्ही दडपशाहीवाले लोक नाही. कोणीतरी विरोधात बोललं म्हणून आम्ही त्यांना आयकर विभागाची नोटीस पाठवत नाही. केंद्रीय गुन्हे अन्वेषण ब्युरो व सक्तवसुली संचालनालयाची पथके त्याच्यामागे लावत नाही.

शरद पवार गटातील खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, ते (भाजपा) आमचा ७० वर्षांचा हिशेब मागतात. अशा पद्धतीचे गलिच्छ राजकारण आम्ही केले नाही. भविष्यात सत्तेवर आल्यानंतरही आम्ही असे राजकारण करणार नाही. मी जेव्हा जेव्हा संसदेत सरकारविरोधात बोलते, प्रश्न मांडते तेव्हा तेव्हा माझ्या पतीच्या विरोधात नोटीस निघते. कालच एक नोटीस माझ्या कुटुंबाला मिळाली आहे. त्यानंतर मी परत काही प्रश्न मांडले, मी सरकार विरोधात बोलले. आता अजून एक लव्ह लेटर येईल. आम्ही त्याला नोटीस म्हणत नाही, आम्ही त्या नोटिशींना प्रेमापत्र म्हणतो. सरकारला प्रश्न विचारला की अशी प्रेमपत्र येत असतात.

### लाडकी बहिण हा विषय घरगुती असून सार्वजनिक चर्चेचा नाही

लाडकी बहिण योजनेबाबत बोलताना एका मुलाखतीत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, माझी बहिण सध्या नाराज आहे म्हणून सर्व बहिणींसाठी लाडकी बहिण योजना आहे. याबाबत बोलताना खा. सु ळे म्हणाल्या की, लाडकी बहिण हा विषय माझ्यासाठी घरगुती असून तो चर्चेचा नाही. महायुतीचे आमदार ज्या पध्दतीने लाडकी बहिण योजनेबाबत बोलत आहेत त्यावरून ही योजना केवळ मतांसाठीच सरकारने आणल्याचे स्पष्ट होत असल्याचेही खा. सुळे म्हणाल्या.

### जीएसटी कौन्सिल बैठकीला अर्थमंत्र्यांची दांडी

जीएसटीमुळे सामान्य माणसांचे जीवन असह्य झाले आहे. माणसांच्या दैनंदिन गरजांच्या वस्तूंवर



सर्वाधिक जीएसटी लावण्यात आली आहे. वैद्यकीय सुविधेच्या मेडिक्लेमवर १ ८ टक्के जीसएटी लावली आहे. जीएसटीबाबत केंद्रीय अर्थमंत्र्यांना भेटले असता त्यांनी राज्यातील गृहमंत्र्यांकडे बोट दाखवले आहे. माहिती घेतली असता राज्याचे अर्थमंत्री जीएसटी कौन्सिलच्या बैठकीलाच दांडी मारत असल्याचे कळाले. राज्याच्या या निष्क्रिय कारभारामुळे सामान्यांवर जीएसटीचा असह्या बोजा वाढतच असल्याचा टोला खा. सुप्रिया सुळे यांनी लगावला. राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. राजकीय नेते देखील सुरक्षित नाहीत मग गृहखात्याचे इंटिलिजंन्स अपयशी ठरल म्हणावे लागेल. महिला सुरक्षित नाहीत, अपघात सुसाट होत आहेत. गुन्हेगारी वाढली असल्याचे सांगत खा. सुळे यांनी राज्य सरकारवर टिकास्त्र सोडले.

## आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणात बैठकीत नैसर्गिक आपत्ती प्रतिबंधक १९५० कामांना मंजुरी

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १३ ऑगस्ट-**

नैसर्गिक आपत्ती रोखण्यासाठी प्रभावी उपायोयजना असणाऱ्या २७६६ कोटींच्या १९५० विविध कामांना मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीत मंजुरी दिली. दरड प्रतिबंधक, वीज कोसळण्यापासून प्रतिबंध, पूर संरक्षण भिंत, लहान पुलांचे काम, नाला खोलीकरण दुष्काळ निवारणासाठी भूजल पुनर्भरण, तलाव दुरुस्ती, वनीकरण आदी कामांचा समावेश आहे. मंत्रालयातील राज्य आपत्कालिन प्रतिसाद केंद्र अद्ययावत करण्याचा देखील निर्णय यावेळी झाला.



मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहातील या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी आदी उपस्थित होते.

नैसर्गिक आपत्ती रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असलेल्याने ही आपत्ती प्रतिबंधक उपाययोजनेची कामे वेळेत आणि गुणवत्ता पूर्ण पद्धतीने करा. आपत्तीमध्ये बचावकार्यासाठी उपयुक्त ठरतील असे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर असलेली साधनसामुग्री घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा आपत्कालिन प्रतिसाद केंद्राचे देखील अद्ययावतीकरण करण्यात येणार असून त्यासाठी १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

यावेळी राज्य भुस्खलन व्यवस्थापन आराखडा, ग्रामपंचायत आपत्ती व्यवस्थापन आराखडा, महाराष्ट्र राज्य उष्मलाट कृती आराखडा या आपत्ती विषयक आराखड्यांना तसेच पालघर-वसई भूमिगत विद्युत वाहिनीच्या कामाला मंजुरी देण्यात आली.

## फरार गुप्ता बंधूंशी उध्दव ठाकरे यांचे व्यावसायिक संबंध; चौकशी करा

### संजय निरुपम यांची मागणी

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १३ ऑगस्ट-**

देहरादूनमधील एका बिल्डरच्या हत्येतील आरोपी आणि आफ्रिकेतील घोटाळेबाज व्यापारी गुप्ता बंधूंशी उद्धव ठाकरे यांचे कोणते व्यावसायिक संबंध आहेत का याची चौकशी करावी, अशी मागणी शिवसेना उपनेते व प्रवक्ते संजय निरुपम यांनी पत्रकार परिषदेत केली.

ते म्हणाले की, ७ ऑगस्ट रोजी संध्याकाळी संजय राऊत यांच्या दिल्लीतील शासकिय निवासस्थानी उद्धव ठाकरेंनी गुप्ता बंधूंपैकी एकाची भेट घेतली. याबाबत राऊत यांच्या घरातील सीसीटीव्ही तपासणे आवश्यक आहे. अजय गुप्ता बिझनेसमन आणि कुख्यात गुंड आहे. , उद्धव ठाकरे आणि कुंटुंबियांची परदेशात मोठी गुंतवणूक आहे , लंडनला घर व हॉटेल्स आहेत. असल्याचे कळते.

गुप्ता बंधूंबाबत निरुपम म्हणाले की राजेश गुप्ता, अतुल गुप्ता आणि अजय गुप्ता हे उत्तराखंडमधील सहारनपूर येथील रहिवाशी आहेत. ते १९९२ मध्ये दक्षिण आफ्रिकेत व्यापारानिमित्त गेले आणि तिथेच एक भ्रष्ट आणि कुविख्यात व्यापारी बनले. आफ्रिकेचे



तत्कालीन राष्ट्रपती जेकब झुमादेखील गुप्ता यांचे बिझनेस पार्टनर होते. २०१८ मध्ये गुप्ता बंधूंचे घोटाळे उघड झाले. दक्षिण आफ्रिका सरकारमधील विविध खात्यांमधून प्रचंड फायदा उचलला. यानंतर जेकब झुमा यांची सरकारमधून हकालपट्टी झाली. या घोटाळ्यांनंतर फरार झालेल्या तिन्ही गुप्ता बंधूंविरोधात नवीन सरकारने इंटरपोलची रेडकॉर्नर नोटीस जारी केली होती. या घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार अजय गुप्ता यांनी नव्या सरकारशी चर्चा करुन या घोटाळ्यातून आपले नाव कमी करुन घेतले. राजेश गुप्ता आणि अतुल गुप्ता दोघेही फरार असून अजय गुप्ता मात्र मुंबईत वास्तव्य करत आहेत, असे निरुपम म्हणाले.

## शरद पवारांनंतर खा. अमोल कोल्हेंना अडवले

### सोलापुरात मराठा आंदोलक आक्रमक; आरक्षणाविषयी भूमिका स्पष्ट करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा तापला असून विविध जिल्ह्यात मराठा समाजाचे आंदोलक राजकीय नेत्यांना जाब विचारत आहेत. शरद पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे खासदार अमोल कोल्हे यांना देखील मराठा समर्थकांनी अडवून जाब विचारला आहे.

मोहोळ येथील सभा संपल्यानंतर सोलापूरकडे रवाना होताना, मराठा बांधवांनी मराठा आरक्षणाची भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली. यावेळी, एक मराठा-लाख मराठाच्या घोषणा देत आंदोलकांनी अमोल कोल्हेंना मराठा आरक्षणाबाबत आपली भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली. त्यावर, मराठा आरक्षणाला आमचा १०० टक्के पाठिंबा असल्याचे खासदार कोल्हे यांनी म्हटले. तुम्ही मनोज दादांना विचारा ते मला ओळखतात, असे म्हणत खासदार अमोल कोल्हे यांनी आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. तसेच, पवार साहेबांनी कालच पक्षाची भूमिका स्पष्ट केलीय, असेही अमोल कोल्हेंनी सांगितले. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हेही सोलापूर दौऱ्यावर असून त्यांनीही भूमिका मांडली. दोन समाजात तेढ आणि एकमेकांबाबत टोकाची भावना नसावी. आरक्षणाचा हक्क ज्याच्या त्याला व्यवस्थित मिळावा, ही शरद पवारांची भूमिका आहे, असे जयंत पाटील यांनी म्हटले आहे.

## सुप्रियाविरोधात सुनेत्राला उमेदवारी द्यायला नको होती

### अजित पवार म्हणाले, माझ्याकडून चूक

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १३ ऑगस्ट-**

सगळ्या माझ्या लाडक्या बहिणी आहेत. राजकारण राजकारणाच्या ठिकाणी असते पण बहिणी सगळ्या लाडक्या आहेत. अनेक घरांमध्ये राजकारण चालतं. राजकारण हे पार घरात शिरु द्यायचे नसते. मागे मात्र माझ्याकडून थोडी चूक झाली.



मी माझ्या बहिणीच्या (सुप्रिया सुळे) विरोधात सुनेत्रा पत्नीला उभे करायला नको होते. पण त्यावेळेस केले गेले. पार्लमेंट्री बोर्डाने तो निर्णय घेतला होता. आता जे झाले ते एकदा बाण सुटल्यासारखे होते. आज मला माझे मन सांगते आहे की तसे व्हायला नको होते. असे अजित पवार यांनी म्हटले आहे. 'जय महाराष्ट्र' या वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांना लाडकी बहीण योजनेबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्याचे उत्तर देताना अजित पवारांनी ही आश्चर्यकारक कबुली देत आपली चूक मान्य केली आहे.

अजित पवार यांनी जुलै २०२३ मध्ये शरद पवारांना आव्हान देऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष सोडला. त्यानंतर लोकसभेची निवडणूक पार पडली. या निवडणुकीत सर्वाधिक चर्चेत असलेला मतदारसंघ होता बारामती. कारण बारामतीत सुनेत्रा पवार विरुद्ध सुप्रिया सुळे असा थेट सामना होता. पवारांच्या घरातील एक मुलगी आणि एक सून एकमेकींच्या विरोधात उभ्या राहिल्या. या निवडणुकीत सुप्रिया सुळे निवडून आल्या. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अजितदादांनी ही कबुली दिल्याने दादा परतणार का अशी चर्चा आता रंगली आहे.

## अनुराधा पौडवाल यांना यंदाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार जाहीर

### राज्य सांस्कृतिक पुरस्कारांची घोषणा

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१३ ऑगस्ट**

सांस्कृतिक कार्य विभागामार्फत प्रदान करण्यात येणारे विविध पुरस्कार जाहीर आज करण्यात आले. यंदाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना जाहीर झाला आहे. तसेच नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार, संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार, ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार, तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगांवकर जीवनगौरव पुरस्कारांची व बारा राज्य सांस्कृतिक पुरस्कारांचीही घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मंगळवारी केली.

संगीत व गायन क्षेत्रातील सातत्यपूर्ण आणि अमूल्य योगदानाबद्दल ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना २०२४ चा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार जाहीर झालेला आहे. शास्त्रीय संगीतासाठी जीवन समर्पण व शास्त्रीय संगीत क्षेत्राची सेवा केली, त्या कलाकारांच्या योगदानाबद्दल दिला जाणाऱ्या भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार आरती अंकलीकर-टिकेकर यांना जाहीर झाला आहे.



नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार- साठी मराठी रंगभूमीवर कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या प्रकाश बुध्दीसागर यांना जाहीर झाला आहे. संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव २०२४ चा पुरस्कार शुभदा दादरकर यांना जाहीर झाला आहे. संगीत रंगभूमीसाठी दिलेल्या विशेष योगदानाबद्दल त्यांना गौरविण्यात आले आहे. संत साहित्यावर लेखन किंवा संतांना अभिप्रेत मानवतावादी कार्याबद्दल सन २०२४ चा ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार संजयजी महाराज पाचपोर यांना जाहीर झाला आहे. तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगांवकर जीवनगौरव पुरस्कार २०२३ साठी शशिकला झुंबर सुक्रे यांच्या नावाची घोषणा झाली असून, २०२४ साठीचा पुरस्कार जनार्दन वायदंडे यांना जाहीर झाला आहे. तमाशा क्षेत्रात प्रदीर्घ सेवा केलेल्या ज्येष्ठ मान्यवर कलाकारास या पुरस्काराने गौरविण्यात येते. सांस्कृतिक कार्यमंत्री मुनगंटीवार यांनी सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत देण्यात येणाऱ्या राज्य सांस्कृतिक पुरस्कार २०२४ चीही घोषणा यावेळी केली. राज्य सांस्कृतिक पुरस्कारांमध्ये एकूण बारा वर्गवारी असून, यामधील प्रत्येक वर्गवारीमध्ये प्रत्येकी एक पुरस्कार जाहीर झाला आहे. २०२४ चा नाटक विभागासाठीचा पुरस्कार विशाखा सुभेदार, उपशास्त्रीय संगीत वर्गवारीमध्ये डॉ. विकास कशाळकर, कंठसंगीत प्रकारातील पुरस्कार सुदेश भोसले यांना घोषित झाला आहे. लोककला क्षेत्राचा पुरस्कार अभिमन्यू धमजी सावदेकर, शाहिरी क्षेत्रातील पुरस्कार शाहिर राजेंद्र कांबळे, नृत्य वर्गवारीत श्रीमती सोनिया परचुरे, चित्रपट क्षेत्रासाठीचा पुरस्कार श्रीमती रोहिणी हट्टंगडी यांना घोषित झाला आहे. तसेच कीर्तन प्रबोधन क्षेत्रातील पुरस्कार संजयनाना धोंडगे, वाद्यसंगीत क्षेत्रातील पांडुरंग मुखडे, कलादान या प्रकारात नागेश सुर्वे (ऋषीराज), तमाशा वर्गवारीतील राज्य सांस्कृतिक पुरस्कार कैलास मारुती सावंत, तर आदिवासी गिरीजन वर्गवारी मध्ये शिवराम शंकर धुटे यांची निवड करण्यात आली आहे.




## अग्रलेख...

# आता माफी मागून काय उपयोग?

बांगलादेशात जे काही घडले आहे आणि घडत आहे, ते निंदनीय आहे. घडलेल्या घटनांचा अर्थात हिंदूंवर झालेल्या अत्याचाराचा जेवढा निषेध करावा तेवढा थोडाच आहे. बांगलादेशची निर्मिती झाली तेव्हा धर्मनिरपेक्ष असलेला हा देश हळूच इस्लामिक बनला आणि तेथील हिंदूंवर अत्याचार सुरू झाले. बांगलादेशात हिंदूंना लक्ष्य करण्यास प्रारंभ झाला. त्यांच्या घरांवर हल्ले करणे, त्यांची संपत्ती लुटणे, महिलांची अब्रू लुटणे असे प्रकार सुरू झाले. हिंदूंच्या मंदिरांवर हल्ले करून तोडफोड करणे, श्रद्धास्थानांवर आघात करणे यामुळे बांगलादेशातील हिंदू असुरक्षित होऊ लागला होता. आता जुलैच्या शेवटी आणि ऑगस्टच्या बारा-तेरा दिवसांमध्ये जे अत्याचार झाले, त्याने तर हिंदू दहशतीत आहे. असंख्य हिंदू भारतात येण्यास इच्छुक आहेत. आहे नाही ते सगळे सोडून जिवाच्या भीतीने ते भारतात आश्रय घेण्यास आसुसले आहेत. भारताशिवाय त्यांच्याकडे अन्य पर्यायही नाही. त्यामुळे जेवढ्या हिंदूंना भारतात यायचे आहे, त्या सगळ्यांना प्रवेश देण्याबाबत सरकारने सकारात्मक विचार करायला हवा. नागरिकत्व दुरुस्ती कायद्यात दुरुस्ती करण्यात आली असल्याने बांगलादेशातून भारतात येऊ इच्छिणाऱ्या अल्पसंख्य हिंदूंना, बौद्ध बांधवांना, शिखांना तत्काळ प्रवेश आणि आश्रय द्यावा आणि कालांतराने त्यांना भारताचे नागरिकत्वही देण्यात यावे. ज्या पद्धतीने बांगलादेशातील कट्टरपंथीयांनी अल्पसंख्यक हिंदूंना लक्ष्य केले आहे, ते पाहता हिंदू तिथे सुरक्षित राहतील, याची शक्यता आज तरी दिसत नाही. बांगलादेशात शेख हसीना यांचे सरकार उलथून टाकण्यात कट्टरपंथीयांना यश आल्यापासून तर हिंदूंवरील अत्याचार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. भारत सरकारने याबाबत चिंता व्यक्त केली असली, तरी नुसती चिंता व्यक्त करून काही उपयोग होणार नाही. बांगलादेशातील हिंसाचाराकडे केवळ त्यांचा अंतर्गत मामला आहे, असे म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही. बहुसंख्य हिंदू असलेला देश ही भारताची ओळख आहे. ती जपून ठेवतानाच शेजारच्या देशांमधील हिंदूंचे मनोधैर्य खच्ची होणार नाही, याची काळजी आपण घेतली पाहिजे. जगभरातल्या हिंदूंसाठी भारत हे आशास्थान आहे. त्यांची आशा मावळणार नाही, अशी ठोस कृती करणे ही काळाची गरज आहे. बांगलादेशात हिंदू बांधवांवर अमानुष अत्याचार होत असताना आपल्या देशातले मानवाधिकारवाले कुठे वाळूत चोच खुपसून बसले आहेत, हे कळायला मार्ग नाही. केंद्रात जेव्हा केव्हा भारतीय जनता पार्टीप्रणीत सरकार सत्तेत असते, तेव्हा देशात कुठे छोटीशीही घटना घडल्यास अकांडतांडव करणारे स्वयंघोषित पुरोगामी आणि कथित मानवाधिकारवाले जो तमाशा करतात, तो आता बांगलादेशात निष्पाप हिंदूंवर अत्याचार होत असताना का करत नाहीत, या प्रश्नाचे उत्तर कधीच मिळणार नाही. कारण, ही सगळी मंडळी स्वार्थी आहेत. यांना मानवाधिकाराशी काहीही देणेघेणे नाही. त्यांना त्यांचा स्वार्थ साध्य करायचा आहे. कोण मरतोय, कोण जगतोय याच्याशी त्यांना देणेघेणे असते, तर ते मूग गिळून गप्प बसलेच नसते.

शेख हसीना यांचे सरकार उलथून टाकल्यानंतर सत्तेत आलेल्या अंतरिम सरकारने हिंदू समुदायाची माफी मागितली आहे. हिंदूंचे संरक्षण करण्यात आम्ही कमी पडलो अशी कबुली देताना तेथील अंतरिम सरकारने ही माफी मागितली आहे. मात्र, आता बराच विलंब झाला आहे. हिंदूंचे जे प्रचंड नुकसान झाले आहे, ते कधीही भरून निघणारे नाही. झालेल्या घृणित अत्याचारामुळे हिंदू समुदाय दहशतीत आहे, घाबरला आहे, अस्वस्थ आहे. त्याला भविष्याची चिंता सतावते आहे. अनेक हिंदूंचे प्राण गेले आहेत. माफी मागण्याने हे नुकसान भरून निघेल काय? निश्चितच नाही. त्यामुळे बांगलादेशातील अंतरिम सरकारने माफी मागितली असली, तरी त्यांनी केलेली चूक अक्षम्य आहे. त्यांच्या चुकीला माफी नाहीच. सध्या बांगलादेशात जी स्थिती आहे, ती अशांत आहे. मोठे अराजक माजले आहे. कुणीच कुणाचे ऐकायला तयार नाही. अशा परिस्थितीत हिंदू सुरक्षित राहतील, याची कसलीही शक्यता दिसत नाही. अंतरिम सरकारचे सल्लागार असलेले निवृत्त ब्रिगेडियर जनरल एम. सखावत हुसैन यांनी बांगलादेशी समाजाला आवाहन केले की, त्यांनी अल्पसंख्यक असलेल्या बांधवांची काळजी घ्यावी. पण, त्यांच्या आवाहनाला कुणी प्रतिसाद देईल, अशी आशा करणे व्यर्थच. बांगलादेशात एवढ्या सगळ्या घडामोडी घडत असताना आंतरराष्ट्रीय समुदाय कोणतीही ठोस कारवाई करताना दिसत नाही. आपल्या मणिपूरमध्ये हिंसक घटना कुणी घडवून आणल्या, हे संपूर्ण जगाला माहिती आहे. असे असतानाही भारताला शहाणपणा शिकवण्यात अनेक देश आघाडीवर होते. आज मात्र ते सोयीस्कर भूमिका घेत मूकदर्शक बनले आहेत. वास्तविक, मणिपूरचा मुद्दा हा संपूर्णपणे भारताचा अंतर्गत मामला आहे. इथल्या हिंसाचारात कुठल्या एका धर्माच्या लोकांना लक्ष्य करण्यात आलेले नाही. असे असतानाही अनेकांनी त्यात नाक खुपसलेच. आता बांगलादेशात हिंदू मारले जात असताना मणिपूरबाबत बोलणारे ढोंगी गप्प बसले आहेत. हे ढोंग जनतेने ओळखले पाहिजे आणि देशाला प्रगतीच्या मार्गावर पुढे नेण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी आणि त्यांच्या पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनीही बांगलादेशातील हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराबाबत ठोस निवेदन केलेले नाही. कारण नसताना मोदी, भाजपा आणि संघाला लक्ष्य करणारे राहुल गांधी भाजपाशासित राज्यांत थोडेसेही खुट्ट वाजले तरी आकाशपाताळ एक करतात. संघ-भाजपाला जातीयवादी ठरवून मोदींवर अश्लाघ्य शब्दांत टीका करतात, हे देश दररोज अनुभवतो आहे. परदेशात रचली जाणारी षडयंत्रे यशस्वी होतातच कशी, याचा विचार आपल्या देशातील जनतेने आता गांभीर्याने करायला हवा. हीच योग्य वेळ आहे. उद्या आपल्या देशात बांगलादेशसारखी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. अनेक कट्टरपंथीयांनी केलेली वक्तव्ये तपासली तर ही बाब आपल्या सहज लक्षात येईल. त्यामुळे प्रत्येक देशभक्त नागरिकाने कायम सतर्क राहणे ही आजची गरज आहे. कुठल्याही अपप्रचाराला बळी न पडता हिंसाचार घडवून आणण्याचा प्रयत्न होताना जरी दिसला, तरी तो वेळीच हाणून पाडण्यासाठी प्रत्येकाने सज्ज असले पाहिजे.

बांगलादेशात शेख हसीना यांचे सरकार उलथून टाकल्यानंतर तिथे ज्या घडामोडी घडल्या आहेत, त्या पृष्ठभूमीवर आता आपण अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तोयबा ही संघटना भारतात मोठ्या प्रमाणात घातपात घडवून आणण्याची योजना आखत आहे. अन्सारुल्लाह बांग्ला टीमसोबत तोयबाने यासंदर्भात बोलणी केली असून प्रारंभी भारताच्या पूर्वोत्तर राज्यांमध्ये घातपात घडवून आणण्याची त्यांची योजना असल्याची वार्ता आहे. ही वार्ता भारत सरकारच्या कानी पोहोचली नसेल आणि त्यांनी खबरदारीची उपाययोजना आखण्यास सुरुवात केली नसेल, असे समजण्याचे कारण नाही. असे असले तरी सगळे काही सरकारवर सोडून चालायचे नाही. बांगलादेशात जो हिंसाचार घडला, त्यात पडद्यामागून पाकिस्तानची गुप्तचर संस्था इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्स अर्थात आयएसआयने मोठी भूमिका निभावल्याचे एव्हाना स्पष्ट झाले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात भारतात कशाप्रकारे कारवाया केल्या जाऊ शकतात, याचा अंदाज सहज येतो. त्यामुळे भारत सरकारने आतापासूनच आयएसआयचे कंबरडे मोडेल, अशी कारवाई करण्याची योजना आखली पाहिजे. राहुल गांधींसारखे जे आक्रस्ताळे नेते आहेत, त्यांची तमा न बाळगता आणि कुणाचाही मुलाहिजा न ठेवता देशहिताआड येणाऱ्या सर्व प्रवृत्ती ठेचून काढण्याची ठोस योजना भारत सरकारने आखली पाहिजे. आंतरराष्ट्रीय समुदाय काय भूमिका घेईल, याचीही चिंता न करता स्वसुरक्षेसाठी जे जे करणे आवश्यक आहे, ते सगळे सरकारने केले पाहिजे.

## चिंतन

# हिंदुमुक्त बांगलादेश?

**गुरुदत्त दिनकर वाकदेकर**

शेकडो लोक बांगलादेशचे संस्थापक आणि शेख हसीनाचे वडील बंगबंधू शेख मुजीबुर रहमान यांच्या पुतळ्यावर चढून हातोड्याने तोडत आहेत. १९७१ च्या स्वातंत्र्यलढ्यानंतर ज्यांच्या बलिदानामुळे बांगलादेशचा जन्म झाला, अशा बंगबंधूंची छायाचित्रे आणि पुतळे नष्ट केले जात आहेत आणि संपूर्ण जग केवळ हे पाहत आहे. बांगलादेशच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेते शेख मुजीब, ज्यांना राष्ट्रपिता म्हणून ओळखले जाते, मुक्ती वाहिनीच्या लढ्यापासून ते भारतानंतर बांगलादेशच्या स्वातंत्र्यापर्यंतचे शौर्य, चमत्कार आणि करिष्माई नेतृत्व होते, अशा नेत्याची आणि त्यांच्या कुटुंबीयांची निर्भर्त्सना या देशाचे नागरिक करीत आहेत. १९७५ मध्ये हसीना यांच्या कुटुंबातील बहुतांश सदस्यांची (परदेशात राहणाऱ्या हसीना वगळता) कशी निर्घृण हत्या करण्यात आली, हेही पाहायला मिळते. या वर्षी २३ जूनपासून पदावर असलेले लष्कर प्रमुख जनरल वाकर-उज झमान यांनी 'अंतरिम सरकार'चे आश्वासन दिले आहे. पण, हा आदेश कोणी दिला हे सर्वश्रुतच आहे. त्यांनी हसीना यांच्या राजकीय प्रतिस्पर्धी माजी पंतप्रधान बेगम खालिदा झिया यांची सुटका केली आहे. खालिदा झिया यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात बांगलादेश इस्लामिक दहशतवादाचे केंद्र बनले होते. खालिदा झिया या प्रखर भारत आणि हिंदू विरोधी आहेत. झियाच्या सुटकेमुळे भारताचे परराष्ट्र धोरण ठरवणाऱ्यांना नक्कीच चिंता वाटेल. खालिदा झिया त्यांच्या देशाच्या पंतप्रधान असताना टाटा समूहाच्या गुंतवणूक योजनेला कडाडून विरोध झाला होता. शेख हसीना सरकार उलथून टाकल्यानंतर, इस्लामिक आणि भारतविरोधी शक्तींनी हिंदू आणि प्राचीन हिंदू मंदिरांवर हल्ले करण्यास सुरुवात केली आहे. शेख हसीना यांच्या कार्यकाळात बांगलादेशातील हिंदूंवरील हल्ले कमी-अधिक प्रमाणात संपले होते. बांगलादेशात धर्मांध इस्लामी हिंदूंच्या जीवावर उठले आहेत. बांगलादेशात (पूर्व पाकिस्तान) हिंदूंवर सामूहिक अत्याचार सुरू आहेत. इतका काळ संपूर्ण जग बांगलादेशातील हिंदूंचा हळूहळू नाश होऊ देत राहिले. उलटपक्षी बांगलादेश हा गरीब, छोटा देश मानून त्याला विविध प्रकारांची मदत आजही दिली जात आहे. १९४७ मध्ये भारताची फाळणी झाली तेव्हा पूर्व पाकिस्तानात (सध्याचा बांगलादेश) हिंदूंची संख्या ३० ते ३५ टक्के होती. परंतु २०११ च्या जनगणनेनंतर देशातील एकूण लोकसंख्येच्या केवळ ८ टक्के हिंदू राहिले.

बांगलादेशातील हिंदू नरसंहाराची प्रक्रिया पूर्णपणे लपून राहिलेली नाही. बांगलादेशात आणखी एक भयंकर शक्ती सक्रिय आहे, जी बांगलादेशातील हिंदूंच्या संहारानंतर भारत, युरोप आणि अमेरिकेकडे डोळे लावून बसली आहे. जो कोणी त्या संस्था, संघटना आणि मतप्रणालीचा अभ्यास करतो त्याला हे सहज समजू शकते. बांगलादेशातील बडे राजकीय पक्ष, जमात-ए-इस्लामी, खलिफत मजलिस इत्यादी संघटनांच्या घोषणांमध्येही या सर्व गोष्टी आहेत. संपूर्ण पृथ्वीवर कुराण आणि शरियतचे राज्य प्रस्थापित करण्याचा आणि दारूल इस्लामची निर्मिती करण्याचा घोषित दावा घेऊन ते मार्गक्रमण करीत आहेत.

बांगलादेशात अत्याचार छावण्या नाहीत, त्यामुळे तेथील हिंदूविरुद्धची दहशत कमी होत नाही. त्याकडे लक्ष दिले जात नसल्याने मानवाधिकार संघटना अनेकदा बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराचा उल्लेखही करत नाहीत तर बांगलादेशात सरकार, धर्म आणि सामान्य मुस्लिम समाज हे तिघे मिळून हिंदूंचा हळूहळू नायनाट करत आहेत. किमान तीन कायदेशीर तरतुदी हिंदूंच्या विरोधात आहेत. 'वेस्टेड प्रॉपर्टी ॲक्ट' आणि इस्लाम हा राज्य धर्म असल्याने हिंदूंना त्यांचे पैसे बाहेर पाठवता येत नाहीत. सरकारी निधी आणि मदत फक्त इस्लामिक संस्थांनाच दिली जाते. हिंदूंवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगार आणि मुस्लिमांवर अनेकदा कायदेशीर कारवाई केली जात नाही. अशा प्रकारे १९५१ पासून बांगलादेशात सतत आणि बहुआयामी दडपशाहीमुळे, हिंदूंची संख्या आता ८ टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे. तेथील हिंदू लोकसंख्या खूपच कमी आहे. ही केवळ वल्गना नाही, तर एक सत्य आहे; जे कोणीही कितीही खोटं ठरविण्याचा प्रयत्न केला तरी सत्यच राहणार आहे. तुलनेसाठी लक्षात घ्या की, १९५१ मध्ये संपूर्ण पाकिस्तानमध्ये हिंदू लोकसंख्या २३ टक्के होती; जी आज पाकिस्तानमध्ये १ टक्क्यापेक्षा कमी झाली आहे. दोन्ही क्षेत्रांमध्ये समान प्रक्रियेद्वारे, विशिष्ट गट काढून टाकला जातो. भारत आणि पाश्चिमात्य जग दोघांनीही ते मूकपणे पाहिले. कोणी काही केले नाही. परिणामी बांगलादेशात आतापर्यंत ४ कोटी ९० लाख हिंदूंची कत्तल किंवा जबरदस्तीने धर्मांतर करण्यात आले आहे. बांगलादेशात 'हिंदू समस्येवर' चर्चा झाली नाही. बांगलादेशचे नेते उघडपणे 'हिंदुमुक्त बांगलादेश' अशा घोषणा करत नाहीत किंवा बांगलादेश सरकार हिंदूंना संपवण्याच्या योजना राबवत नाही. गेल्या चार दशकात भारताची सीमा कोणत्याही युद्धाशिवाय १०० किलोमीटरने कमी झाली आहे. बांगलादेशातील मुस्लिमांनी हळूहळू तिथे ताबा मिळविला. १९७१ मध्ये बांगलादेशात (पूर्वीचे पाकिस्तान) २५ लाख हिंदू मारले गेले. तेव्हा आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमे आणि परदेशी राजदूतांना मुख्य लक्ष्य प्रामुख्याने हिंदू असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. पुलित्झर पारितोषिक विजेते, प्रसिद्ध पत्रकार सिडनी शोनबर्ग १९७१ मध्ये पूर्व पाकिस्तानमध्ये (बांगलादेश) न्यूयॉर्क टाईम्सचे प्रतिनिधी होते. त्यांच्या म्हणण्यानुसार, पाकिस्तानी सैन्याने निवडकपणे हिंदूंना मोठ्या प्रमाणात लक्ष्य केले. हिंदू घरे, दुकाने इत्यादींना पिवळ्या रंगाने 'एच' चिन्हांकित केले होते. लोकांनी शॉनबर्गला सांगितले की, एक लष्करी वाहन येऊन ओरडून विचारायचे, 'इथे कोणी हिंदू आहे का?' उत्तर 'हो' मिळाले की मारले जायचे. त्यावेळची अशी वर्णने आणि वृत्तांत वाचून, आज घडणाऱ्या घटनांशी त्यांची तुलना केली तर ती प्रक्रिया संपली असे म्हणता येणार नाही. काही वर्षांपूर्वी ढाक्यातील एका बेकरीवर आयएसआयएसने हल्ला करीत असाच एक नरसंहार होता; ज्यामध्ये गैरमुस्लिमांना वेगळे केले गेले, ओळख पटवून मारले गेले.

बांगलादेशातील हिंदू नरसंहार प्रकरणातील संपूर्ण प्रक्रिया तीन कर्तव्यबिंदू अधोरेखित करते. प्रथम, दृश्यमान चिन्हे सुरुवातीपासून ओळखणे, दुसरे आपल्याशिवाय इतर लोकांची स्थिती समजून घेणे आणि तिसरे याबद्दल काहीतरी करणे. हिंदूंची नित्यनेमाने हत्या, बलात्कार आणि त्यांच्या पूर्वजांच्या भूमीतून बेदखल केले जात आहे. तेही बांगलादेशसारख्या कमकुवत देशात. अशा प्रकारे नरसंहाराचे कारण मूलतत्त्ववाद आहे.सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात कोटा किमान कमी केला होता. यामुळे आता बांगलादेश पुन्हा शांतता प्रस्थापित होईल, अशी आशा निर्माण झाली आहे. पण, ही अपेक्षा चुकीची ठरली. आंदोलनादरम्यान बळाचा वापर केल्याने जनक्षोभ आणखी वाढला होता. बरं, बांगलादेश आता एका गंभीर संकटात सापडला आहे. आता नजीकच्या भविष्यात तिथले जीवन पुन्हा रुळावर येईल अशी आशा कमी आहे. जो देश आपल्या संस्थापकाचा अपमान करतो, त्याच्याकडून अजून काय अपेक्षा करता येईल?

९९८७७४६७७६

## वेध

# लाभार्थींसाठी दोन अपत्यांची अट हवीच

**गिरीश शेरेकर**

भारतातील बहुतांश समस्येचे मूळ कारण वेगाने वाढणारी लोकसंख्या आहे. या भस्मासुरावर नियंत्रण मिळविण्याचे कायद्याच्या स्वरूपातील ठोस प्रयत्न अद्याप झालेले नाहीत. अपवाद फक्त काही राज्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लढविण्यासाठी टाकलेली दोन अपत्यांची अट! ही अट किमान सर्व निवडणुकांसाठी लागू करून लोकसंख्या नियंत्रणासाठी सरकार गंभीर आहे, हा संदेश जनतेला देता आला असता. त्याचे सकारात्मक परिणाम दिसले असते. पण, जनजागृती आणि दोन अपत्य असेल तर हे मिळणार, एक असेल तर हे मिळेल अशा तकलादू उपायांवरच सरकार अडकले आहे. लोकसंख्या वाढीचा दर पाहिला तर हे उपाय आता बोथट झाल्याचे दिसते. ठोस कायदा करण्याच्या दृष्टीने कोणत्याच सरकारने विचार केलेला नाही. भारतातला जन्मदर फारसा कमी झालेला नाही. संयुक्त राष्ट्राच्या ताज्या अहवालानुसार जून २०२४ मध्ये भारताची लोकसंख्या १४४ कोटी तर चीनची लोकसंख्या १४२ कोटींच्या आसपास आहे. चीनपेक्षा ती २ कोटीने जास्त आहे. याचा अर्थ आपण जगात लोकसंख्येत अव्वल स्थानी पोहोचलो आहोत. भारतासारख्या देशात लोकसंख्या वाढणे फायद्याचे ठरत नाही; उलट ती विविध समस्यांची मुहूर्तमेढ रोवते. विक्राळरूप धारण करून ज्या काही समस्या देशात सध्या आहेत, त्यात वाढत्या शहरीकरणातून उद्भवलेला मूलभूत सुविधांचा अभाव, शिक्षण, आरोग्य, रोजगार व पर्यावरणावर होणारे विपरीत परिणाम प्रामुख्याने दिसतात.

लोकसंख्या वाढीचा सर्वात मोठा पर्यावरणीय परिणाम म्हणजे ग्लोबल वार्मिंगची समस्या. वाढणाऱ्या लोकांना सामावून घेण्यासाठी जंगलांचा होणारा नाश हे त्याचे मूळ आहे. काही शास्त्रज्ञांना भीती आहे की, ग्लोबल वॉर्मिंगमुळे भविष्यात समुद्राची पातळी वाढेल आणि हवामानाची तीव्र परिस्थिती निर्माण होईल. अलिकडच्या वर्षांमध्ये सातत्याने त्याचा अनुभव येतो आहे. उपाययोजनांचा वेग वाढविला नाही तर भविष्यात आणखी तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. सरकारच्या कल्याणकारी योजनांवरसुद्धा वाढत्या लोकसंख्येचा ताण पडत असल्याचा मुद्दा राज्यसभेचे खा. डॉ. अनिल बोंडे यांनी उपस्थित केला. त्यांनी केंद्र शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या गरीब कल्याण योजनांसह अन्य सर्व लाभांच्या योजनांसाठी इतर सगळ्या अटींसह दोन अपत्यांची अट (अपवाद दुसऱ्यावेळी झालेले जुळे अपत्य) ठेवण्यात यावी, अशी मागणी केली. सविस्तर मांडणी करत ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गरीब कल्याण योजना सुरू केली. या योजनेचे लाभार्थी ८० कोटी असून साडेचार कोटी कुटुंबांना घरे, कोट्यवधी कुटुंबांना शौचालये मिळाली. आयुष्मान योजनेसह अन्य योजनांचा लाभ जनतेला होत आहे. लोकसंख्येच्या नियंत्रणासाठी एका कुटुंबात दोन अपत्य असणे अपेक्षित आहे. पण, काही कुटुंबांमध्ये दोनपेक्षा अधिक अपत्य आहेत. काही ठिकाणी तर ही संख्या ५ ते १० च्या दरम्यान आहे. लोकसंख्या नियंत्रणाचा विचार केला, तर सर्व योजनांच्या पात्रतेसाठी दोन अपत्यांची अट ठेवणे आवश्यक आहे. धान्य देण्याच्या योजनेत कुटुंबातील प्रती व्यक्तीसाठी ५ किलो धान्य देण्यात येते. दोनपेक्षा अधिक अपत्य राहिले, तर तेवढे अधिक धान्य द्यावे लागते. ही मुले मोठी झाली की त्यांचे वेगळे कुटुंब होते. कुटुंब जास्त झाले की आवास योजनेतून जास्त घरे बांधावी लागतात. हा एक प्रकारचा दोन अपत्यांना जन्म देणाऱ्या सर्वसाधारण गरीब कुटुंबावर अन्यायच आहे. जो संविधान मानतो आणि देशाच्या हितासाठी दोन अपत्यांना जन्म देतो, त्यांना कमी लाभ मिळतो. त्यामुळे दोन अपत्याचे कुटुंब असणाऱ्यांनाच लाभाच्या योजनेसाठी पात्र ठरविण्यात यावे. त्याने गरीब कल्याणाचे व लोकसंख्या नियंत्रणाचे देशहिताचे काम खऱ्या अर्थाने होणार असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

खा. बोंडे यांनी केलेली मागणी योग्य आणि व्यावहारिक आहे. लाभाच्या योजनेसाठी अपत्यांची अट ठेवल्यास लोकसंख्या नियंत्रणाला मोठा हातभार लागेल. हा काही एकच जालीम उपाय नाही, पण महत्त्वाच्या काही उपायांमधला एक निश्चित आहे. ज्यांना देशाच्या भवितव्याची व युवापिढीची चिंता नाही, त्यांचे ओझे सरकारने वाहण्याची अजिबात गरज नाही. त्यापेक्षा राष्ट्रहित जोपासणाऱ्या खऱ्या गरजवंतांना लाभ देणे केव्हाही चांगले असल्याने अपत्यांची अट टाकणे सयुक्तिक आहे. ज्या उद्देशाने लाभाच्या योजना सुरू होतात, तो उद्देश यशस्वी होण्यास चांगली मदत मिळेल. निवडणुकीतील फायद्या-तोट्याचा विचार न करता राज्यसभेतून सरकारकडे झालेल्या या मागणीचे सर्व खासदार-आमदारांसह जनतेचे व्यापक स्वरूपात समर्थन मिळायला हवे. तेव्हा कुठे सरकार जागे होईल.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# शिवमहिम्न स्तोत्र : शिवलहरींचा प्रचंड स्रोत!

**प्रा. दिलीप जोशी**

'शिवमहिम्न स्तोत्र' हे भगवान शिवाचे महिमान सांगणारे सिद्ध आणि ऊर्जावान स्तोत्र आहे. श्रावण महिन्यात संपूर्ण देशात शिवमहिम्न स्तुती श्रद्धेने गायिली जाते. महिम्न स्तोत्र अत्यंत लोकप्रिय, त्वरित फलदायी अशी भगवान महादेवाची सिद्ध स्तुती आहे. 'महिम्न' हा शब्द महिमान शब्दाची विभक्ती आहे. आपल्या संस्कृतीत प्रतिपाद्य देवतेच्या नावावरून स्तोत्र, कवच, सहस्रनाम, रक्षा प्रसिद्ध आहेत. जसे रामरक्षा, मारुतीस्तोत्र, विष्णुसहस्रनाम वगैरे वगैरे. महिम्न यातीलच एक प्रकार आहे. इतर स्तोत्रामध्ये प्रतिपाद्य देवतेची केवळ स्तुती असते, पण महिम्न मात्र इतर स्तोत्रापेक्षा जरा वेगळे असते. आपली बरीच स्तोत्र नामे किंवा स्तवनांची नावे त्या त्या रचनेच्या आद्यक्षरावरूनही ठरतात. जसे ईश, केन उपनिषदांची नावे आद्याक्षरावरून आहेत; तद्वतच शिव महिम्नाचा प्रारंभ 'महिम्नः' शब्दापासून आहे.

*महिम्नः पारं ते परमविदुषो यद्यसदृशी।*
*स्तुतिर्ब्रह्मादीनामपि तदवसन्नास्त्वयि॥१॥*

'महिम्न' या शब्दाने प्रारंभ झाला आणि प्रतिपाद्य देवता भगवान शिव असल्याने हे शिव महिम्न स्तोत्र आहे. महिम्न प्रकारात केवळ शिवमहिम्न आहे, असे नाही. पंचायतन देवता म्हणजे सूर्य महिम्न, गणपती महिम्न, देवी महिम्न, विष्णू महिम्न आहेत. शिवमहिम्न अत्यंत लोकप्रिय आणि सुप्रसिद्ध आहे म्हणून ते सर्वश्रुत आहे. शिवमहिम्नाचे एकूण ४३ श्लोक असून त्यातील ३१ श्लोक भगवान महादेवाची लीलास्तुती असून उर्वरित १२ श्लोक फळश्रुती आहे. शिवमहिम्न ही छंदवृत्तबद्ध रचना असल्यामुळे त्याचे लयबद्ध गायन करता येते. शिवमहिम्न स्तोत्र अधिकांश शिखरिणी वृत्तात किंवा छंदात आहे. याशिवाय शिवमहिम्नात हरिणी, मालिनी, वसंततिलका, अनुष्टुप छंदातही श्लोक रचना आहेत. महिम्न स्तोत्रात कारुण्य, वीर आणि रौद्र अशा नवरसादींचा समावेश असल्यामुळे पठन करताना सहजपणे अष्टसात्त्विक भाव जागरण होते. शिवाय आद्य शंकराचार्यांनी आणि रामकृष्ण परमहंसांनी शिवमहिम्न सिद्ध केल्यामुळे ते ऊर्जावान आणि बलशाली आहे. शिवमहिम्न हे भगवान शिवाचे नितांत सुंदर 'माहात्म्य पुष्पदंत' नावाच्या गंधर्वराजाने लिहिले आहे. याचा उल्लेख शिवमहिम्नात ३७ व्या श्लोकात आहे.

*कुसुमदशननामा सर्वगन्धर्वराजः शिशुशशिधरमौलेर्देवदेवस्य दासः। स खलु निजमहिम्नो भ्रष्ट एवास्य रोषात् स्तवनमिदमकार्षीद् दिव्यदिव्यं महिम्नः॥३७॥*



'कुसुमदशन' म्हणजे फुलासारखे दात असलेला. म्हणून त्याचे नाव पुष्पदंत. त्यांनी हे दिव्य असे महिमान लिहिले आहे. शिवमहिम्न कसे रचिले याची एक कथा आहे. इंद्रदेव दररोज भगवान शिवाची पूजा करीत. शिवपुजेसाठी स्वर्गातील नंदनवनातून फुले आणण्याची जबाबदारी गंधर्वांचे राजे पुष्पदंत यांच्याकडे होती. रोज रोज नंदनवनातील तीच ती फुले नकोत म्हणून इंद्राच्या आदेशानुसार गंधर्वराज पुष्पदंत काहीतरी वेगळी आणि नवीन फुले आणण्यासाठी भूतलावर आलेत. पृथ्वीवर प्रभास क्षेत्रीच्या चित्ररथ राजाच्या राजोद्यानात सुगंधित, मोहक, विविधरंगी फुले पाहून आनंदित होऊन त्याने दररोज याच बागेतील फुले नेण्याचा सपाटाच लावला. त्यामुळे चित्ररथ राजाला पुजेसाठी फुले मिळेनाशी झाली. आपली फुले कोण नेतो? याचा शोध घेण्याचा खूप प्रयत्न करूनही गंधर्वराज पुष्पदंतांच्या दिव्यसिद्धीमुळे पहारेकऱ्यांना ते दिसत नसत. शेवटी चित्ररथ राजाच्या कुलगुरूंनी राजोद्यानाभोवती शिवनिर्माल्याचे बंधन घातले. हे बंधन ओलांडल्यामुळे पुष्पदंत यांच्या सर्व सिद्धी संपुष्टात येऊन ते पकडल्या गेले. चित्ररथ राजाने वृत्तांत ऐकल्यावर तो हळहळला. फुले जर इंद्रराजांसाठी नेत होतात तर मी स्वर्गात पाठवून दिली असती. आता शिवनिर्माल्याचे उल्लंघन झाल्यामुळे तुझ्या सर्व सिद्धी नष्ट झाल्यात. शिवनिर्माल्य म्हणजे शिवपिंडीवरील फुले, बिल्वपत्र, वाहिलेले जल-दूध ओलांडल्या जाऊ नये म्हणूनच शिवपिंडीला सव्यापसव्य प्रदक्षिणा मारतात. शास्त्रात तिला 'सोमसूत्री प्रदक्षिणा' म्हणजे चंद्रकोरीसारखी प्रदक्षिणा घातली जाते. म्हणून तर शिवपिंडीला पूर्ण प्रदक्षिणा घालत नाहीत. असो.

तेव्हा व्यथित आणि हताश झालेल्या पुष्पदंत गंधर्वराजांना चित्ररथ राजाच्या कुलगुरूंनी सांगितले की, आता यावर एकच उपाय आहे. शिवभगवान आशुतोष आहेत. म्हणजे लवकर प्रसन्न, संतुष्ट होणारे आहेत. त्यांचे स्तवन कर म्हणजे तुला तुझ्या सिद्धी प्राप्त होतील. त्यांच्या आज्ञेनुसार गंधर्वराज पुष्पदंत यांनी शिवपिंड स्थापन करून भगवान शिवाचे महिमा गायन सुरू केले. त्यांच्या मुखातून निघालेले आर्तगायन म्हणजे 'शिवमहिम्न' आहे. या महिम्नाच्या प्रभावाने पुष्पदंतांनी हरवलेले सर्व प्राप्त केले. प्रभास क्षेत्री ज्या पिंडीसमोर शिवमहिम्न निर्माण झाले त्या पिंडीला 'पुष्पदंतेश्वर महादेव' म्हणतात. शिवमहिम्नामध्ये पुष्पदंतांनी शिवाचे वर्णन भल्याभल्यांना शक्य नाही हे सांगताना..

*असित-गिरि-समं स्यात् कज्जलं सिन्धु-पात्रे।*
*सुर-तरुवर-शाखा लेखनी पत्रमुर्वी॥*
*लिखति यदि गृहीत्वा शारदा सर्वकालं।*
*तदपि तव गुणानामीश पारं न याति॥३२॥*

शिवमहिम्न स्तोत्रात समुद्रमंथन प्रसंगातील नीळकंठ महादेव वर्णन, रावणाला दिलेले वरदान, जटेत सामावून घेतलेली मंदाकिनी गंगा, भगवान विष्णूंना दिलेले सुदर्शन चक्र, भगवान विष्णू आणि ब्रह्मदेव यांच्यात झालेला वाद त्यातून परमात्म शक्तीचा अंतःपार पाहण्यासाठी अग्निस्तंभ विभाजन आणि परब्रह्म स्वरूप, कालभैरव रूप, कामदेवाला भस्म केल्याची कथा, ब्रह्मदेव हरीण रूपात कामातुर झाल्यावर महादेवांनी व्याघ्ररूप घेऊन त्यांना परास्त केल्याची कथा, बाणासुर कथा, दक्षयज्ञ विध्वंस कथा, तांडव महत्त्व, जटा आपटल्याची कथा अशा विविध कथा शिवमहिम्नात गंधर्वराज पुष्पदंत यांनी श्लोकबद्ध करून आपल्यावर कृपा केली आहे. शिवमहिम्नाची भाषा नितांत गोड आणि अमृताचा कल्लोळ आहे. शिव महिमान कथा भाग अंशतः म्हणजे थोडक्यात काव्यबद्ध असला तरी कथा सहज समजतात. शब्द संस्कृतात असले तरी भाषेच्या सोपेपणामुळे ते आपोआप संक्रमित होतात. शिवमहिम्न ही मानवी रचना नसून मनुष्यात ते सामर्थ्य नाही. उदात्तभाव लक्षात घेतला तर भगवान शिवांनीच भगवान शिवांची महती सांगावी असेच महिम्न आहे. त्याच्या केवळ पठनाने आपण दोषमुक्त होऊन आपल्या घरातील अवदसा आणि अवकळा नष्ट होतात. मनःशांतीसाठी शिवमहिम्न मार्ग सोपान आहे. श्रावण महिन्यात शिवलहरींचा सर्वत्र संचार असतो. 'शिवमहिम्न' या शिवलहरींना आपल्यापर्यंत खेचून आणते. विस्तारभयाने संपूर्ण विषय मांडता येणे केवळ अशक्य; पण त्या निमित्ताने उत्सुकता वाढून तो ग्रंथ वाचण्याची इच्छा उत्पन्न व्हावी, हा प्रांजळ हेतू.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### उद्यान विभागाची तत्परता

माझे दीर आणि जाऊ डॉ. चंद्रकांत बक्षी व डॉ. सुनीता बक्षी ५० वर्षांपेक्षा जास्त काळ अमेरिकेत वास्तव्यास होते. गेल्या दोन वर्षांपासून नागपुरात स्थायिक झाले आहेत. रोज संध्याकाळी ते दोघेही नियमित तात्या टोपेनगर येथील बगीच्यात फिरायला जातात. फिरणे झाल्यानंतर ग्रीन जिममध्ये असलेल्या सायकलवर माझे दीर व्यायाम करतात. त्यांच्याकरिता ते आवश्यक आहे. परंतु सुमारे १५-२० दिवसांपूर्वी तेथील सायकलचे पायडल तुटल्यामुळे त्यांना व्यायाम करता आला नाही. तुटलेले पायडल पुढे गहाळही झाले. माझ्या जाऊबाईंनी त्यांच्या अमेरिकेतील अनुभवावरून उद्यान विभागात याबद्दल तक्रार करायचे ठरवले. सर्वांनी त्यांना सांगितले, 'काही उपयोग होणार नाही!' परंतु, प्रयत्न करून तर बघू म्हणून त्यांनी एक अर्ज उद्यान विभागात देण्यासाठी तयार केला. मी व माझ्या जाऊबाई महानगर पालिकेच्या सिव्हिल लाईन्समधील उद्यान विभागाच्या सहाव्या मजल्यावरील कार्यालयात अर्ज देण्यासाठी गेलो. 'अर्ज आवक-जावक विभागात द्या,' असे आम्हाला सांगण्यात आले. पण आवक-जावक विभागात अर्ज घेण्याकरिता कोणीही नव्हते; लवकरच अन्सारी नामक कर्मचारी आले. त्यांनी आमचा अर्ज घेतला. आम्ही विचारले, 'हे काम किती दिवसात होईल?' तेव्हा त्यांनी सांगितले, 'एक आठवड्यात! न झाल्यास उद्यान प्रमुख गुर्जरसाहेबांना फोन करा.' गुर्जरसाहेबांचा फोन नंबरही त्यांनी दिला. मुख्य म्हणजे सर्व कर्मचाऱ्यांची वागणूक अत्यंत सौजन्याची आणि सहकार्याची होती. आश्चर्याची गोष्ट म्हणजे चार दिवसांतच सायकलचे पायडल बसविण्यात आले. गुर्जर यांना फोन करून आम्ही धन्यवाद दिले. रामदास स्वामी म्हणतात, 'केल्याने होत आहे रे आधी केलेच पाहिजे!'

**मीना बक्षी**/नागपूर

### अभिनंदनास पात्र

'तरुण भारत'च्या १३ ऑगस्टच्या अंकात एका बातमीने लक्ष वेधून घेतले; ते म्हणजे इंदूरच्या एका सीबीएसई शाळेचा आगळावेगळा उपक्रम. रोज किमान एक हजार मुली प्रार्थनेच्या वेळी भगवद्गीतेच्या वेगवेगळ्या अध्यायातील श्लोक अस्खलित संस्कृतमध्ये म्हणतात आणि त्यांना त्याचा अर्थही माहीत असतो. हा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे. अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घातल्याचे उत्तम उदाहरण इंदूरच्या वैष्णव बाल मंदिर गर्ल्स हायर सेकंडरी स्कूलने सर्वांसमोर ठेवले आहे. इतरांनी याचे अनुकरण करावे; जेणेकरून भावी पिढी संस्कारक्षम आणि सुसंस्कृत घडेल. त्या शाळेचे त्रिवार अभिनंदन!

**स्नेहल खंडागळे**/९९७०१३७९७७

### रक्षाबंधनासंदर्भात...

रक्षाबंधन हा पूर्वापार काळापासून चालत आलेला बहीण-भावांच्या एकमेकांवरील जिव्हाळा व्यक्त करण्याचा सण. बहीण भावाला त्यादिवशी राखी बांधते आणि भाऊ उपाहार स्वरूपात बहिणीला ओवाळणी देत असतो आणि बहिणीच्या संरक्षणाचे दायित्व स्वीकारत असतो. अशा या रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्ताने निरनिराळ्या प्रकारांच्या राख्या बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असतात.



तसे बघितले तर पूर्वी बहीण-भावाच्या हाताला रेशीम धागा राखी म्हणून बांधत असे. काळानुरूप राखीचे स्वरूप बदलले आहे. त्यासंदर्भात सर्वांना विनंती की, रक्षाबंधनासाठी राख्या खरेदी करताना ज्यावर देवी-देवतांचे, संतांचे, हिंदू धर्मीयांचे प्रतीके जसे ओमचे चिन्ह, स्वस्तिक, श्रीराम, श्रीकृष्ण लिहिलेले किंवा अन्य प्रकारांचे पवित्र शुभ चिन्हे, लोगो वा राष्ट्रीय मानचिन्हांचे चित्र असलेल्या राख्या खरेदी करण्याचे काटेकोरपणे टाळावे. अनेक आध्यात्मिक संस्था किंवा संप्रदाय त्यांचे स्वतःचे आध्यात्मिक प्रतीके असलेल्या राख्या समाजात वितरित करीत असतात. अर्थात त्यांचा त्यामागील दृष्टिकोन खरंच उदात्त असतो. समाजापर्यंत या माध्यमातून कार्टूनचे चित्रे असलेल्या राख्यांपेक्षा देवी-देवतांचे चित्रे असलेले सात्त्विक राख्या पोहोचल्या पाहिजे, अशी त्यांची इच्छा असते. परंतु पवित्र प्रतीके किंवा चित्रे असलेल्या अशा राख्या रक्षाबंधनाचा उत्सव झाल्यावर त्या इतस्ततः पडलेल्या आढळून येतात. परिणामतः त्या पायदळी तुडविल्या जातात. त्यामुळे आपल्या हातून नकळत का असेना, देवी-देवता, राष्ट्रीय मानचिन्हांची विटंबना होऊन अवमान होतो. आपण सर्व हिंदूंनी ते टाळले पाहिजे. देवी-देवतांचे, राष्ट्रीय मानचिन्हांची चित्रे सोडून अन्य राख्या आपण घेऊ शकतो. आपण सर्वधर्म आणि राष्ट्रप्रेमी बांधव जागृत राहून अशा कृत्यांपासून समाजातील इतरांना परावृत्त करून धर्म आणि राष्ट्र कर्तव्य बजावू या... जर अशा राख्या बांधण्यात आल्या असतील, तर त्या दिवसाचे महत्त्व झाल्यानंतर त्या काढून इतरत्र टाकून देण्यापेक्षा ईश्वराला प्रार्थना करून अग्नीत समर्पित करणे हे जास्त योग्य आणि समर्पक होईल.

**श्रीकांत पाध्ये**/८२७५८६५२८५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

## CHANGE IN NAME

I have changed my old name **Revansiddappa Rudramani Phatate** into new name **Revansiddhappa Rudramani Phatate.** has per same residing at R/O C- 51, Shrishail Nagar, Bhavani Peth, Solapur The above named person is one and same person.
**Aff. No. 2452642471268501437584**
Date. 13/08/2024

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E-Tender 2nd call Notice

Digitally signed online bids are invited through E-tender 2nd call process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000032552 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender:09/2024-2025**, **Particulars: -** Work of Augmentation by replacement of existing 2X25 MVA, 132/33kV T/Fs by 2X50MVA, 132/33kV T/Fs at 132kV Karajgi S/s under EHV O&M Division, Solapur, **Estimated cost:** Rs. 37,03,850/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost): Rs** 37,038**/- Tender cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period:** 12.08.2024 to 20.08.2024 **Last Date of Submission:** 20.08.2024 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 21.08.2024 at 12:00Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer -7447440608 For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in.**

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur.**

## मोहोळ नगरपरिषद, मोहोळ

**(पाणी पुरवठा विभाग)**

**जाहीर निविदा**

मोहोळ नगरपरिषद खालील नमूद कामाकरिता बंद लखोट्यातून परसेंटेज दराच्या निविदा मागवित आहे. निविदापत्रके दिनांक- २३/०८/२०२४ रोजी दु. ४.०० वाजेपर्यंत पाणी पुरवठा विभागाकडे विकत मिळतील. दिनांक - २६/०८/२०२४ रोजी दु. ४.०० वाजेपर्यंत भरलेली निविदापत्रके स्वीकारली जातील. बयाणा रकमेपोटीचे रकमेचा धनाकर्ष (डी.डी.) द्वारे स्विकारणेत येईल, रोख रक्कम भरून घेतली जाणार नाही. धनाकर्ष सोबत असलेशिवाय निविदापत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दिनांक २६/०८/२०२४ रोजी दु. ४.०० वाजता (शक्य झाल्यास) हजर निविदाधारकांसमोर अथवा त्यांचे प्रतिनिधी समोर बंद निविदा पाकिटे मुख्याधिकारी यांचे कार्यालयात उघडणेत येतील. बंद लखोट्यावर ज्या त्या कामाचे नाव लिहावे. निविदा दोन पाकीट पद्धतीने स्विकारल्या जातील. पाकिट क्र.१ मध्ये बयाना रकमेचा धनाकर्ष (डी.डी.), मागील तीन वर्षाचे आयकर, पॅन नंबर, शासनाकडील नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी नोंदणी, कामासाबंधी इतर आवश्यक कागदपत्रे असणे आवश्यक आहे. पाकिट क्र.२ मध्ये भरलेली निविदा सादर करावी. निविदाच्या अटी शर्ती वगैरे संपूर्ण माहिती सुट्टीखेरीज कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. कमी अथवा जादा दाराची निविदा मंजूर करणे अथवा नामंजूर करणेच अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाहीत. निविदा मागणी अर्जासोबत शासनाकडील नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

**कामांचा तपशील**

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची मंजूर रक्कम रु. | बयाणा रक्कम रु. | सुरक्षा ठेव रक्कम | कामाची मुदत | निविदा संचाची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोहोळ नगरपरिषद सिध्दनागेश पाणी पुरवठा योजना येथे नवीन ६० HP Vertical Openwell मोटार व अनुषंगिक साहित्य पुरवठा करणे (अंदाजपत्रकीय स्पेसिफिकेशन नुसार) | ८,९३,९८९/- | ९,०००/- | १०% देयकातून | १५ दिवस | ५००/- |

**नगरपरिषद कार्यालय,**
**मोहोळ, दिनांक : १३/०८/२०२४**

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**मोहोळ नगरपरिषद, मोहोळ**

इंडियन रेडक्रॉस सोसायटी
जिल्हा शाखा सोलापूर
श्रीमती गोपाबाई दमाणी ब्लड सेंटर
भव्य रक्तदान शिबीर
स्थळ : डफरीन चौक, रेल्वे लाईन्स्, सोलापूर.
वेळ : सकाळी ९:०० ते दुपारी ३:००
आपले मोलाचे रक्तदान थॅलेसेमिया बालकांसाठी करा
Jhaveri

## Motilal Oswal Home Finance Limited

MOTILAL OSWAL HOME LOANS
Regd. Office: Motilal Oswal Tower, Rahimtullah Sayani Road, Opp. Parel ST Depot, Prabhadevi, Mumbai - 400 025, CS : 8291889898
**Website**: www.motilaloswalhf.com, **Email:** hfquery@motilaloswal.com

### ताबा सूचना (जंगम मालमत्ता/आयईएससाठी)

**(सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ (१) अंतर्गत)**

तर अधोस्वाक्षरी केलेले मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी, (औपचारिकपणे अस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून ओळखले जाते), आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ (२००२ चा ५४) अंतर्गत सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांनी खालील कर्जदारांना खालील कर्जदारांना नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याचे आवाहन करण्यासाठी येथे नमूद केलेली मागणी सूचना जारी केली आहे. नोटीस प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत नोटीस देखील येथे नमूद केली आहे. खालील कर्जदारांनी रक्कम परतफेड केली नाही, याद्वारे खालील कर्जदारांना नोटीस देण्यात आली आहे आणि सर्वसाधारणपणे खाली स्वाक्षरी केलेल्या जनतेने कलम १३ च्या पोटकलम (४) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तांचा ताबा घेतला आहे. सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ सोबत येथे नमूद केलेल्या तारखेला कायदा वाचला:

| अ. क्र. | कर्ज करार क्रमांक / कर्जदाराचे नाव / सह कर्जदार / जामीनदार | डिमांड नोटिस आणि थकबाकीची तारीख | ताब्यात घेतल्याची तारीख | स्थावर मालमत्तेचे वर्णन |
|---|---|---|---|---|
| १ | LXMOSOLAPU721-220619144 सिध्दाराम दन्याप्पा पुजारी आणि संगिता सिध्दाराम पुजारी | 08-05-2024 साठी रु. 9,59,800/- | 09-08-2024 | जुना S No.२६५ नवीन S No. ८०/१ प्लॉट क्र. ४३७/ए मल्लिकार्जुन नगर मजरेवाडी ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर मल्लिकार्जुन हायस्कूलजवळ सोलापूर, महाराष्ट्र ४१३००३ |

विशेषत: कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्तेचा व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड वर नमूद केलेल्या रकमेसाठी आणि त्यावर व्याज आकारले जाईल. सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी, उपलब्ध वेळेनुसार, कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जाते.

**ठिकाण : महाराष्ट्र**
**तारीख : १४/०८/२०२४**

**सही/-**
**अधिकृत अधिकारी**
**(मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड)**

भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.

## जाहिर प्रसिध्दीकरण

या जाहिर प्रसिध्दीकरणाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे शेळवे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथील शेतजमिन मिळकत गट क्र. ३८८/१/अ, क्षेत्र २ हे. ६८ आर., आकार ०१ रूपये ०० पैसे या मिळकतीपैकी म्हणजे क्षेत्र ०० हे. २७ आर., आकार ०० रूपये १० पैसे ही मिळकत नंदाबाई रामचंद्र बैले यांचे हिश्याची, मालकीची व वहिवाटीची आहे. सदर जमिन त्यांना महाराष्ट्र शेतजमिन (जमिन धारणेची कमाल मर्यादा अधिनियम १९६१) अंतर्गत मिळालेली आहे त्यांनी सदर जमिन आमचे अशिल पुष्पा मारूती नागटिळक व शशिकांत चंद्रकांत नागटिळक, दोघे रा. शेळवे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांना खरेदी देण्यासाठी पुर्व परवानगी मिळणेकामी मा. अप्पर जिल्हाधिकारी सोलापूर (कुळ कायदा शाखा) या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे. तरी नमुद शेतजमिनी बाबत व त्यामध्ये झालेल्या व्यवहारा बाबत किंवा इतर

कुठल्याही प्रकारचे व्यवहारा बाबत किंवा नमुद जमिनी बाबत कोणाचाही कसलेही प्रकारचा हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षीस, पोटगी, कुलमुखत्यार, लिज, साठेखत, खरेदीखत, टांच, जप्ती, मृत्युपत्र, भाडेपट्टा, खरेदी, विक्री साठेखत, पतसंस्थेचा बोजा, सावकारी देणे, घेणे इत्यादी बाबत काही हरकत, तक्रार, हितसंबंध, अधिकार असल्यास ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १० (दहा) दिवसाचे आत मा. अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर (कुळ कायदा शाखा) सिध्देश्वर पेठ, सोलापूर ४१३००१ या पत्त्यावर आपण हरकत नोंदवावी. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झालेस या संदर्भात कोणाचीही, कसलीही हरकत नाही असे समजुन नमुद शेतजमिनीचा खरेदी, विक्री व्यवहाराच्या पुर्व परवानगी बाबत पुढील योग्य ती कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी. ता. १३/०८/२०२४.

**सही/-**
**ॲड. डी. बी. येडगे**
**बी.ए., एलएल.बी.**
**पत्ता : मु.पो. कोर्टी,**
**ता. पंढरपूर, जि. सोलापूर -४१३३०४**
**मो. ९७३०१४९५२५**

## जाहीर प्रसिद्धीकरण

**ॲड. कृष्णा कैलास गायकवाड**
रा. बारलोणी, ता. माढा,
**दि.कि. अर्ज नं. ६१/२०२४ नि.नं.०५**
पुढील नेमली तारीख : १३/०९/२०२४

**बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधीश साहेब यांचे कोर्टात**

**चि. प्रविण महादेव पाटेकर**
**चि. प्रशांत महादेव पाटेकर** ----- **अर्जदार**
**- विरुद्ध -**
**महाराष्ट्र सरकार** ----- **सामनेवाला**

तमाम लोकांना विशेषतः मौजे अंजनगाव (खे.), ता. माढा, जि. सोलापूर येथील व परिसरातील लोकांना कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार यांनी बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधीश साहेब यांचे न्यायालयात दि.कि. अर्ज क्रमांक ६१/२०२४ हा मौजे अंजनगांव (खे.), ता. माढा, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नंबर २५० क्षेत्र ०० हे. १५ आर, आकार ०० रु. ५० पैसे ही मिळकत विक्रीस काढलेली असून त्याची विक्री परवानगी मिळणेसाठीचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळविण्यात येते की, वरील अज्ञान अर्जदार नंबर १ व २ याचे नावे असलेल्या वरील नमूद मिळकतीबाबत विक्री परवानगी मिळणेबाबतचा आदेश पारीत होणेबाबत कोणाची काही तक्रार असलेस अथवा कोणाचा काही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे आत किंवा पुढील नेमलेली तारीख १३/०९/२०२४ रोजी स्वतः अथवा विधीज्ञामार्फत या न्यायालयात हजर राहून हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाची हरकत न आलेस अर्जदाराने मागणी केलेप्रमाणे अर्जदाराचा पुरावा घेवून पुढील योग्य ते आदेश पारीत केले जातील. तद्नंतर कोणाची काही एक तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस आज दि. १३/८/२०२४ रोजी माझी सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहाय्यक अधीक्षक**
अति. जिल्हा न्यायालय, बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर प्रसिद्धीकरण

**अर्ज वारस दाखला मिळणेबाबत**
**दि.कि. अर्ज नं. ३४/२०२३ नि.नं.१३**
पुढील नेमलेली तारीख १६/१०/२०२४

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात**

**श्रीमती ललीता आकाश साठे,** (लग्नापूर्वीचे नांव **ललीता मारुती मगर**), वय २० वर्षे, धंदा- घरकाम, रा. मु. पो. मुंगशी (आर), ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**१) श्री. राजेंद्र दिगंबर साठे,** वय ६३ वर्षे, धंदा- शेती, रा. मुंगशी (आर), ता. बार्शी, जि. सोलापूर
**२) सौ. सुनिता राजेंद्र साठे,** वय ५६ वर्षे, धंदा- घरकाम,शेती, रा. सदर — **सा.वाला**

**अर्ज- Bombay Regulation Act Section 2 प्रमाणे**

ज्याअर्थी, यातील अर्जदार हे वरील नमूद ठिकाणचे कायमचे रहिवाशी आहेत. यातील सामनेवाला नं. १ हा अर्जदार हिचा सासरा असून सामनेवाली नं. २ ही अर्जदार हिची सासू आहे. यातील अर्जदारचे पती व सामनेवाला नं. १,२ यांचा मुलगा आकाश राजेंद्र साठे हे दिनांक १५/०२/२०२३ रोजी मौजे मुंगशी (आर), ता. बार्शी येथे मयत झालेले. मयत आकाश राजेंद्र साठे यांचे मृत्यू पश्चात यातील अर्जदार व सामनेवाला नं. १,२ यांचे नांवे वारसा हक्काने मौजे मुंगशी (आर) येथील जमीन गट नं. १७ चे ७/१२ हक्कपत्रकी माल सदरी लावणेकरीता यातील अर्जदार मयत आकाश राजेंद्र साठे यांचे कायदेशीर वारस (Legal heirs) आहे असे जाहीर होवून त्याप्रमाणे अर्जदार यांचे नांवे (heirship Certificate) मिळणेसाठी अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, सदर अर्जदार व सामनेवाला नं. १,२ यांचे व्यतिरिक्त मयत आकाश राजेंद्र साठे यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क, हितसंबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिद्धीकरणापासून ३० दिवसांचे आत किंवा नेमली तारीख १६/१०/२०२४ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानिशी दाखल करावी. मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे, हे प्रसिद्धीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले असे. तारीख : ७/८/२०२४

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

# कृषि उत्पन्न बाजार समिती अंबड, मुख्य बाजारपेठ वडीगोद्री, ता. अंबड, जि. जालना

**कृषि उत्पन्न बाजार समिती अंबड, मुख्य बाजार पेठ वडीगोद्री आवारातील / मार्केट यार्डातील ब्लॉक क्रमांक A1, A2, A3, A4, A5, A6, A7, A8, A9, A10, B1, B2, B3, B4, B5 मधील खुले प्लॉट / सहान जागेचा**

## जाहीर लिलाव

याद्वारे सर्व इच्छुक व्यापाऱ्यांना कळविण्यात येते की, कृषि उत्पन्न बाजार समिती अंबड, मुख्य बाजारपेठ वडीगोद्री येथील बाजार आवारातील मार्केट यार्डातील ब्लॉक क्रमांक A1, A2, A3, A4, A5, A6, A7, A8, A9, A10, B1, B2, B3, B4, B5 मधील खुले प्लॉट / सहान जागेचा / भुखंडाचा जाहिर लिलाव दि. २९/०८/२०२४, वार गुरुवार, रोजी कृषि उत्पन्न बाजार समिती, मुख्य बाजारपेठ वडीगोद्री येथील मार्केट यार्ड परिसरामधील समितीच्या गोदामामध्ये खालील दर्शविलेल्या तपशिलाप्रमाणे घेण्यात येणार आहे. .

| अ. क्र | तपशिल | ब्लॉक क्रमांक | लिलाव दिनांक | लिलावाची वेळ | सहान प्लॉटची माहिती | डिपॉझिट रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्य बाजार पेठ वडीगोद्री आवारातील सहान प्लॉट / भुखंड वाटप | A1 | २९/०८/२०२४ | १०.०० | प्लॉट क्र. ०१ ते ६३ | ३०,०००/- |
| २ | | A2 | २९/०८/२०२४ | १२.०० | प्लॉट क्र. ०१ ते ०९ | ३०,०००/- |
| ३ | | A3 | २९/०८/२०२४ | १२.०० | प्लॉट क्र. ०१ ते ०४ | ३०,०००/- |
| ४ | | A4 | २९/०८/२०२४ | १२.०० | प्लॉट क्र. ०१ ते ०२ | ३०,०००/- |
| ५ | | A5 | २९/०८/२०२४ | १२.०० | प्लॉट क्र. ०१ ते ०२ | ३०,०००/- |
| ६ | | A6 | २९/०८/२०२४ | १२.०० | प्लॉट क्र. ०१ ते ०३ | ३०,०००/- |
| ७ | | A7 | २९/०८/२०२४ | १२.०० | प्लॉट क्र. ०१ ते ०३ | ३०,०००/- |
| ८ | | A8 | २९/०८/२०२४ | १२.०० | प्लॉट क्र. ०१ ते २१ | ३०,०००/- |
| ९ | | A9 | २९/०८/२०२४ | ३.०० | प्लॉट क्र. ०१ ते १५ | ३०,०००/- |
| १० | | A10 | २९/०८/२०२४ | ३.०० | प्लॉट क्र. ०१ ते १७ | ३०,०००/- |
| ११ | | B1 | २९/०८/२०२४ | ३.०० | प्लॉट क्र. ०१ ते १३ | ३०,०००/- |
| १२ | | B2 | २९/०८/२०२४ | ३.०० | प्लॉट क्र. ०१ ते २५ | ३०,०००/- |
| १३ | | B3 | २९/०८/२०२४ | ३.०० | प्लॉट क्र. ०१ ते १७ | ३०,०००/- |
| १४ | | B4 | २९/०८/२०२४ | ३.०० | प्लॉट क्र. ०१ ते २६ | ३०,०००/- |
| १५ | | B5 | २९/०८/२०२४ | ५.०० | प्लॉट क्र. ०१ ते ८८ | ३०,०००/- |

तेव्हा इच्छुक व्यापाऱ्यांनी आपले अर्ज दिनांक २६/०८/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वा. पर्यंत डिपॉझिट (अनामत) पोटी रक्कमेचा डि.डि./ बँकर्स चेक / नगदी द्वारे कृषि उत्पन्न बाजार समितीकडे भरणा करुन लिलावात भाग घ्याव, लिलावाची प्रक्रिया ज्या त्या दिवशी न संपल्यास दुसऱ्या दिवशी सुरू राहील याची नोंद घ्यावी. लिलावाची शर्ती व अटी, लिज प्लॉट मुल्यांकन / नकाशे व क्षेत्रफळाची माहिती कायीयीन वेळेत व सुट्टीचे दिवस वगळता समितीचे कार्यालयात पहावयास मिळतील. लिलावाची बोली तीन बार झाल्यानंतर अंतिम करणे अथवा नाकारणे बाबतचे अधिकार बाजार समितीने राखून ठेवले आहेत.

**सही/-**
**श्री. अरुण आसाराम घुगे**
**उपसभापती**

**सही/-**
**श्री. के.ए. चौथे**
**प्र. सचिव**

**सही/-**
**श्री. अवधुत रामराव खडके**
**सभापती**

**व सर्व सन्मानीनीय संचालक मंडळ**
**कृषि उत्पन्न बाजार समिती अंबड, मुख्य बाजारपेठ वडीगोद्री, ता. अंबड, जि. जालना**

## जाहीर समन्स

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा),**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर** **- अर्जदार बँक**
अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर
**विरुध्द**
(खालील तपशिलातील नमुद केलेले बँकेचे थकबाकीदार सभासद) **- जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार क्रमांक | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ३१/ २४-२५ | ८३,६३९.०० | १ अ | **गायकवाड छाया भीमराव** रा. सरकारी दवाखानाजवळ, पोस्ट कुरुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| | | | १ ब | **गायकवाड सतीश भीमराव** रा. सरकारी दवाखानाजवळ, पोस्ट कुरुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| २ | ३५/ २४-२५ | १,६३,७१७.०० | १ अ | **कांबळे मायाबाई सुर्यकांत** रा. मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर |
| | | | १ ब | **कांबळे सुर्यकांत चंद्रकांत** रा. मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर |
| ३ | ४०/ २४-२५ | ४७,१०५.०० | १ अ | **शिंदे दिपाली तानाजी** रा. पोस्ट लोंढेवाडी, ता. माढा, जि. सोलापूर |
| | | | १ ब | **शिंदे तानाजी अर्जुन** रा. पोस्ट लोंढेवाडी, ता. माढा, जि. सोलापूर |
| ४ | ४१/ २४-२५ | १,४९,७७८.०० | १ अ | **पाटेकर वंदना संतोष** रा. जुनी मराठी शाळेजवळ, पोस्ट अंकोली, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| | | | १ ब | **पाटेकर संतोष मच्छिंद्र** रा. जुनी मराठी शाळेजवळ, पोस्ट अंकोली, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| ५ | ४४/ २४-२५ | १,०९,०८९.०० | १ अ | **वाघमोडे राणी सुनील** रा. मु.पो. शेटफळ, मोहोळ, जि. सोलापूर |
| | | | १ ब | **वाघमोडे सुनील नवनाथ** रा. मु.पो. शेळफळ, मोहोळ जि. सोलापूर |
| ६ | ४५/ २४-२५ | १,०७,४१०.०० | १ अ | **अत्तार रेहाना रशीद** रा. अण्णा भाऊ साठे नगर, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| | | | १ ब | **अत्तार जाफर रशीद** रा. अण्णा भाऊ साठे नगर, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| ७ | ५१/ २४-२५ | ८६,८४८.०० | १ अ | **माळी सुरेखा हेमंत** रा. शिवाजी नगर, पोस्ट मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर |
| | | | १ ब | **माळी हेमंत किसन** रा. शिवाजी नगर, पोस्ट मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर |
| ८ | ६८/ २४-२५ | ८४,२४९.०० | १ ब | **साळुंखे रंजीत भगवान** रा. स्टेशन रोड, स्वामी समर्थ चौक, पोस्ट मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर |
| ९ | ६९/ २४-२५ | २५,७३९.०० | १ अ | **लोकरे रतन चंद्रकांत** रा. कोळी गल्ली, पोस्ट सौंदणे, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| | | | १ ब | **लोकरे तानाजी चंद्रकांत** रा. कोळी गल्ली, पोस्ट सौंदणे, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| १० | ३२/ २४-२५ | १,२२,७७२.०० | १ अ | **दावन सुरेखा लहू** रा. पोस्ट बिटले अनगर, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| | | | १ ब | **दावन लहु शंकर** रा. पोस्ट बिटले अनगर, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| ११ | ४८/ २४-२५ | १,७१,१८५.०० | १ अ | **मोमाले सुजाता नागनाथ** रा. मु. यल्लमावाडी, पो. देगाव वाळूज, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| | | | १ ब | **मोमाले नागनाथ दत्तात्रय** रा. मु. यल्लमावाडी, पो. देगाव वाळूज, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| १२ | ५६/ २४-२५ | १,०८,१११.०० | १ अ | **बटाणे पूजा सोनबा** रा. बटाणे वस्ती, पोस्ट सय्यद वरवडे, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| | | | १ ब | **बटाणे सोनबा विलास** रा. बटाणे वस्ती, पोस्ट सय्यद वरवडे, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| १३ | ६४/ २४-२५ | १,७३,३६६.०० | १ अ | **उकंडे लक्ष्मी समाधान** रा. मु.पो. मसलेचौधरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| | | | १ ब | **उकंडे समाधान शिवाजी** रा. मु.पो. मसलेचौधरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| १४ | ६५/ २४-२५ | ४६,४५५.०० | १ अ | **मिसाळ द्रोपदी अविनाश** रा. देवकर वस्ती, पोस्ट येल्लमवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| | | | १ ब | **मिसाळ द्रोपदी अविनाश** रा. देवकर वस्ती, पोस्ट येल्लमवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| १५ | ७०/ २४-२५ | ३४,४३५.०० | १ अ | **शिरसट शारदा प्रकाश** रा. पो. मसलेचौधरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| | | | १ ब | **शिरसट केशव प्रकाश** रा. पो. मसलेचौधरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| १६ | ७४/ २४-२५ | ५४१७१.०० | १ अ | **शेख अनिशा माजित** रा. पो. मसलेचौधरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| | | | १ ब | **शेख माजीत ख्वाजाभाई** पो. मसलेचौधरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| १७ | ७५/ २४-२५ | ३१३२०.०० | १ अ | **शिरसट छाया पोपट** रा. पो. मसलेचौधरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| | | | १ ब | **शिरसट पोपट संदिपान** रा. पो. मसलेचौधरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर |

या कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील जाब देणार यांना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतु जाब देणार समन्स रुजु न झाल्याने / त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरचे जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार - मंगळवार दि. २७/०८/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

म्हणून दिनांक १३/०८/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...




### सोलापुरात १५ ऑगस्टपासून दुर्मिळ घरगुती वनस्पतींचे प्रदर्शन

**सोलापूर दि. १३ ऑगस्ट-**

आत्मकला बहुउद्देशीय संशोधन संस्था व लीली नर्सरी सोलापूर यांच्या वतीने वृक्ष प्रेमींसाठी दुर्मिळ शोभिवंत वनस्पतींचे श्रावण सरी प्रदर्शन १५ ते १९ ऑगस्ट दरम्यान सकाळी दहा ते रात्री आठ या वेळेत समाचार भवन ३४० शुक्रवार पेठ समाचार चौक येथे आयोजित केले आहे. सोलापूरकरांना निशुल्क हे प्रदर्शन पाहावयास मिळणार आहे. वृक्षप्रेमी संघटना विविध सामाजिक संघटना, शालेय विद्यार्थी तसेच पर्यावरणात काम करणारे सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी या प्रदर्शनास भेट द्यावी, असे संयोजक त्रिभुवन जयंतराव जक्कल यांनी कळविले आहे.

### कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ५ हजारांचे अर्थसहाय्य

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

जिल्ह्यातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना शासनाकडून आर्थिक मदत मिळणार असून त्यांची यादी शासनाकडूनच जिल्हा कृषी कार्यालयाकडे प्राप्त झाली आहे. राज्याच्या कृषी विभागाकडून मिळणारे हे अर्थसाहाय्य खरीप २०२३ मधील ई-पीक पाहणी पद्वारे पिकांची नोंद केलेल्या शेतकऱ्यांनाच मिळणार आहे. दुसरीकडे ज्या क्षेत्रावर सामाईक खातेदार आहेत, त्यापैकी एका खातेदाराच्या आधारलिंक असलेल्या बँक खात्यात अर्थसाहाय्य जमा होणार आहे. अर्थसाहाय्य मिळण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्यांनी १४ ऑगस्टपर्यंत कागदपत्रे कृषी सहाय्यकांकडे जमा करावीत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

### रानभाजी महोत्सवाचे आज फडकुले सभागृहात आयोजन

**सोलापूर दि. १३ ऑगस्ट-**

प्रकल्प संचालक आत्मा (कृषी) यांच्या वतीने दि. १४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता रानभाजी महोत्सव येथील डॉ. निर्मल कुमार फडकुले सभागृहात आयोजित केला आहे. या महोत्सवाचा शुभारंभ जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या उपस्थितीत होणार आहे. रानभाज्यांचे महत्व प्रसारित व विपणन साखळी निर्माण करणे करीता २०२४-२५ या वर्षी हा महोत्सव क्रांती दिनाचे निमित्ताने दि. ०९ ते १५ ऑगस्ट या कालावधीमध्ये सप्ताह स्वरूपात राबविणेत येत असून, शेत शिवारातील रानभाज्याचे आरोग्य विषयक महत्व सर्वसामान्य नागरीकांना माहित होण्यासाठी व उत्पादक ते ग्राहक अशी विक्री साखळी व्यवस्था बळकट करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आरोग्यदायी राजभाज्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आत्मा व कृषि विभागाने केले आहे.

### प्लास्टिकच्या राष्ट्रध्वज निर्मिती व विक्रीस बंदी : मनिषा कुंभार

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजाकरिता प्लास्टिकच्या वापरास व विक्रीस मान्यता नाही. तसेच राष्ट्रध्वज रस्त्यावर वा अन्य ठिकाणी फेकून देवू नयेत. राष्ट्रध्वज खराब झाल्याचे आढळून आल्यास ते ध्वजसंहितेतील तरतुदीनुसार नष्ट करणे आवश्यक असते. राष्ट्रध्वजाचा अवमान करणे व त्याची विटंबना होणे हे बोधचिन्ह व नांवे ( अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम १९५० व राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम, १९७१ तसेच ध्वजसंहितेच्या तरतुदीनुसार दंडनीय अपराध आहे. शहर व जिल्ह्यातील सर्व जनतेस १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या ७८ व्या समारंभ निमित्ताने शुभेच्छासह ध्वज संहितेच्या नियमाचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी केले आहे.

### बसमध्ये चढताना दहा हजारांचा मोबाईल पळवला

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

सात रस्ता येथील कारागीर पेट्रोल पंपासमोर रस्त्यावरून विजापूर रोडला जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने दहा हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना १२ ऑगस्ट रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास सात रस्ता येथे घडली.याप्रकरणी श्रीधर जगदेव मेडेदार (वय ३४, रा.सिंदगी रोड, इंडी, कर्नाटक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार मुलाणी हे करीत आहेत.

## आयुक्तांच्या गाडीवर ड्रेनेजचे पाणी ओतल्याचा निषेध

# पालिका कर्मचारी, अधिकाऱ्यांची निदर्शने

### जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्तांना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ ऑगस्ट-**

महापालिका आयुक्तांच्या गाडीवर ड्रेनेजचे पाणी ओतल्याच्या निषेधार्थ आज सकाळी महापालिकेत इंद्रभुवन समोर कर्मचारी व अधिकाऱ्यांनी काळ्या फिती लावून निदर्शने केली. निषेधाच्या जोरदार घोषणांनी परिसर दणाणून सोडला. दरम्यान, याबाबत जिल्हाधिकारी आणि पोलीस आयुक्तांना निवेदन देण्यात आले.



सम्राट चौक जवळ असलेल्या मातोश्री रमाबाई आंबेडकर नगरात अनेक घरांमध्ये ड्रेनेजचे पाणी पसरते. महापालिकेत निवेदन द्यायला आले असता आयुक्त मीटिंगमध्ये असल्याने आयुक्त भेटणार नाहीत असे सांगण्यात आल्याने भीम आर्मी भारत एकता मिशनच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिकेत महापालिका आयुक्तांच्या शासकीय गाडीवर ड्रेनेजचे घाण पाणी ओतल्याची घटना काल घडली होती. या घटनेच्या निषेधार्थ आज सकाळी महापालिका आवारात इंद्रभुवन समोर महापालिकेच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी काळ्याफिती लावून निषेध नोंदविला. निषेधाच्या जोरदार घोषणा देण्यात आल्या. काळ्याफिती लावूनच कामकाज करण्यात आले. याबाबत जिल्हाधिकारी आणि पोलीस आयुक्तांना निवेदन देण्यात आले.

यावेळी महापालिका उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक संचालक नगर रचना मनीष भिष्णुरकर, सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक लक्ष्मीनारायण दोंतुल, मिळकतकर विभागाचे प्रमुख युवराज गाडेकर,अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक मुर्तुजा शहापुरे, सहाय्यक कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी नितीन साठे, महापालिका आरोग्य निरीक्षक संघटनेचे अध्यक्ष शेषराव शिरसट , उद्यान विभागाचे अध्यक्ष किरण जगदाळे , पर्यावरण विभागाचे प्रमुख अक्षय मोरे, युसिडी विभागाचे व्यवस्थापक समीर मुलाणी, मतीन सय्यद जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार अजून सहा कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### खेदजनक निंदनीय घटनेचा निषेध : शिरसट

काल घडलेली घटना निंदनीय खेदाची आहे. ज्यांनी हा प्रकार केला त्यांचा निषेधच आहे. म्हातारी मेल्याचं दुःख नाही पण काळ सोकावेल. आज केवळ गाडी आहे. उद्या अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांसोबत असा प्रकार घडण्याची शक्यता आहे. स्वतःचे मोठेपण दाखवणाऱ्या प्रवृत्तीच्या निषेध ! यापुढे अशा व्यक्तींना पायबंद घालण्यासाठी पोलीस आयुक्तांना निवेदन देण्यात येईल, असे महापालिका आरोग्य निरीक्षक संघटनेचे अध्यक्ष शेषराव शिरसट यांनी यावेळी स्पष्ट केले.

#### मानसिक खच्चीकरण करणाऱ्या प्रवृत्तीला विरोध : उपायुक्त लोकरे

कर्तव्यावर असणाऱ्या अधिकाऱ्यांबाबत असे प्रकार घडू नयेत. महापालिका कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या पदाला व महापालिकेच्या प्रॉपर्टीला धक्का लावणी ही गंभीर बाब आहे. आंदोलनाचा अधिकार सर्वांना आहे. पण ते विधायक मार्गाने असावे. आज घाण पाणी गाडीवर टाकले, उद्या आणखी काही विपरीत गोष्ट घडल्यावर काय करायचे ? आमचा कोणत्याही व्यक्तीस विरोध नाही तर मानसिक खच्चीकरण करणाऱ्या वृत्तीला व प्रवृत्तीला विरोध आहे. महापालिकेतील कर्मचारी व अधिकाऱ्यांवर अन्यायाला विरोध असेल. सर्वांनी कामे व्यवस्थित करावीत.कामगार हितासाठी कटिबद्ध आहोत. कालच्या घटनेचा जाहीर निषेध आहे, अशी भावना महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी यावेळी व्यक्त केली.

## भीम आर्मीच्या चौघांवर गुन्हा

### आयुक्तांच्या वाहनांवर ड्रेनेजचे पाणी फेकल्याने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

घोषणाबाजी करून महापालिकेमध्ये आंदोलन करून पालिका आयुक्तांच्या वाहनावर ड्रेनेजचे पाणी फेकणाऱ्या भीम आर्मीच्या चार जणांविरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

ही घटना १२ ऑगस्ट रोजी दुपारी सव्वा बारा ते एक वाजण्याच्या दरम्यान सोलापूर महापालिका येथे घडली. याप्रकरणी शिवाजी माणिक गायकवाड (वय-५१, रा. तुळजाभवानी नगर, शेळगी तुळजापूर रोड, तळे हिप्परगा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अजय संतोष मैंदर्गीकर, श्रीकांत भिकाजी कांबळे, संगपाल परमेश्वर भांगे व सुरज नामदेव गायकवाड (सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

भीम आर्मीच्या अजय मैंदर्गीकर, श्रीकांत कांबळे, संगपाल भांगे, सुरज गायकवाड यांनी भीम आर्मी की जय हो आयुक्त साब तुम होश मे आओ अशी घोषणाबाजी करून आमच्या आंदोलनामध्ये कोणीही मध्ये पडू नका, नाहीतर तुम्हाला बघून घेईल तुमच्या जीवाचे बरे वाईट करीन अशी धमकी दिली. तसेच मोठमोठ्याने आरडाओरडा करून एका प्लॅस्टिकच्या ड्रममध्ये ड्रेनेज पाणी घेऊन आयुक्त मॅडम यांच्या वाहन क्रमांक एमएच १३ ईसी ३३२० या वाहनाच्या काचेवर व बोनेटवर टाकून नुकसान केले. पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक संजीवनी व्हट्टे या करित आहे.

## दुचाकीच्या धडकेत एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट -**

दुचाकीच्या धडकेत एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना २ ऑगस्ट रोजी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास जूना पूना नाका परिसरातील हॉटेल ॲम्बेसेटर समोर घडली. याप्रकरणी मंगल मधुकर नरुणे (वय ५६, रा.शिवगंगा नगर शेळगी) यांच्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गणेश शेखर सोनकर (वय २५, रा. रेल्वे लाई, कोनापूरे चाळ) याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. मंगल व त्यांचा मुलगा नितीन मधुकर नरुणे हे पायी चालत रस्ता ओलांडत होता. त्यावेळी गणेशने त्याच्या ताब्यातील दुचाकी वाहन क्रमांक एमएच १३ ईजी ९०८० हे निष्काळजीपणाने व भरधाव वेगात चालवून नितीन यास जोरदार धडक देऊन गंभीर जखमी केले. जखमी नितीनचा उपचारादरम्यान मयत झाल्याने पुढील तपास पोलीस नाईक भद्रशेट्टी करीत आहेत.

## कास्ट्राईब संघटनेचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**



कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्यावतीने राज्यध्यक्ष कृष्णा इंगळे यांच्या आदेशानुसार संपूर्ण राज्यात एक दिवसीय धरणे आंदोलन पुकारण्यात आले होते. त्या अनुषंगाने सोलापूर येथील कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, जिल्हा शाखेचे जिल्हाध्यक्ष मनिष सुरवसे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील पुनम गेट येथे विविध मागण्यांसाठी एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

याबाबत दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मागासवर्गीय पदोन्नतीमधील आरक्षण तात्काळ लागू करावी, २००५ नंतरच्या कर्मचारी शिक्षक, शिक्षकेतर यांना जुनी पेन्शन लागू करण्यात यावी, सरळ सेवा भरतीमधील मागासवर्गीयांचा अनुशेष तात्काळ भरण्यात यावा आणि राज्यातील कंत्राटी नोकर भरती धोरण रद्द करण्यात यावे या व इतर मागण्यांसाठी मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवून एक दिवसीय धरणे आंदोलन केले. या मागण्यांचे निवेदन अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर यांना देण्यात आले.

यावेळी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष गिरीश जाधव, जिल्हा परिषद शाखेचे अध्यक्ष अरुण क्षीरसागर, उमाकांत राजगुरू, नरसिंग गायकवाड, महसूल शाखेचे अध्यक्ष प्रसाद सोनवणे, सलीम शेख, विजयकुमार इंजेवाड, सोलापूर विद्यापीठ शाखेचे अध्यक्ष रवी शिंदे, विकास राठोड, हिप्परगे, शिरीष बंडखोर, जलसंपदा शाखेचे अध्यक्ष शरण अहिवळे, अजय कोनापूरे, शशिकांत माने, सचिन देसाई, सिद्धेश्वर नागणसूर सिद्धेश्वर नागणसूर, कोषागार शाखेचे अध्यक्ष कुलदीप सोनवणे, इम्तियाज शेख, विशाल गायकवाड, छबू काळे, आरटीओ शाखेचे अध्यक्ष विकास रणदिवे, महेश इंगवले, मुजम्मिल शेख, पवार, खुडे, कांबळे, हिप्परगे, नगरपरिषद पंढरपूर शाखेचे अध्यक्ष ॲड.किशोर खिलारे, आकाश बनसोडे किशोर दंदाडे आदी पदाधिकारी व सभासद उपस्थित होते. यावेळी महासंघाचे जिल्हा सचिव अरविंद जेटीथोर, कार्याध्यक्ष कल्याण श्रावस्ती, कोषाध्यक्ष विजयकुमार लोंढे, संघटक लक्ष्मण गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

## नूमवि, मेहता, दिगंबर जैन गुरुकुल हायस्कूलने मारली बाजी

### 'शिवस्मारक'तर्फे देशभक्तीपर समूहगान स्पर्धा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि १३ ऑगस्ट-**



श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ शिवस्मारकतर्फे घेण्यात आलेल्या देशभक्तीपर समूहगान स्पर्धेत विविध गटांमध्ये नूमवि प्राथमिक शाळा, वि. मो. मेहता प्रशाला आणि दिगंबर जैन गुरुकुल हायस्कूलने प्रथम क्रमांक पटकावला. पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर पोलीस उपायुक्त विजय कबाडे, शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, संचालिका माधवी कुलकर्णी, परिक्षक अतुल बेले, शर्वरी कुलकर्णी उपस्थित होते. प्रारंभी स्पर्धेचे उद्घाटन कर्नल (नि.) विनायक तांबेकर यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेत तीनही गटात मिळून ३१ संघ सहभागी झाले.

पहिली ते चौथी, पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी अशा तीन गटांमध्ये शालेय स्तरावर ही स्पर्धा झाली. प्रत्येक गटातील प्रथम विजेत्या संघास ५ हजार आणि सन्मानचिन्ह, द्वितीय विजेत्या संघास ३ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह तर तृतीय विजेत्या संघास २ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह देण्यात आले. तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र आणि जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराजांचे वंशज हभप शिरीष महाराज मोरे लिखित छत्रपती शिवाजी महाराज समजून घेताना हे पुस्तक भेट देण्यात आले.

यावेळी शिवस्मारकचे कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी, व्यवस्थापक मल्लिनाथ व्हटकर आदी उपस्थित होते. संचालिका माधवी कुलकर्णी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. संचालक प्रसाद जिरांकलगीकर यांनी सूत्रसंचालन केले. सचिव गंगाधर गवसने यांनी आभार मानले.

#### स्पर्धेचा निकाल याप्रमाणे (प्रथम तीन)

**पहिली ते चौथी गट :** नूमवि प्राथमिक शाळा, इंडियन मॉडेल स्कूल, वि. मो. मेहता प्राथमिक शाळा.

**पाचवी ते सातवी गट :** वि. मो. मेहता प्रशाला, सेवासदन प्रशाला, हरिभाई देवकरण प्रशाला.

**आठवी ते दहावी गट :** दिगंबर जैन गुरुकुल हायस्कूल, मल्लिकार्जुन हायस्कूल, सखुबाई हिराचंद नेमचंद प्रशाला.

## शहरातून दोन दुचाकींची चोरी

**सोलापूर :** शहरात दुचाकी चोरीच्या दोन घडना उघडकीस आल्या आहेत. मं.आसिफ मं.शरीफ मुच्छाले (वय ४२, रा. मुस्लीम पाच्छा पेठ, नुराणी मशिदजवळ) यांनी १० ऑगस्ट रोजी त्यांची एमएच १३ एक्स ०६५५ क्रमांकाची दुचाकी कुमठा नाका येथील बालाजी मंदीराच्या पाठीमागे पार्क केली होती. ती चोरट्याने चोरूल्याची नोंद सदर बझार पोलिस ठाण्यात झाली आहे. हवालदार मोरे तपास करीत आहेत. दुसऱ्या घटनेत नरसिंह औदुंबर आकुडे (वय ४८, रा. वारद चाळ, मुरारजी पेठ) यांनी त्यांची एमएच १३ सीसी ६२६६ क्रमांकाची दुचाकी ही १० ऑगस्ट रोजी सकाळी घराच्या बाजूस पार्क केली होती. ती दुचाकी अज्ञात चोरट्याने चोल्याची नोंद फौजदार चावडी पोलिस ठाण्यात झाली आहे. पोलिस नाईक कामुर्ती तपास करीत आहेत.

## श्री राजस्थानी विकास मंडळातर्फे उद्या रक्तदान शिबीर

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

श्री राजस्थानी विकास मंडळाच्या वतीने दि. १५ ऑगस्ट रोजी रक्तदान शिबीर आयोजित केल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष माणिकचंद डागा व सचिव कल्पेश मालू यांनी पत्रकार परिषदेत दिली. कस्तुरबा मंडईजवळील ओम सच्चिदानंद वाचनालयात सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत रक्तदान शिबीर होणार आहे. १९९६ पासून मंडळाचे संस्थापक स्व. श्री रामनिवास जाजू यांच्या प्रेरणेने हे शिबिर दरवर्षी घेण्यात येते. आता पर्यंत २१हजार ६०० रक्त बाटण्याचे संकलन करण्यात आले आहे. मंडळाद्वारे विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये ओम सच्चिदानंद वाचनालय, मोफत वृत्तपत्र वाचन, गीता प्रेस पुस्तकालय, मारवाडी गुर्जर स्मशानभूमी देखरेख, मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदु ऑपरेशन, महाशिवरात्रीला शंकराच्या मूर्तीस अभिषेक, गरजू लोकांना वैद्यकीय आणि शैक्षणिक मदत, विविध प्रशिक्षण, समाजभूषण पुरस्कार, सामाजिक विषयावर व्याख्याने, गुणवंत विद्यार्थी पुरस्कार आदी कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. या पत्रकार परिषदेस विश्वस्त विजय जाजू, अशोक गौड, रमेश बियानी, राजाराम उपाध्ये उपस्थित होते.

## महादेवांना बिल्वपत्र वाहणे ठरते लाभदायक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि १३ ऑगस्ट -**

पवित्र श्रावण महिन्यानिमित्त ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिरात बिल्वपत्र अर्पण करण्यास भक्तांची मंदिरात मोठी गर्दी होत आहे. श्री सिद्धरामेश्वर महाराजांनी सोलापूर शहर परिसरात स्थापन केलेल्या ६८ शिवलिंगाला देखील भाविकांकडून बिल्वपत्र अर्पण केले जाते. श्रावण महिन्यात विशेष करून बिल्वपत्र अर्पण करण्यास भाविक प्रत्येक ६८ शिवलिंगाची यात्रा करतात.

दरम्यान भोलेनाथाला बेलाची पाने खूप प्रिय आहेत. म्हणूनच भगवान शंकराच्या पूजेमध्ये बिल्वपत्रांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. पवित्र श्रावणात बिल्वपत्र वाहणे सर्वाधिक महत्त्वाचे असते. भक्तिभावाने ॐ नमःशिवाय हा मंत्र जपून शिवलिंगावर बिल्वपत्र वाहिले जाते. भोलेनाथाला बेल वाहताना तो ओला करून पालथा वाहवा. बेल वाहताना बेलाचे अग्र उत्तरेस असावे.



भक्तिभावाने ॐ नमः शिवाय हा मंत्र म्हणून तो अर्पण केला जातो. बेलपत्रामध्ये त्रिदेवता निवास करतात. भगवान शंकरास बेल वाहावा. तसेच अमावास्या, अष्टमी, नवमी, चतुर्दशी, संक्रांती आणि सोमवार या दिवशी बेलपान तोडू नये. त्रिदलं त्रिगुणाकाराम त्रिनेत्रचं त्रियायुधम। त्रीजन्मपापं संहारकं एक बिल्वमं शिवार्पणम. श्रावण महिन्यात श्री शंभू महादेवाला दररोज, सोमवारी १०८ बेलपाने व बेलफळ वाहतात. बेलाच्या झाडाला भगवान महादेवाचे स्वरूप मानतात. तसेच याला श्रीवृक्षसुद्धा म्हणतात. या झाडाच्या मुळामध्ये देवी गिरिजा, बुडामध्ये देवी माहेश्वरी, फांद्यामधे देवी दाक्षायनी, खोडामध्ये व पानामध्ये देवी पार्वती, फळामध्ये देवी कात्यायनीचा वास असल्यामुळे हे पान (बिल्वपत्र) भगवान शंकरास अर्पण करतात.

#### श्रावणात शिवामूठीबरोबरच भगवान शंकराला बेलपत्र वाहण्याची परंपरा

श्रावणात वेळ मिळेल त्याप्रमाणे शिवाची जास्तीत जास्त आराधना केली पाहिजे. शिवाची पूजा षोड्शोपचार पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. श्रावणात शिव मूठ वाहणे लाभदायक असते. यंदा श्रावणात पाच सोमवार आले आहेत. श्रावणातील सर्व सोमवारी उपवास करावा. यंदा पाच सोमवार आहेत त्यामुळे पाचव्या सोमवारी सातू महादेवाला वाहावेत. १०८ बेलांवर रामाचे नाव लिहून ते वाहावेत. फुले अर्पण करावी. पीतांबर शिवलिंगावर चढवावा. माता पार्वतीची ओटी भरावी आणि संपूर्ण शिव परिवाराला जल अर्पण करावे.

**- वेदमूर्ती चिदानंद स्वामी**, पुरोहित.

## सोने, पैसे परत न करता साडेतीन लाखांचा अपहार करणाऱ्या महिलेविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट -**

विश्वासघात करून सोने, पैसे परत न करता ३ लाख ५९ हजार ३२० रुपयाचा अपहार केल्याप्रकरणी एका महिलेविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना १७ जुन रोजी दमानी नगर येथे घडली. याप्रकरणी फरजाना आसिफ मुल्ला (वय ३६, रा. यश नगर भाग २, अभिमानश्री जवळ, मुरारजी पेठ) या महिलेच्या फिर्यादीवरुन पुजा सुरज घोगरे (रा. दमाणी नगर, गवळी वस्ती) हिच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. फरजाना मुल्ला यांचे दमाणी नगर येथे ज्वेलर्सचे दुकान आहे. या दुकानात काम करणारे सुवर्णा शिंदे यांच्या ओळखीची महिला पूजा घोगरे हिला कामाची गरज असून, दुकानात काम द्या असे म्हणाल्याने पूजा हिला मुल्ला यांनी त्यांच्या ज्वेलर्स दुकानात कामाला ठेवले. त्यानंतर एक वर्ष काम केल्यावर १७ जुलै २०२३ रोजी पुजा हिचा वाढदिवस असल्याने दोन दिवसाच्या मुदतीत पैसे देण्याच्या अटीवर तिच्या मागण्याप्रमाणे ३ लाख ५९ हजार ३२० रुपये किमतीचे गंठण, पेंडल, ब्रासलेट, लक्ष्मी हार व छोटे नेकलेस असे एकूण सहा तोळ्याच्या तोळ्याचे दागिने दिले होते. त्यानंतर पूजा हिने त्या बदल्यात सोने व पैसे परत न करता विश्वासघात करून अपहार केला. तब्बल एक वर्षानंतर दि.१२ ऑगस्ट २०२४ रोजी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक मोरे-पाटील पुढील तपास करीत आहेत.


दत्ता आराध्ये


रोहिणी तडवळकर


वासुदेव जोशी

# अ.भा.देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या कार्यकारणीत सोलापूरचे तिघे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

अखिल भारतीय देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक नुकतीच बिनविरोध पार पडली. यामध्ये नगरचे महेंद्र गंधे हे अध्यक्षपदी बिनविरोध निवडून आले. तसेच या मंडळावर सोलापूरच्या तिघांची बिनविरोध निवड झाली. यामध्ये देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूरचे उपाध्यक्ष दत्ता आराध्ये व मंगळवेढ्याचे वासुदेव उर्फ नाना जोशी यांची कार्यकारिणी सदस्य म्हणून, पश्चिम महाराष्ट्र परिसरातून सोलापूरच्या रोहिणी तळवळकर आणि मंगळवेढ्याचे वासुदेव उर्फ नाना जोशी यांचा समावेश आहे. मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा ११ ऑगस्ट रोजी मुंबईच्या दादर परिसरातील मध्यवर्ती मंडळाच्या सभागृहात झाली. त्या सभेमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. राजेश मुधोळकर यांनी निवडणुकीचा निकाल जाहीर केला. त्यानंतर नूतन अध्यक्ष महेंद्र गंधे यांच्या अध्यक्षतेखाली नूतन कार्यकारी मंडळाची सभा झाली त्यामध्ये विविध पदाधिकारी निवडण्यात आले.

# देशाला संकल्पित मातृशक्तीची गरज

## मातृप्रेरणा विशेषांकाचे प्रकाशन कार्यक्रमात राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका शांताक्का यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तेवा,**
**पुणे, दि.१३ ऑगस्ट-**

प्रेम, त्याग आणि आपलेपणाचा भाव म्हणजे मातृत्व होय. भारतीय महिलांमध्ये हे मातृत्व जागृत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना घडविणाऱ्या राजमाता जिजाऊंप्रमाणेच आजच्या महिलांमध्ये संकल्पित मातृशक्तीची गरज आहे, असे मत राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका व्ही. शांताक्का यांनी व्यक्त केले.

येथील गणेश सभागृहात आयोजित मातृप्रेरणा विशेषांकाच्या प्रकाशन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी संस्कृती जागरण मंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीरंग गोडबोले, लेखिका शेफाली वैद्य, सांस्कृतिक वार्तापत्राचे संपादक मिलिंद शेटे, अतिथी संपादक विनिता तेलंग आदि उपस्थित होते. राजमाता जिजाऊ यांच्या



३५० व्या स्मृतीवर्षानिमित्त सांस्कृतिक वार्तापत्राच्यावतीने हा अंक प्रकाशित करण्यात आला आहे.

शांताक्का पुढे म्हणाल्या, ''क्षमता असतानाही करिअरसाठी मातृत्व नाकारणे योग्य नाही. महिलांनी आई म्हणून राष्ट्र निर्मितीतील आपले कर्तव्य समजून घ्यायला हवे. जागृत देशभक्त नागरिकांच्या निर्मितीसाठी संकल्पित मातृशक्ती गरजेची आहे.'' शेफाली वैद्य म्हणाल्या, ''मातृत्व म्हणजे केवळ मुलांना जन्म देणे नाही. तर त्यामागे एक सांस्कृतिक विचार आहे. आपण सर्वस्व ओतून मुलांना स्वयंपूर्ण बनविणे म्हणजे मातृत्व होय. राजमाता जिजाऊ आणि अहिल्यादेवींनी त्यांचे मातृत्व या देशातील नागरिकांना समर्पित केले. केवळ महिलाच नाही तर पुरुषामध्ये देखील मातृत्व असते. म्हणूनच आपण ज्ञानेश्वरांना माऊली असे म्हणतो.'' विविध मार्गाने हिंदुत्वाची तार छेडण्याचे काम सांस्कृतिक वार्तापत्र करते, असे मत मिलिंद शेटे यांनी व्यक्त केले. व्यवस्थापक सुनीता पेंढारकर यांनी सूत्रसंचालन केले. मेघना घांगरेकर यांनी आभार मानले.



# सिंहगड संस्थेचा ३१ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

केगांव येथील एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात सिंहगड संस्थेचा ३१ वा वर्धापन दिन सिंहगड संस्थेचे सहसचिव तथा सिंहगड सोलापूरचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला.

यावेळी प्राचार्य डॉ. शंकर नवले, इस्टेट ऑफिसर डॉ. दत्तात्रय नवले, उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे व डॉ. शेखर जगदे, डॉ. प्रदीप तपकीरे, डॉ. विजय बिरादार,डॉ. विनोद खरात उपस्थित होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. जगदे यांनी आपल्या प्रस्ताविकामध्ये सिंहगड संस्थेबद्दल व तसेच राबवली जाणारी कार्यप्रणाली याविषयी मार्गदर्शन माहिती सांगितली. यावेळी डॉ. प्रदीप तपकीरे यांनी सिंहगड संस्थेचे व्हिजन व मिशन याविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी इस्टेट ऑफिसर डॉ. दत्तात्रय नवले यांनी सिंहगड संस्थेचे स्थापना १२ ऑगस्ट १९९३ रोजी वेणूताई चव्हाण पॉलीटेकनिकल कॉलेज या लहान वटवृक्षापासून झालेली सुरवात ते आज पर्यंतच्या संस्थेच्या प्रवासाबद्दल व तसेच सिंहगडमध्ये कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी राबवली जाणाऱ्या कार्यप्रणाली याविषयी माहिती सांगितली. यावेळी प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी संस्थापक अध्यक्ष प्रा.एम. एन. नवले यांच्या व्हिजन आणि मिशन याविषयी माहिती सांगितली. सिंहगड संस्थेमध्ये ८ हजार कर्मचारी काम करतात व ९० हजार विद्यार्थी या संस्थेमधून शिक्षण घेत आहेत.

# नाट्यश्रीतर्फे सोलापुरात तीन दिवस भरतनाट्यम कार्यशाळेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

'नाट्यश्री स्कूल ऑफ परफॉर्मिग आर्टस' या नृत्य शाळेच्या वतीने 'कला संस्कृति संमेलन' भाग-२ आणि १५ ऑगस्ट ते १८ ऑगस्ट दरम्यान 'भरतनाट्यम कार्यशाळा' डॉ. फडकुले सभागृहात आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती रचना कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली. 'नाट्यश्री स्कूल ऑफ परफॉर्मिग आर्टस' या नृत्य शाळेने आयोजित केलेली असून याच्या संस्थापिका गुरु सौ. विणाश्री आळंगे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या कार्यक्रमामध्ये एकल १७ नृत्यप्रकार सादरीकरण होणार आहेत. सोलापूर आणि इतर शहरांमधील म्हणजेच बंगलुरू, मुंबई, दिल्ली, हैदराबाद आणि परदेशातील विदयार्थी देखील सहभागी होणार आहेत. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नृत्य समीक्षक विजय शंकर , गंधर्व महाविदयालयातील प्रा. तमन्ना नेअर, माजी महापौर शोभा बनशेट्टी आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. याच कार्यक्रमात तीन गुरुंचे नृत्य सादरीकरण होणार आहे. या पत्रकार परिषदेस दर्शना किरंडी, मानसी गांधी, प्रणाली कलशेट्टी आदी उपस्थित होते.



# पालिकेतर्फे हर घर तिरंगा अभियानास प्रारंभ

- तिरंगा कॅनव्हास, सेल्फी पॉईंटचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र शासनाकडून हर घर तिरंगा अभियानाला ९ ऑगस्ट २०२४ सुरुवात झाली. आज सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने अभियाना अंतर्गत दि. ९ ते १४ ऑगस्ट २०२४ पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

त्यामध्ये तिरंगा यात्रा, तिरंगा रॅली, तिरंगा दौड,आणि तिरंगा मॅरेथॉन तसेच तिरंगा संस्कृती कार्यक्रम, तसेच तिरंगा प्रतिज्ञा,तिरंगा सेल्फी इत्यादी कार्यक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. सोलापूर महापालिकेच्या वतीने इंद्रभुवन इमारत , बलिदान चौक येथील हुतात्मा स्तंभ , डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, नवी पेठ येथील प्राथमिक शिक्षण मंडळ या ठिकाणी तिरंगा विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. या मध्ये लोकप्रतिनिधी, प्रशासन, लोकसहभाग अशा सर्वांचा सहभाग राहणार आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने आज महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली- उगले यांच्या हस्ते तिरंगा कॅनव्हास व तिरंगा सेल्फीचे शुभारंभ करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप,उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त तैमुर मुलाणी, सहाय्यक आयुक्त ज्योती भगत पाटील, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, सहाय्यक नगररचना संचालक मनीष भिष्णूरकर, सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, वाहन अधीक्षक नागनाथ मेंडगुळे आदी अधिकाऱ्यांनी सुद्धा यावेळी सेल्फी काढली. यावेळी सर्व विभागाचे विभाग प्रमुख, खाते प्रमुख तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




### हर घर तिरंगा अभियानात सहभागी व्हा : आयुक्त तेली-उगले

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने ९ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट २०२४ हर घर तिरंगा अभियान राबविण्यात येत असून या अभियानामध्ये स्वातंत्र्य सैनिक, हौतात्म्य पत्करलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबिय, लोकप्रतिनिधी, माजी नगरसेवक, सामाजिक संघटना, संस्था तसेच सोलापूर शहरातील सर्व नागरिकांनी सहभाग नोंदवावा. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत आपल्या घरांवर या दिवशी तिरंगा फडकावण्यात यावा, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले आहे.

# गुळवंची तांडा, शिवाजी नगर परिसरातील हातभट्ट्यांवर कारवाई

- पाच गुन्ह्यात ३ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त
- राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट -**

राज्य उत्पादन शुल्क विभागाने मंगळवारी सकाळी गुळवंची तांडा व शिवाजीनगर परिसरातील हातभट्टींवर धाडी टाकून पाच गुन्ह्यात ८४५० लिटर रसायनासह तीन लाख १८ हजार ७५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

मंगळवारी विशेष मोहिमेत उत्तर सोलापूर तालुक्यातील गुळवंची तांडा येथील सरकारी ओढयाकाठी छापा टाकून करण राजू पवार (वय २८) यास १४०० लिटर रसायनासह अटक केली. तसेच गुळवंची तांड्याच्या पश्चिमेस आंब्याच्या झाडाजवळ एका हातभट्टी ठिकाणावरून सोळाशे लिटर रसायन जप्त करून जागीच नाश केले. केगाव येथील देशमुख वस्ती येथे नितीन सुरेश चव्हाण (वय २४) याच्या हातभट्टी निर्मिती ठिकाणावर छापा टाकून आठशे लिटर रसायन जप्त करून जागीच नाश केले. तसेच शिवाजीनगर केगाव येथील डेंटल कॉलेजच्या पाठीमागे असलेल्या दोन ठिकाणांवर छापे टाकून ४७०० लिटर रसायन जप्त केले. या संपूर्ण कारवाईत दोन आरोपींना अटक करण्यात आली.

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक नितीन धार्मिक यांच्या टीमने केली आहे.



# क्रीडा



# जगन्नाथ शिंदे चॅम्पियन बुद्धिबळ स्पर्धा सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

जगन्नाथ शिंदे चॅम्पियनशिप चषक आठव्या बुद्धिबळ स्पर्धेत चौथ्या फेरी अखेर बार्शीचा ध्रुव पाटील, उस्मानाबादचे महादेव भोरे, विशाल पटवर्धन, चंद्रशेखर बसर्गीकर, तेजस दौंडे (मंगळवेढा) गणेश घोरपडे (उस्मानाबाद), वरद लिमकर, अमित मुदगुंडी, प्रज्वल कोरे, साईराज घोडके यांनी चार फेरीत ४ गुण मिळवून आघाडी घेतली आहे.

जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक आठव्या बुद्धिबळ स्पर्धेत २५५ खेळाडूंचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. जगदीश मंगल कार्यालय सोलापूर येथे श्री रमा जगदीश महिला बहुउद्देशीय उत्कर्ष संस्थेद्वारा आयोजित करण्यात आलेल्याया स्पर्धेत ६,७,८,९,१०,११,१२,१५,२४ व खुला गट या वयोगटातील खेळाडूंना ८० पेक्षा जास्त चषक व रोख रक्कम मिळून सुमारे तीस हजार रुपयांची बक्षीस देण्यात येणार आहेत . या स्पर्धेत उस्मानाबाद लातूर टेंभुर्णी करमाळा अक्कलकोट उमरगा अशा विविध जिल्हा व तालुक्यातील गावांमधून अभूतपूर्व असा २५५खेळाडूंनी प्रवेश घेतला आहे. एकूण ११ स्पर्धांच्या मालिकेमधील ही आठवी स्पर्धा असून स्पर्धेच्या मालिका समाप्ती नंतर जास्तीत जास्त गुण घेतलेल्या चार गटातील चार खेळाडूंना सायकल चे बक्षीस देण्यात येणार आहे. ही स्पर्धा संपन्न करण्यासाठी प्रशांत पीसे ईरन्ना जमादार सम्मेद हुल्ले सचिन चव्हाण हरिओम नाईक बनसिद्ध बिराजदार गायत्री कुलकर्णी हे प्रमुख बुद्धिबळ पंच विशेष परिश्रम घेत आहेत.

# चॅलेंजर रनर फाउंडेशनच्या मॅरेथॉन स्पर्धेत पाचशे जण धावणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

'आपण सर्व फिटनेस कडे वळूया, देशभक्ती चा जागर करूया' हा संदेश देण्यासाठी ७७ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त चॅलेंजर रनर फौंडेशनच्या वतीने दि. १७ व १८ ऑगस्टला ७७, ३३, २२, १० व ४ किलोमीटरचे मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले असून या स्पर्धेत पाचशे जण धावणार आहेत, अशी माहिती चंद्रशेखर गायकवाड व अतिश शहा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

७७ व ३३ किलोमीटर अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धा दि. १७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता सोडण्यात येणार आहे. ७७ किलोमीटर सोनी कॉलेज ते छत्रपती संभाजी तलाव या रस्त्यावर धावणार आहेत. या ७७ किमी स्पर्धेमध्ये चार महिलांबरोबर डॉक्टर, पोलीस व उद्योगपती धावणार आहेत. विविध क्षेत्रातील मान्यवर बरोबर पोलीस आयुक्त एम. राजकुमार व अप्पर जिल्हाअधिकारी मोनिकासिंह ठाकूर, प्रयोजक जयहिंदचे गणेश माने - देशमुख, धाराशिवचे खा. ओमराजे निंबाळकर हे देखील २२ किमीसाठी धावणार आहेत.१८ ऑगस्ट रोजी सकाळी साडेपाच वाजता २२ किलोमीटर तसेच दहा किलोमीटर सुरुवात होईल त्यानंतर चार किलोमीटर फन रनची सुरुवात होईल. सहभागी होणाऱ्या खेळाडूंना टी-शर्ट, मेडल, बीब, इ- सर्टिफिकेट आणि नाश्ता देण्यात येणार आहे.

चॅलेंजर रनर फौंडेशन आयोजित सपोर्ट बाय बिग फिटनेस जिम यांच्या संयुक्त विद्यमानाने लांब पल्ल्याच्या धावण्याच्या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या मॅरेथॉनचे माने देशमुख जय हिंद ग्रुप हे प्रायोजक असून इंद्रधनु आपटे सह-प्रायोजक आहेत. या पत्रकार परिषदेस अरिहंत लोणावत, जय मैत्रस उपस्थित होते.




## नावात बदल

माझे जुने नाव नितीन श्रावण महाडकर असे होते ते आता बदलून नितीन श्रावण महाडकर असे ओळखले जाईल. अक्कलकोट येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर प्रतिज्ञा पत्र क्र. १७२४७/२०२४ दिनांक - ०९/०८/२०२४



# सिद्धेश्वर स्कूलच्या तिघांची विभागीय सिकई मार्शल आर्ट स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

शालेय शहर सिकई मार्शल आर्ट स्पर्धेत श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूलच्या तेजस कलागते, जयवर्धन गवळी व पवनकुमार चकोले यांनी अजिंक्यपद पटकाविले.

या कामगिरीवर तिघांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच भारती चिंता व वंशिका माळी यांनी उपविजेतेपद संपादिले. विजेत्या खेळाडूंना क्रीडाशिक्षक पवन भोसले यांनी मार्गदर्शन केले. त्यांचे श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण संकुलाचे चेअरमन धर्मराज काडादी, श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे सदस्य डॉ. राजशेखर येळीकर, भीमाशंकर पटणे, गुरुराज माळगे, मल्लिकार्जुन कळके व समन्वयक संतोष पाटील, मुख्याध्यापक योगेश राऊत, पर्यवेक्षिका नीता तमशेट्टी, ज्येष्ठ शिक्षिका रेणुका अरोरा यांनी अभिनंदन करुन विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# तालुका क्रिकेट स्पर्धेत ग्लोबल व्हिलेजला उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

पंचायत समिती दक्षिण सोलापूर, सोलापूर जिल्हा क्रीडा विभाग व कै. ब .ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुका क्रिकेट स्पर्धेत ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूलने उपविजेतेपद मिळविले.

१७ वर्षाखालील मुलांच्या अंतिम फेरीत पोहोचण्याआधी बोरामणीच्या ग्लोबल व्हिलेजने तीन सामने जिंकले. या संघास क्रीडा संयोजक प्रियंका बिराजदार, राहुल काळे, प्रदीप राठोड व निलोफर सय्यद आदींचे मार्गदर्शन लाभले.

या स्पर्धेचे उद्घाटन स्कूलच्या संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी व राज्य क्रीडा मार्गदर्शक गणेश पवार यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी दक्षिण सोलापूर क्रीडा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष प्राचार्य वीरेश थलंगे, संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. अनिकेत चनशेट्टी, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत डोके, क्रिकेट स्पर्धेचे संयोजक रवींद्र डोंबाळे, मुख्याध्यापिका अस्मा नदाफ आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी व सचिवा संगीता शहा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



**उपविजेता संघ**
उद्धव कवडे, राहुल कलशेट्टी, चेतन मस्के, महांतेश पटणे, आर्यन हक्के, रुद्र राऊत, ओम अचलारे, रविकांत उपासे, विवेक सर्जे, धनराज कोरे, पृथ्वीराज दुंगे, सुदेश शिंदे.

## त्वरित पाहिजेत

**सिक्युरिटी गार्ड, ऑफिस बॉय, सुपरवायझर, हाउसकीपिंग हेल्पर त्वरित पाहिजेत.**
- पत्ता -
गांधी नगर हेरिटेज मंगलकार्य, ज्यूस गॅलेक्सीजवळ
**संपर्क - ९१३०११२२७७**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर जिल्हयातील सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि व सब डि सोलापूर पैकी ता. दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील पंचायत समिती दक्षिण सोलापूर हद्दीतील शेतजमीन गट नं.९८८/१/अ यांस क्षेत्र १हे १० आर पैकी ०.५० आर यास आकार रुपये ०.५२ पैसे येणेप्रमाणे वर्णनाची शेतजमीन ही किसन महादेव नागणे यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची असून सदर शेतजमीन त्यांनी आमच्या अशिलांना खुषखरेदी देण्याचे ठरवून आमचे अशिलांकडून इसारा दाखल रक्कम स्विकारुन सदरची शेतजमीन निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी दिलेली आहे. तरी परंतु सदर शेतजमीनीत कोणाचाही कोणत्याही प्रकारे म्हणजे दान, गहाण, पोटगी, भाडेपट्टा, साठेखत, गहाणखत अथवा तत्सम दस्ताने हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ०८ (आठ) दिवसाचे आत खालील पत्यावर कागदोपत्री तक्रार/हरकत आर.पी.ए.डी. ने पाठवून दयावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर शेतजमीन निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल हे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही हरकत असल्यास ती आमचे अशिलांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली ता. १३/०८/२०२४

सही/-
श्री. धानय्या जी. चिवरी
व सौ. एम.डी. चिवरी (एम.एस. कुर्वलकर)
श्री. मयुरेश्वर धा. चिवरी
ॲडव्होकेटस्
२१५, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर.
कु. शिल्पा रामप्पा चिवडशेट्टी या अशिलातर्फे

## संक्षिप्त वृत्त



### हरिभाई देवकरण प्रशालेत राष्ट्रीय ग्रंथालय दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट -**

येथील हरिभाई देवकरण प्रशालेत भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला. प्रशालेच्या प्र. मुख्याध्यापिका दीपा फाटक, ज्येष्ठ पर्यवेक्षक हणमंत मोतीबने सर, पर्यवेक्षक लकेश कमळे, पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड यांच्या हस्ते डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्र. मुख्याध्यापिका दीपा फाटक मॅडम यांनी ग्रंथालय आणि वाचन संस्कृतीचे महत्व सांगितले. ग्रंथपाल महारुद्र कत्ते यांनी मनोगत व्यक्त केले. उपस्थितांचे आभार सौरभ कुलकर्णी यांनी मानले.

### अपोलो फर्टीलिटीतर्फे आज आयव्हीएफ पॉझिटिव्ह आणि डिलिव्हर्ड रुग्णांचा मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट -**

सम्राट चौकातील अपोलो फर्टीलिटीतर्फे बुधवार दिनांक १४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता आयव्हीएफ पॉझिटिव्ह आणि डिलिव्हर्ड रुग्णांचा मेळावा आयोजित केल्याची माहिती डॉ. मीनल चिडगुपकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. अपोलोच्या सम्राट चौकातील रुग्णालयात मेळावा होणार आहे. या




मेळाव्यात रुग्णांच्या अविश्वसनीय प्रवासाचा उत्सव विशद करण्यात येत आहे. ज्यांनी प्रगत प्रजनन उपचारांद्वारे यशस्वीपणे पालकत्व प्राप्त केले आहे, त्यांचा प्रवास शेअर करणार आहेत. अपोलोमध्ये हाय टेक होम बेबी रेट, या यशाला अत्याधुनिक सुविधा, वंध्यत्व तज्ज्ञ, समुपदेशक, भ्रूणशास्त्रज्ञ आणि पूर्णतः सुसज्ज प्रयोगशाळा आणि प्रशिक्षित स्टाफ व टीम वर्क कारणीभूत असल्याचेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस डॉ. कीर्ती कटारे उपस्थित होत्या.

### सद्गुरू संत बाळूमामा यांच्या पुण्यतिथीनिमित्त शनिवारपासून सप्ताह

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट -**


विजयपूर-पुणे या राष्ट्रीय महामार्गावरील उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथील सद- गुरू संत बाळूमामा यांच्या ५८ व्या पुण्यतिथीनिमित्त शनिवार दि. १७ ऑगस्टपासून सप्ताहाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सद्गुरू संत बाळूमामा मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील-बेलाटीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. या सप्ताहात दररोज सकाळी १० ते १२ यावेळेत सर्व कार्यक्रम होणार असून शनिवार, १७ ऑगस्ट रोजी शांताराम महाराज (ओवीकार) व भजन, कीर्तन झाल्यावर महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. रविवार, १८ ऑगस्टला सकाळी मेंढी पूजन दर्शन व महाप्रसाद, सोमवार, १९ ऑगस्टला मारूती



काळे (ओवीकार) यांचे भजन, कीर्तन आणि शेवटी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. मंगळवार, २० ऑगस्टला भजन, कीर्तन आणि महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. बुधवार, २१ ऑगस्टला भजन, कीर्तन आणि महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. गुरूवार, २२ ऑगस्टला रोजी दत्ता (महाराज) यांचे सांस्कृतिक भजनाचा कार्यक्रम, तसेच याचदिवशी दुपारी १२ वाजता गुलालाचे कीर्तन आणि महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार, २३ ऑगस्टला काल्याचे कीर्तन व सद्गुरू संत बाळूमामा यांचा पालखी सोहळा होणार असून यानंतर महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. सोमवार, २६ ऑगस्टला श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा दुपारी १२ वाजता होणार असून मंगळवार, २७ ऑगस्टला श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त गोपाळ काला, भजन कीर्तन होणार आहे. या पत्रकार परिषदेस सिद्राम वाघमोडे, अमर कांचन - पाटील उपस्थित होते.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या मुख्य संपादकपदी पदोन्नती झाल्याबद्दल प्रशांत माने यांना शुभेच्छा देताना शरदचंद्र राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार व माजी महापौर महेश कोठे उपस्थित होते.



सोलापूर : कार्यकारी संचालक दिलीप पेठे व मुख्य संपादक प्रशांत माने यांचा सत्कार करताना जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष तथा पंचवटी पतसंस्थेचे संस्थापक दिलीप पतंगे व सुमित पतंगे.

# यंदा जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांचा स्वातंत्र्य दिन गणवेशाविनाच!

- प्राथमिक शिक्षणाधिकारी मात्र शिक्षकांच्या इतर कामातच व्यस्त
- चिमुकल्यांचा हिरमोड झाल्याने पालकांतून तीव्र नाराजीचा सूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट -**

विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध रांगा. तिरंग्याला मानवंदना देत होणारे संचलन. स्वातंत्र्यदिनी सर्वच शाळांमधील हे चित्र यंदाही दिसेल. मात्र, त्याचा अविभाज्य भाग असलेल्या अनेक शाळांतील मुलांच्या गणवेशाची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवेल. बहुतांश शाळांपर्यंत अद्यापही गणवेश पोहोचलेला नसल्याने ही परिस्थिती उद्भवली आहे. राज्य शासनाच्या बदललेल्या धोरणामुळे बहुतांश शाळांमध्ये अद्याप गणवेशच पोहोचलेले नाहीत. परिणामी १५ ऑगस्टला शाळांचे झेंडावंदन गणवेशाशिवायच होणार आहे.

दरम्यान, प्राथमिक शाळेचे शिक्षणाधिकारी कादर शेख मात्र शिक्षकांच्या बदल्या, समायोजन, मुख्याध्यापक पदोन्नती, सुनावण्या आदी कामातच मग्न असल्याने दिसून येत आहे. खरं तर शिक्षणाधिकारी शेख यांनी किमान १५ ऑगस्टपर्यंत विद्यार्थ्यांना कसे गणवेश मिळतील, याकडे लक्ष द्यायला हवे होते. मात्र त्यांनी तसा प्रयत्न केल्याचे दिसत नसल्याची नाराजी अनेक चिमुकल्यांच्या पालकांतून व्यक्त होत आहे. दरवर्षी शालेय स्तरावर होणारी गणवेश खरेदीची पद्धत मोडीत काढून राज्याच्या पातळीवर एकच गणवेश लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला. कंत्राटदारांनी कापलेले कापड गट शिक्षणाधिकारी कार्यालयास पुरवून त्यानंतर स्थानिक महिला बचत गटांद्वारे गणवेश शिवून शाळेत द्यायचे आहेत. मात्र, अद्यापही गणवेश अनेक शाळांपर्यंत पोहोचलेले नाहीत. अपवाद वगळता बहुतेक शाळांना गणवेश मिळालेले नसून अनेक शाळा तर अद्याप १०० रुपयांत गणवेश शिवून देणाऱ्या बचतगटांच्या शोधात आहेत. काही ठिकाणी एकाच गटाला तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांचे गणवेश शिवण्याचे कंत्राट दिल्याने काम रखडले आहे. जिल्ह्यात १ लाख ६२ हजार गणवेश शिवून तयार तर ४२ हजार गणवेशाची शिलाई बाकी असल्याची माहिती शिक्षक सहकार संघटना जिल्हाध्यक्ष निलेश देशमुख यांच्याकडून मिळाली.

गणवेशाअभावी हजारो विद्यार्थ्यांना साध्या कपड्यांमध्येच ध्वजवंदनाला जावे लागणार असल्याचे स्पष्ट आहे. काही शाळांमध्ये गणवेश मिळाले असले तरी मळखाऊ रंग, कापडाचा दर्जा याबाबत पालक आणि शिक्षकांनी नाराजी व्यक्त केली आहे. गणवेशाच्या मापातही गोंधळ आहेत. त्यामुळे आलेले गणवेश विद्यार्थ्यांना घालता येणार नाहीत. सोमवारी सायंकाळपर्यंत गणवेश मिळाले नसल्याचे जिल्ह्यातील शिक्षकांसह पालकांचीही ओरड आहे.



**शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी फोन घेणे टाळले**

गणवेशासाठी पालकांनी शिक्षकांकडे तगादा लावला आहे. काही शाळांमध्ये गेल्यावर्षीचा गणवेश घालून विद्यार्थी येणार आहेत. काही गरीब कुटुंबांमध्ये तर शाळेतून मिळणारा गणवेश हेच मुलांसाठी नवे कपडे असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्येही नव्या गणवेशाची उत्सुकता असे. यंदा मात्र विद्यार्थ्यांचा भ्रमनिरास झाला आहे. याबाबत शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्याशी अनेकदा मोबाईलवरून संवाद साधण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांनी मोबाईल घेतला नसल्याने जिल्हा परिषद शाळेतील गणवेशाची वस्तुस्थिती स्पष्ट झाली नाही.



# सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनच्या अध्यक्षपदी राम रेड्डी यांची नियुक्ती

- उपाध्यक्षपदी गणेश सुत्रावे, मनीष देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १३ ऑगस्ट रोजी जयकुमार पाटील उद्योग भवन, चिंचोळी एमआयडीसी येथे झाली. यावेळी शरदकृष्ण ठाकरे यांनी आगामी २०२४ ते २०२७ या कार्यकाळासाठी नवीन कार्यकारिणी जाहीर केली. यामध्ये अध्यक्षपदी डी. राम रेड्डी, उपाध्यक्ष गणेश सुत्रावे व मनीष देशमुख, सचिव वासुदेव बंग, खजिनदार सप्रेम कोठारी, सहसचिव अभिषेक तापडिया व शिवशंकर आंधळकर यांची सर्वानुमते निवड केली.

सभेच्या सुरुवातीला टाटा पॉवर सोलर व त्यांचे चॅनल पार्टनर हरिपर्ण चैतन्य असोसिएट ओंकार परशेट्ये व केविन शहा यांनी उपस्थित सभासदांना सोलर बसविण्याचे फायदे, शासन धोरण व भविष्यातील गरज याविषयी माहिती दिली. सेक्रेटरी वासुदेव बंग यांनी प्रास्ताविक केले. खजिनदार कमलेश शाह यांनी वार्षिक अकाउंट्सचे वाचन केले व असोसिएशन कामकाज पाहण्यासाठी चार्टर्ड अकाऊंटंट धनराज नोगजा यांना २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी नेमणुकीस सर्वानुमते मंजुरी घेतली. त्यानंतर रोहन कुर्री, मंथन शहा, माधव देशपांडे आदींनी सभासदांच्या वतीने प्रातिनिधिक मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात राम रेड्डी यांनी असोसिएशन मार्फत पुढील काळात हाती घेण्यात येत असलेल्या योजनांबाबतची माहिती दिली व तसेच सभासदांना असोसिएशन तर्फे घेण्यात येणाऱ्या सेमिनार, ट्रेनिंग, मिटींगचा लाभ घेण्याचे आवाहन केले. तसेच सर्व सभासदांना आपल्या अडीअडचणी निर्भिडपणे मांडाव्यात व कोणतेही अनधिकृत कृत्य करण्याचे टाळावे, असे आवाहन केले. सूत्रसंचालन तेजस्विनी तापडिया व विनायक दुदगी यांनी केले. रामेश्वरी गायकवाड यांनी आभार मानले.

# बोमड्यालसह सहा संचालकांना पोलीस कोठडी

- व्हिको प्रोसेस जमिन विक्री घोटाळा प्रकरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट -**

सोलापूर जिल्हा विणकर सहकारी फेडरेशन नियमित, सोलापूर (व्हिको प्रोसेस) या संस्थेच्या जमिन विक्रिमध्ये २४ कोटी ३३ लाख ८६ हजार रुपयांचा घोटाळा केल्याप्रकरणी जेलरोड पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात संस्थेचे चेअरमन व माजी नगरसेवक अविनाश बोमड्याल यांच्यासह सहा संचालकांना न्यायदंडाधिकारी वराडे यांनी ३ दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

अविनाश प्रकाश बोमड्याल (रा. रविवार पेठ. सोलापूर), सहदेव हणमंतु इप्पलपल्ली (रा. दत्त नगर, सोलापूर), यादगिरी बालय्या वड्डेपल्ली (रा. भद्रावती पेठ, सोलापूर), सर्वे शाम शंकरराव येमूल (रा. न्यु पाच्छा पेठ, सोलापूर), व्यंकटेश बालाजी बोगा (रा. दत्त नगर, वालचंद कॉलेजजवळ, सोलापूर) आणि व्यवस्थापक रामचंद्र बालराज सामलेटी (रा. दाजी पेठ, सोलापूर) अशी पोलिस कोठडी मिळालेल्यांची नावे आहेत. तर संजय भुमय्या कोंडा (रा. भवानी पेठ, सोलापूर), मनोहर पापय्या इगे (रा. दाजी पेठ, सोलापूर), श्रीहरी हणमय्या इराबत्त (रा. साखर पेठ, सोलापूर), लक्ष्मीनारायण शंकर देवसानी (रा. वेणूगोपाल नगर, सोलापूर), वेणूगोपाळ केशव अंकम (रा. जोडभावी पेठ, सोलापूर), कल्पना श्रीधर रापोल (रा. जोडभावी पेठ, कन्ना चौक, सोलापूर), मंगम्माबाई कृष्णाहरी आडम (रा. नटराज हौसींग सोसायटी, सोलापूर) आणि श्रीहरी रामण्णा विडप (रा. कुचन नगर, सोलापूर) हे संचालक अद्यापही फरार आहेत. याबाबत विशेष लेखापरिक्षक बप्पाजी छबूराव पवार (वय ५३, रा. पद्मशाली भवनम्, रविवार पेठ, कन्ना चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोलापूर जिल्हा विणकर सहकारी फेडरेशन नियमित संस्थेचे १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२ या कालावधीमध्ये विशेष लेखापरिक्षक बप्पाजी पवार यांनी केलेल्या लेखापरिक्षणामध्ये संस्थेचे चेअरमन अविनाश बोमड्याल व इतर संचालक, व्यवस्थापकांनी मिळून २४ कोटी ३३ लाख ८६ हजार २० रुपयांचा गैरव्यवहार करून ती रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी वापरून त्याचा अपहार करून संस्थेची फसवणुक केली. या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून करण्यात येत असून सर्व संचालकांचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने यापूर्वीच फेटाळला आहे. अखेर पोलिसांनी संस्थेचे चेअरमन बोमड्यालसह सहा संचालक व व्यवस्थापकास अटक केली. या सर्वांना न्यायालयात हजर केले असता न्यायदंडाधिकारी वराडे यांनी पोलिस कोठडी सुनावली. सहायक पोलिस निरीक्षक मोहन पवार तपास करीत आहेत.

# शेताच्या कारणावरून मारहाण

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट -**

शेताच्या कारणावरून शिवीगाळ करत लोखंडी पारीने मारहाण करून दुखापत केल्याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ३ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास अंबिका नगर येथे घडली. याप्रकरणी रामचंद्र गंगाराम राठोड (वय ६५, रा.अंबिका नगर, सोरेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गजानन चंद्र राठोड (वय ३५, रा. अंबिका नगर) यांच्याविरुद्ध विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलिस उपनिरीक्षक केंजळे हे करीत आहे.




# मल्टीमिडीया प्रदर्शनाच्या माध्यमातून उलगडणार भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाची गाथा

- सोलापूरकरांसाठी स्वातंत्र्यसंग्रामातील दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर. दि. १३ ऑगस्ट-**

भारतीय स्वातंत्र्य महोत्सव, हर घर तिरंगा आणि विभाजन विभिषिका स्मृति दिवस निमित्त माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरो सोलापूर आणि मध्य रेल्वे सोलापूर विभाग यांच्या वतीने दि १४ ते १६ ऑगस्ट २०२४ या कालावधीमध्ये सोलापूर रेल्वे स्टेशन मधील जनरल तिकीट खिडकीच्या जवळील जागेत भारत-पाकिस्तान फाळणीच्या वेळी घडलेल्या घडामोडी आणि स्वातंत्र्यसंग्रामातील महत्त्वपूर्ण घटना वर आधारित तीन दिवसीय डिजिटल मल्टीमिडिया प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण यांनी दिली आहे.

सदर प्रदर्शनाचे उद्घाटन सोलापूरचे खासदार माननीय प्रणिती शिंदे यांच्या हस्ते १४ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १०.४५ वाजता करण्यात येणार आहे. यावेळी आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख, विभागीय रेल्वे व्यवस्थापक नीरज कुमार दोहरे, पोलीस आयुक्त एम राजकुमार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक अंशू माली कुमार, विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, विभागीय कार्मिक अधिकारी ए पी भगत, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद तुंगार, भारतीय सैन्य दलातील अधिकारी आणि रेल्वे विभागातील वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित राहणार आहेत. सदर प्रदर्शन सकाळी १० ते रात्री नऊ वाजेपर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे. सदर प्रदर्शनामध्ये १८५७ ते १९४७ पर्यंतच्या भारतीय स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना, ऐतिहासिक स्थळे, सोलापुरातील चार हुतात्मे, सेल्फी बूथ, भारत-पाकिस्तान फाळणीच्या वेळी घडलेल्या घडामोडी आणि घटनांचे दुर्मिळ छायाचित्रे व मजकूर सहित माहिती असणार आहे.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याबद्दल रेल्वे प्रवासी आणि सामान्य नागरिकांना माहिती व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. जास्तीत जास्त नागरिक, इतिहास अभ्यासक, संशोधक, स्पर्धा परीक्षाचे विद्यार्थी व युवकानी छायाचित्र प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन सहाय्यक प्रचार अधिकारी अंबादास यादव यांनी केले आहे.




### सोलापूर बसस्थानकातून लॅपटॉपची चोरी

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट -**

सोलापूर बस स्थानकातून चोरट्याने ३५ हजार रुपये किंमतीचा लॅपटॉप चोरून नेला.

याबाबत फिरदोस इनायतुल्ला काझी (वय ३८, रा. मेराज टॉवर, पाथरूट चौक, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ ऑगस्ट रोजी सायंकाळी फिरदोस काझी या हडपसर येथून एस टी बसने सोलापूर बस स्टॅन्ड येथे आल्या. त्यावेळी काझी बसलेल्या एस टी मधील कॅरीअरमध्ये ठेवलेला त्यांचा ३५ हजारांचा लॅपटॉप चोरून नेला. म्हणून फौजदार चावडीचे हवालदार पवार तपास करीत आहेत.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित





सोलापूर 'तरुण भारत' वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!

स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!




# महादेव कोगनुरे

## संस्थापक : एम.के.फाऊंडेशन

## मुख्य व्यवस्थापक : सागर सिमेंट लि.

### ✼ कोवीड काळातील कार्य ✼

**मानवतेचे कर्म सेवा हेच धर्म**





✼ पहिल्या आणि दुसऱ्या लॉकडाऊन दरम्यान हजारो गरीब कुटुंबांना अन्नधान्य किटचे वाटप.

✼ काडादी मंगलकार्यालय, सोलापूर कोविड सेंटर आणि अक्कलकोट कोविड सेंटर येथे बायपॅप आणि ऑक्सिजन मशिन्स देण्यात आले.





✼ भंडारकवठे, दक्षिण सोलापूर कोविड सेंटर येथे गोळ्या, औषध आणि इतर वैद्यकीय साहित्य पुरवठा केला.

✼ काडादी मंगल कार्यालय, सोलापूर कोविड सेंटर आणि अक्कलकोट कोविड सेंटर येथे बायोपॅप आणि ऑक्सिजन मशिन्स देण्यात आले.

### जळीत ग्रस्त कुटूंबांना मदतकार्य

**सामाजिक भान... आत्मियतेचे दान...**





शॉर्टसर्किट व अन्य कारणास्तव आग लागून घर जळालेल्या सोलापूर शहर व दक्षिण सोलापूर व अक्कलकोट परिसरातील जळीतग्रस्त कुटुंबांना मदत

### आपतकालीन मदतकार्य

**ऋण समाजाची... बांधिलकी मानवतेची...**



लवगी ता.दक्षिण सोलापूर येथे भीमा नदीत बुडालेल्या मुलांच्या तानवडे व दुपारशेट्टी कुटुंबियांना मदत केली.



रायगड आणि सांगली, कोल्हापूर येथे पूरग्रस्तांना मदत.

### ✼ पुरस्कार ✼





✼ कोविड काळातील कार्याबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ यांच्या कडून मुंबई येथे 'विशेष सामाजिक सन्मान पुरस्कार.

✼ कर्नाटक सरकारकडून 'राष्ट्रीय बसवरत्न पुरस्कार.

✼ लोकमत समूहाचा 'सुपर ३० पुरस्कार.

✼ महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ यांच्या कडून 'उद्योजकता पुरस्कार. ✼ अजिंक्य बहुउद्देशिय संस्था, पुणे तर्फे 'समाजरत्न पुरस्कार.

✼ रोटरी क्लब ऑफ सोलापूर तर्फे 'कोरोना वॉरियर अवॉर्ड. ✼ JMD of M/S सागर सिमेंट्स लिमिटेड, श्री. श्रीकांत रेड्डी सर यांच्या कडून अल्पावधीत महाराष्ट्रात सागर सिमेंट्सला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने 'विशेष पुरस्कार या सारख्या असंख्य पुरस्काराचे मानकरी.

### शैक्षणिक कार्य

**विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शैक्षणिक प्रगतीसाठी**






✼ दरवर्षी सोलापूर शहर व जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेतील शिकणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना लाखो वह्या वाटप करण्यात आले आहे.

✼ भविष्यात ५०० अनाथ मलांना त्यांच्या एकण शैक्षणिक खर्चासाठी दत्तक घेण्याचा संकल्प. ✼ शेकडो गरज विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप.

✼ विविध शाळांमध्ये गणवेश वाटप, शिष्यवृत्ती परिक्षेची पुस्तके वाटप, बाकड्यांचे वाटप, विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा व व्याख्यानांचे आयोजन.

### महिलांसाठी कार्य

**संस्कृतीसाठी कटिबध्द**



सोलापर येथे ३५०० पेक्षा जास्त महिलांच्या उपस्थितीत हळदी कुंकू समारंभाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

### शेती विषयी कार्य

**शेती - माती - संस्कृतीसाठी कटिबध्द**




निर्मिती लॉन्स, सोलापूर येथे सेंद्रीय शेती कार्यशाळा व मार्गदर्शन शिबिरास हजारो शेतकऱ्यांचा सहभाग. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी शासन दरबारी पाठपुरावा.

### ✼ सामाजिक कार्य ✼



अन्न तृप्ती योजना - गेल्या ३ वर्षापासून दररोज निराधार वृद्धांना घरपोच दोन वेळचे टिफिन आणि गरजेनुसार औषधोपचार देण्यात येते.




ऊन्हाळ्यात सोलापूर शहरातील विविध भागात पाणपोईची सोय.



✼ निराधार व गरजू कुटुंबांना दरवर्षी दिवाळीत धान्य किटचे वाटप.



शहर व जिल्ह्यात विविध आरोग्य शिबीराचे आयोजन



अनाथ आश्रमातील विद्यार्थ्यांना वॉटर पार्क ची सफर

## ✼ सिमेंट व्यवसायातून व उद्योगातून जपला सेवाभाव ✼

- मे. सागर सिमेंट लिमिटेड द्वारे वितरकांचे नेटवर्क वाढवण्यात आले. यातून हजारो बेरोजगार तरुणांना सिमेंटची दुकाने उघडून रोजगार उपलब्ध करून देत आहे.
- ट्रक ड्रायव्हर्स, लोडिंग आणि अनलोडिंगसाठी मजूर यासारख्या सिमेंटच्या वाहतुकीद्वारे रोजगार उपलब्ध करून देणे आणि सिमेंट व्यवसायाद्वारे अनेक अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण करणे. तसेच याचा मोठ्या प्रमाणात फायदा बांधकाम कामगारांना होत आहे.
- सिमेंट व्यवसायाचे व्यवस्थापन करताना अतिथी व्हेज रेस्टॉरंट आणि विठ्ठल कामत ओरिजिनल फॅमिली रेस्टॉरंटचा व्यवसाय उत्तमरित्या चालवत आपल्या व्यवासायातून रोजगार निर्मिती केली.
- मध्य रेल्वेच्या रेल्वे सल्लागार समिती सोलापूर विभागाचे सदस्य म्हणूनही काम पाहिले आहे. प्रवाशांच्या समस्या सोडवल्या.

## शुभेच्छुक : महादेव कोगनुरे मित्र परिवार

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८६०

**सुखें गातों गीत वाजवितों टाळी ।**
**नाचतों राऊळीं प्रेमसुखें ।।**

पात्र असूनही एखाद्याचं कौतुक किंवा गुणगौरव माणसांकडून सहजपणे होत नाही. माणसाला त्याचे कार्य, गुण मन:पुर्वक आवडले पाहिजेत, तेव्हाच तो मुक्त मनाने समोरच्याचे कौतुक किंवा गुणगौरव करतो. एखाद्याकडे पाहून मन:पूर्वक आनंदी होण्यासाठी त्याच्यावर नि:स्वार्थ प्रेम असावे लागते. समचरणी उभा राहून समत्व जोपासणाऱ्या व कर्तव्याची शिकवण देणाऱ्या आणि कष्ट करणाऱ्याच्या पाठीशी उभा राहणाऱ्या पांडूरंगाचे कौतुक संतांकडून होते. त्याला पाहून त्याच्या कार्याबद्दल मुखातून गुण गौरवपर गीत ओठावर येवू लागतात. सर्व जीवमात्राच्या ठिकाणी समत्व जोपासून त्या जीवांवर प्रेम केले म्हणजे आपणाला खरा आनंद मिळतो, असे सांगणाऱ्या पांडूरंगाला पाहून आपण त्याचे गुणगान करतो. आनंदाने टाळी वाजवून त्याच्या मंदिरात प्रेमाच्या सुखात न्हाऊन जातो. हे प्रेमसुख आपणाला आपोआप नाचवू लागते. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**सुखें गातों गीत वाजवितों टाळी ।**
**नाचतों राऊळी प्रेमसुखें ।।**

आपल्यापैकी बरेच लोक एखाद्याच्या समोर त्याचे गुणगान करतात, त्याच्यासमोर नाचतात, त्याच्या नावाने टाळ्या वाजवतात. पण त्यापैकी काहीही मनातून, हृदयातून नसते. त्याला बरे वाटावे, त्याने आपल्यावर खुष होऊन आपणाला काहीतरी मदत करावी, एवढाच हेतू यामागे असतो. अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर, राजकीय नेत्यांसमोर त्यांचे कौतुक करणारे, त्यांच्या नावाचा उदो-उदो करणारे कांही कमी नाहीत. मी एका वरीष्ठ पदावर काम केले असल्याने मला वरिष्ठांसमोर आणि पदाधिकाऱ्यांसमोर पुढे-पुढे करणारे खूप लोक पाहायला मिळत असत. हेच लोक अधिकारी, पदाधिकारी बाजूला जाताच त्यांच्याबद्दल अपशब्द बोलत असत. भीतीयुक्त आदरापेक्षा आदरयुक्त भीती कधीही चांगली असते. हे सत्य असले तरीही लोक भीती व स्वार्थापोटी दिखाऊ बाह्यवर्तन केल्याशिवाय राहत नाहीत. अनेक युवक-युवती एकमेकांबद्दल खूप कौतुकास्पद आणि मोठेपणात्मक बोलत असतात. एकमेकांचे मन जिंकून घेण्यासाठी फार भारी-भारी शब्द वापरतात. पण पुढे जेव्हा इच्छापूर्ती होते, तेव्हा मात्र एकमेकांतील दोष काढू लागतात. खरे म्हणजे प्रेम हे हृदयातून असावे लागते. प्रेम ही दाखविण्याची बाब नाही तर ती अनुभवण्याची बाब आहे. संत, महात्मे भगवंताच्या व जीवाच्या बाबतीत केवळ प्रेम दाखवत नाहीत तर ते प्रत्यक्षात अनुभवतात व इतरांना त्याचा अनुभव देतात. आपल्याकडूनही असेच प्रेम झाले तर आपल्याबरोबरअनेकांच्या मनातील ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, काम, क्रोध आपोआप नष्ट होऊ लागतील.

**जय जय राम कृष्ण हरी।**
**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | सूर्यास्त - १९.०५ |
| दि. १४ ऑगस्ट २०२४ | दिनविशेष - चांगला दिवस |
| विक्रम संवत् २०८०, | सदाशिव महाराज पुण्यतिथी |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. नवमी (१०.२३) | मंगळवार : दु. ३ ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र- अनुराधा (१२.११) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - ऐंद्र (१६.०४) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (२२.३०) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| सुर्योदय - ०६.२२ | |

### राशीभविष्य

**मेष :** कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील. नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे.

**वृषभ :** आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. दुसऱ्याचा द्वेष करू नका. व्यापारात प्रगती राहील.

**मिथुन :** सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. व्यापारात अपेक्षीत लाभ होईल. घराच्या संबंधी समस्या वाढतील.

**कर्क :** व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, माान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. आनंदी रहा.

**सिंह :** प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ :** आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो. व्यापारात प्रगती राहील.

**वृश्चिक :** कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**धनु :** सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणचाही राग करू नका. आरोग्याच्या तक्रारी संपणार आहेत.

**मकर :** दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांची चिंता राहील.

**कुंभ :** व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मीन :** श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.मुलांच्या कामामुळे दु:खी रहाल.

# विश्वकर्मा योजनेची अंमलबजावणी करा

## १८ उद्योग क्षेत्रातील पारंपरिक कारागिरांना मिळणार लाभ

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना ही केंद्र सरकारची महत्वकांक्षी योजना असून या योजनेची जिल्ह्यात यशस्वी अंमलबजावणी करण्यात येऊन जास्तीत जास्त लोकांपर्यंत लाभ पोहोचवण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य योजना जिल्हा अंमलबजावणी समितीची सभेत जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. याप्रसंगी जिल्हा अग्रणी बँक अधिकारी राम वाखरडे, सहायक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास हणमंत नलावडे, जिल्हा सह आयुक्त, जिल्हा



प्रशासन अधिकारी वीणा पवार, जिल्हा समन्वयक एनयुएलएम शहर अभियान व्यवस्थापक सोलापूर महानगरपालिका उज्वला गणेश, गट विकास अधिकारी मोहोळ आनंदकुमार मिरगणे, गट विकास अधिकारी मंगळवेढा/ सांगोला योगेश कदम, गट विकास अधिकारी दक्षिण सोलापूर बी.डी.वाघ, सहायक गट विकास अधिकारी अक्कलकोट ए.आर.दोडमनी, राष्ट्रीय सुकाणु समिती सदस्य अर्चना वडनाल, विशाल गायकवाड, सामान्य सेवा केंद्र सोलापूर सोमेश भोसले तसेच जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी ध्रुवकुमार बनसोडेउपस्थित होते.

प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेत विशेष लक्ष देऊन पिढ्यानपिढ्या व्यवसाय करणाऱ्या पारंपारिक कारागिरांना लाभ देण्यासाठी सर्व संबंधित विभागाने प्रसार प्रचार करावा. तसेच जास्तीत जास्त कारागिरांची नोंदणी करून योजनेचा लाभ देण्यात यावा. तसेच जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांनीही या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन ही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केले.

#### कोणाला लाभ घेता येणार

सुतार, लोहार, सोनार, कुंभार, चांभार (चर्मकार) बुट/पादत्राणे कारागिर, न्हावी, परीट/धोबी, शिंपी, शिल्पकार (मुर्तीकार, कोरीव काम, दगड तोडणारा), टोपली/चटई/ झाडू बनविणारा, कॉयर विणकाम, बाहुली आणि खेळणी बनविणारा, हातोडा आणि हत्यारे/ औजारे साहित्यांचा संच बनविणारा, कुलूपे बनविणारा, मेस्त्री / गवंडीकाम, पुष्पहार/माळा बनविणार, मासे पकडण्याचे जाळे बनविणारा, बोट बनविणारे, चिलखत (शस्त्रे) बनविणारे पारंपारिक कारागिर.

# बँकांनी सिबिल स्कोअर संकल्पना रद्द करावी

### पक्षकार संघाची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

कायद्यानुसार कर्ज म्हणजे काय आणि कर्जाची व्याख्या स्पष्ट करावी तसेच सिबिल स्कोर ही संकल्पना रद्द करावी, अशी मागणी पक्षकार संघाच्या वतीने राज्य सहसचिव बसवराज येरनाळे यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

भारताचे चलन रुपया म्हणजे काय आणि रुपया वास्तवात कसा दिसतो ते स्पष्ट करावे. राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, पतसंस्था, फायनान्स कंपन्या ग्राहकांना कोणत्या रुपयात कर्ज देते याचा तपशील स्पष्ट करावा. सिबिल स्कोअर या नावाने नागरिकांमध्ये दहशत, भीती निर्माण करून नागरिकांची पत, प्रतिष्ठा व सन्मान याला धक्का पोहोचवणारी व केवळ बँकांचा फायदा व्हावा या हेतने

सिबिल स्कोअर निर्माण केले आहे. सिबिल स्कोअर ही संकल्पनाच रद्द करावी या मागणीसाठी जिल्हाधिकारी तसेच वरिष्ठ पातळीवर निवेदन पाठविण्यात आली आहेत, असेही बसवराज येरनाळे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस बाबुराव मैंदर्गीकर, सतीश शिंदे आदी उपस्थित होते.

# रघुवीर चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

समर्थ रामदास स्वामींचं जीवनचरीत्र रुपेरी पडद्याच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झालं आहे.रघुवीर हा आगामी चित्रपट खऱ्या अर्थाने प्रभू श्रीराम भक्त आणि समर्थ रामदास स्वामींच्या अनुयायांसाठी एक पर्वणी ठरणार आहे.रघुवीर या चित्रपटाद्वारे प्रथमच रामभक्त समर्थांचं जीवन जगासमोर येणार आहे.या चित्रपटाचा मनमोहक आणि उत्कंठावर्धक ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे. ट्रेलरमध्ये चित्रपटाची झलक पाहिल्यानंतर रघुवीरबाबतची उत्कंठा शिगेला पोहोचते.२३ ऑगस्ट रोजी रघुवीर सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.डायनॅमिक प्रोडक्शन्स आणि आदित्यम क्रिएशन्सच्या सहयोगानं समर्थ क्रिएशन्स यांनी रघुवीर चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे.या चित्रपटाचे निर्माते अभिनव विकास पाठक,तर सहनिर्माते वैभव किशोर मानकर, सपना किरण बडगुजर आणि डॉ.किरण छगन बडगुजर आहेत.

# सुपरस्टार सिंगर नवा कार्यक्रम भेटीला

**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

महाराष्ट्रातील नव्या दमाच्या युवा गायकांना व्यासपीठ उपलब्ध करून देत,संगीताचा सुरेल नजराणा रसिकांना देणारा सुपरस्टार सिंगर हा नवा कार्यक्रम सोनी मराठी वाहिनीवर लवकरच रंगणार आहे.नुकताच या कार्यक्रमाचा एक आकर्षक प्रोमो रिलीज झाला आहे.त्यामुळे नव्या मराठी संगीत पर्वाबद्दलची प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढली आहे.एक नवा आश्वासक सूर शोधण्याचा प्रवास १० ऑगस्टपासून सुरु झाला आहे.२४ ऑगस्टपर्यंत स्पर्धेच्या ऑडिशन्स सुरु राहणार आहेत.याकरीता ५ ते ३० हा वयोगट असणार आहे.

# जलशक्ती अभियान; जिल्ह्याचा शास्त्रीय कृती आराखडा तयार करा

## अधिकाऱ्यांच्या बैठकीत राकेश कुमार मीना व पूर्णिमा बारहाते यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

जलशक्ति अभियान नारी शक्ति से जलशक्ती व अमृत सरोवर योजनाबाबत जलशक्ती अभियानच्या केंद्रीय नोडल अधिकारी राकेश कुमार मीना व केंद्रीय तांत्रिक अधिकारी पूर्णिमा बारहाते यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे जिल्ह्यातील जलशक्ती अभियान २०२४ या योजनेविषयी सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक झाली.




या बैठकीस जलशक्ती अभियान या योजनेचे जिल्ह्याचे सदस्य सचिव, दयासागर यो. दामा व जलशक्ती अभियान योजनेतील जिल्हास्तरीय समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. या बैठकीत अध्यक्षांनी सोलापूर जिल्ह्याच्या जलशक्ती अभियान २०२४ या योजनेचे जिल्ह्याचा शास्त्रीय कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या. या आराखड्यामध्ये सर्व विभागांना आपल्या स्तरावरील कामे समावेश करण्याबाबत सूचना दिल्या. मृद व जलसंधारण विभागामार्फत या योजनेअंतर्गत विविध जलसाठ्यातील गाळ काढण्याची कामे, नाला खोलीकरणाची कामे, सिमेंट नाला बंधारे, शेततळे इ. कामे घेण्यात आलेले असलेबाबत जिल्हा जलसंधारण अधिकारी द.यो.दामा यांनी पीपीटीद्वारे सादरीकरण केले. लघु पाटबंधारे विभाग, (जि.प.) सोलापूर या विभागामार्फत बंधाऱ्यांचे दुरुस्तीची कामे या योजनेअंतर्गत घेण्यात आले असले बाबत एस. एस. पारसे, जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग सोलापूर यांनी १७१ द्वारे सादरीकरण केले.

कृषी विभागामार्फत कंपार्टमेंट बंडिंगची कामे, सिमेंट नाला बंधारे ही कामे या योजनेअंतर्गत घेण्यात आले बाबत सी. बी. मंगरुळे, कृषी विभागाचे प्रतिनिधी यांनी ७४ द्वारे सादरीकरण केले. सोलापूर महानगरपालिका या विभागाअंतर्गत विविध कार्यालयीन इमारतींचे रेन वॉटर हार्वेस्टिंगची कामे घेण्यात आले बाबत डंके, उपअभियंता सो.म.पा. यांनी सादरीकरण केले. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सोलापूर या विभागामार्फत रिचार्ज शॉफ्टची कामे जलशक्ती अभियान २०२४ योजनेअंतर्गत घेण्यात आलेली असलेबाबत मुस्ताक शेख, वरिष्ठ भूवैज्ञानिक यांनी ११७द्वारे सादरीकरण केले. पालिका अधिकारी डंके यांना स्त्री संघटनांचा या अभियानात सहभाग करून घेण्याचे निर्देश दिले. सोलापूर महानगरपालिकेच्या स्वयं मदत संघटना ची मदत घेऊन या अभियाना विषयी जनजागृती करण्याच्या सुचना देण्यात आल्या.

# लोकमंगल पतसंस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षापर्यंत १०० शाखांमार्फत सेवा देण्याचे उद्दीष्ट

### आ. सुभाष देशमुख यांचा मानस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट -**

लोकमंगल पतसंस्थेवर टाकलेल्या विश्वावासामुळे पतसंस्थेने २१८५ कोटी व्यवसाय पूर्ती केला आहे. पतसंस्थेच्या महाराष्ट्रामध्ये ६३ शाखा कार्यरत असुन पतसंस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्ष म्हणजेच सन २०२८ पर्यंत १०० शाखेमार्फत सेवा देण्याचे उद्दिष्ट असल्याचा मानस लोकमंगल समूहाचे संस्थापक अध्यक्ष आमदा सुभाष देशमुख यांनी व्यक्त केला.



लोकमंगल पतसंस्थेच्या २२व्या वार्षिक सभेत बोलत होते. पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा जुळे सोलापूरमधील जाम गोंडी मंगल कार्यालयात संपन्न झाली. या सभेस मार्गदर्शक नानासाहेब साठे, सोलापूर जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप पतंगे, चेअरमन गुरण्णा तेली, व्हा. चेअरमन निर्मला कुंभार, संचालक शहाजी साठे, फैय्याज मुलाणी, समाधान पाटील, भीमाशंकर कलशेट्टी, शिवाजी माळी, युवराज गायकवाड ॲड. गजानन भाकरे, प्रा . विठ्ठल ढेकळे, भूताळी बाराचारी, सरोजनी टिपे, लक्ष्मी नडगेरी, सरव्यवस्थापीका अलका देवडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी सरस्वती व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकात संस्थेचे चेअरमन गुरण्णा तेली यांनी आपली पतसंस्था प.महाराष्ट्रात अव्वल स्थानावर असल्याचे सांगत संस्थेच्या प्रगतीचा आलेख सभासादांसमोर मांडला यानंतर सरव्यवस्थापिका अलका देवडकर यांनी अहवाल वाचन केले

कार्यक्रम प्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींचे, स्पर्धा परीक्षामध्ये यश संपादन केलेले विद्यार्थी, सन २०२३-२४ मध्ये विविध गटामधून वैराग, करमाळा, पंढरपूर शाखा नं. २, हत्तुरे वस्ती तर सर्व शाखेमध्ये अव्वल करकंब शाखा व १०० कोटी ठेवींची पूर्तता करणारी अवंती नगर शाखा यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतिश लोंढे व अभिराम सराफ यांनी तर आभार संचालक युवराज गायकवाड यांनी मानले.



# विद्यापीठ व महाविद्यालयातील ९० टक्के जागा तात्काळ भरा

## सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या मेळाव्यात ठराव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट -**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आदेशानुसार विद्यापीठ व महाविद्यालयातील ९० टक्के जागा तात्काळ भरा असा ठराव सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) चा मेळाव्यात करण्यात आला.

ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात प्राध्यापक व सुशिक्षित बेरोजगारांचा मेळावा झाला. त्यावेळी सुटाचे अध्यक्ष डॉ. नेताजी कोकाटे यांनी मेळाव्यास संबंधित केले. ते म्हणाले, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनमध्ये विद्यापीठातील व महाविद्यालयातील कंत्राटी भरती व कायमस्वरुपी भरती या बाबतचे काटेकोर नियम ठरवून देण्यात आले आहेत. नियमानुसार कोणत्याही परिस्थितीत कंत्राटी पद्धतीने भरावयाच्या जागा १० टक्के पेक्षा जास्त असता कामा नये. त्यामुळेच किमान ९० टक्के कायम शिक्षकांची भरती ही सर्वोच्च न्यायालयाने मान्य केली आहे. सुटा बार्शी विभागाचे अध्यक्ष डॉ. अरविंद दळवी यांनी मेळाव्याचे अध्यक्षस्थान भूषविले. डॉ वशिष्ठ गुरमे यांनी प्रास्ताविक केले. डॉ भगवान आधटराव यांनी आभार मानले.

#### मेळाव्यातील आंदोलनाचे उर्वरित टप्पे

शुक्रवार १६ ऑगस्ट रोजी राज्यातील विद्यापीठावर मोर्चा व धरणे. त्यानंतर मंत्र्यांनी जिल्ह्याच्या ठिकाणी आयोजित केलेल्या सार्वजनिक कार्यक्रमस्थळी शांततापूर्ण मार्गाने निदर्शने करणे. विधानसभा निवडणूकांचा कार्यक्रम घोषित झाल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून तालुकानिहाय बैठकीचे आयोजन करणे.

# शिवदारे प्रतिष्ठानचे जीवनगौरव पुरस्कार जाहीर

## ब्रिजमोहन फोफलिया, डॉ. माधुरी वाळवेकर, अतुल बागल यांचा होणार गौरव

### शनिवारी होणार पुरस्कार वितरण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

वि. गु. शिवदारे प्रतिष्ठानच्या वतीने सहकार महर्षी, स्वातंत्र्यसेनानी माजी आ. कै. वि. गु. शिवदारे यांच्या जयंतीनिमित्त देण्यात येणारे विविध क्षेत्रातील पुरस्कार जाहीर करण्यात आले. शनिवार दि. १७ ऑगस्ट रोजी दुपारी ४.३० वाजता किर्लोस्कर सभागृह, सोलापूर येथे हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यंदाच्या वर्षीचा जीवनगौरव पुरस्कार वितरण समारंभ खा. प्रणिती शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रख्यात प्लास्टिक सर्जरी तज्ञ डॉ. विठ्ठल लहाने यांचे ''राष्ट्र उभारणीतील आपला सहभाग'' या विषयावर प्रबोधनात्मक विचार व्यक्त करणार आहेत. कै. वि. गु. शिवदारे यांचा जन्म १७ ऑगस्ट १९२६ रोजी झाला. दि. ८ ऑगस्ट २००८ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांनी संपूर्ण जीवनात जवळजवळ ६५ वर्ष सार्वजनिक चळवळीत सहभाग नोंदविला. स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतला. विधानसभेत सलग पंधरा वर्षे आमदार व प्रतोद म्हणून त्यांनी काम पाहिले. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेवर सलग ४५ वर्ष संचालक आणि दोन वर्ष चेअरमन म्हणून जबाबदारी सांभाळली. स्वामी समर्थ सूतगिरणी वळसंग, कृषी उत्पन्न बाजार समिती, श्री सिद्धेश्वर सहकारी बँक, सोलापूर सहकारी ग्राहक भांडार, दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ आदी संस्थांची स्थापना त्यांनी केली. यांच्या आदर्श कार्याची प्रेरणा सर्वांना राहावी म्हणून १९९९ साली वि. गु. शिवदारे प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांना प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात येतेया पत्रकार परिषदेस प्रतिष्ठानचे प्रकाश वाले, नरेंद्र गंभीरे, सुभाष मुनाळे, सूर्यकांत इसापुरे, डॉ. बाहुबली दोशी, डॉ. चनगोंडा हविनाळे, मल्लिकार्जुन बिराजदार, भीमाशंकर शेटे, प्रमोद बिराजदार आदी उपस्थित होते.



कै.वि.गु. शिवदारे अण्णा | ब्रिजमोहन फोफलिया | डॉ. माधुरी वाळवेकर | अतुल बागल

#### हे आहेत पुरस्काराचे मानकरी

श्री निंम्बार्क ब्रिजधाम वृद्धाश्रमचे संस्थापक अध्यक्ष ब्रिजमोहन फोफलिया (सामाजिक), नेत्र तज्ञ डॉ. माधुरी वाळवेकर (वैद्यकीय), गादेगाव(ता.पंढरपूर) येथील प्रयोगशील शेतकरी अतुल बागल (कृषी), पत्रकार सचिन जवळकोटे (पत्रकारिता). पुरस्काराचे स्वरुप : स्मृतिचिन्ह, २१ हजार एक रुपये रोख.




# प्रा. पल्लवी तडकल 'नॅशनल एक्सलन्स अवॉर्ड'ने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

सोलापुरातील ''तडकल इंग्लिश मीडियम स्कूल''च्या प्राचार्या पल्लवी प्रदीप तडकल यांना सोमवारी ''नॅशनल एक्सलन्स अवॉर्ड''ने सन्मानित करण्यात आले.

नवी दिल्लीत भारती विद्यापीठामध्ये आयोजित एका शानदार कार्यक्रमात केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रा. तडकल यांना प्रदान करण्यात आला. आयोजक डॉ. मनीष गवई, नॅशनल युथ अवॉर्ड, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया तसेच नवी दिल्ली स्थित भरती विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर ऍप्लिकेशन मॅनेजमेंटचे डायरेक्टर प्रा. एम. एन. होडा यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

नवी दिल्लीतील ऑल इंडिया युथ फाऊंडेशन टीम झेनिथ इंटरनॅशनल इंडियन गॅलक्सी फाऊंडेशन यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील बहुमोल योगदानाबद्दल प्रा. तडकल यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### सह्याद्री फार्मसी कॉलेजमध्ये नशामुक्त भारत अभियान

**सांगोला, दि. १३ ऑगस्ट-**

मेथवडे येथील सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत नशामुक्त भारत अभियान राबविण्यात आले. तरुणाई ही कोणत्याही राष्ट्राची ऊर्जा असते आणि समाज आणि देशाच्या विकासात तरुणांच्या शक्तीचे महत्त्वाचे योगदान असते. तरुण अमली पदार्थच्या आहारी न जाता राष्ट्राच्या विकासासाठी योगदान द्यावे यासाठी केंद्र सरकारने अंमली पदार्थांच्या धोक्याविरुद्ध लढण्यासाठी नशामुक्त भारत हा संकल्प निश्चित केला आहे. त्याचे पालन करण्यासाठी, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने नशामुक्त भारत अभियान जाहीर केला आहे. अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत लोकांमध्ये जागरुकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. समुपदेशन, पुनर्वसन केंद्रे आणि औषधोपचारांद्वारे आधीच अमली पदार्थांच्या आहारी गेलेल्यांना या अभियानांतर्गत नशामुक्त केले जाते. विद्यार्थ्यांना नशामुक्ततेची शपथ देण्यात आल्याचे प्रा. आर. के कदम यांनी सांगितले.



### उमरड येथे नवनियुक्त पोलीस अधिकाऱ्यांचा सत्कार

**करमाळा, दि. १३ ऑगस्ट-**

उमरड (ता. करमाळा) येथे ग्रामस्थांच्या वतीने नूतन पोलीस उपनिरीक्षक अन्वर इमाम मुलाणी, पोलीस भरती झालेल्या कय्युम सलाल पठाण, मुनाफ हमीद सय्यद या युवकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक हाजी अल्ताफशेठ तांबोळी, पंचायत समितीचे सभापती अतुल पाटील, श्रीमान चौधरी, सभापती अतुल पाटील, हुसेन पठाण, संदीप मारकड, मकाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक बापूराव चोरमले, प्रमोद बदे, फारुख जमादार, तात्यासाहेब सरडे, डी. जी. बदे, साहेबराव मारकड, अनिल सुरवसे, संदीप मारकड, मेजर देवीदास पाखरे, तात्या मारकड आदी उपस्थित होते. प्रास्ताविक फोजमल पाखरे यांनी केले. कार्यक्रमासाठी रसुल शेख, इरफान शेख, इसाक शेख, हुसेन पठाण, नंदकिशोर चौधरी, श्रीकांत मारकड यांनी परिश्रम घेतले. अन्वर इमाम मुलाणी, कय्युम सलाल पठाण व मुनाफ हमीद सय्यद यांची निवड होणे हे गावासाठी अभिमानाची गोष्ट आहे, असे प्रा. नंदकिशोर वलटे यांनी सांगितले.



### क्रीडाभारती संघटनेच्या अध्यक्षपदी अमोलराजे भोसले यांची नियुक्ती

**अक्कलकोट, दि. १३ ऑगस्ट-**

अक्कलकोट शहर व तालुक्यात खेळाचा व्यापक विस्तार करून अधिक गुणवान खेळाडू आणि खेळाच्या माध्यमातून संस्कार, सशक्त, सक्षम व चारित्र्यवान व्यक्ती निर्माण करण्यासाठी राष्ट्रव्यापी संघटन असलेल्या क्रीडाभारती संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांची नियुक्ती करण्यात आली.

याप्रसंगी क्रीडाभारतीचे जिल्हापदाधिकारी राजेंद्र कळमणकर, ज्ञानेश्वर म्याकल, डॉ. विलास हरपाळे, अरुण उपाध्ये यांनी अमोलराजे भोसले यांना नियुक्तीपत्र देऊन सत्कार केले. प्रास्ताविक क्रीडाभारतीचे तालुका संयोजक अभिजित लोके यांनी केल तर स्वागत तालुकामंत्री प्रकाश सोनटक्के यांनी केले. याप्रसंगी मार्गदर्शक निवृत्त मुख्याध्यापिका उषाताई हंचाटे, क्रीडाशिक्षक परमेश्वर व्हसुरे, कल्याणी लकशेट्टी, बाबुराव पवार, दत्तात्रय बिराजदार, सर्जेराव माशाळ, शंभूराजे गाटे आदी उपस्थित होते. यावेळी अक्कलकोट तालुका क्रीडाभारती पदाधिकारी : अध्यक्ष अमोलराजे भोसले, उपाध्यक्ष महिबुब शेख, महिला उपाध्यक्ष उषाताई हंचाटे, तालुकामंत्री प्रकाश सोनटक्के, सहमंत्री नागराज कलबुर्गी, परमेश्वर व्हसुरे, कल्याणी लकशेट्टी, खजिनदार अमोल कोकाटे, क्रीडांगण प्रमुख अविनाश राठोड, उपप्रमख दत्तात्रय हिल्ली, इकबाल टिनवाला, संयोजक अभिजित लोके आणि कार्यकारिणी सदस्य म्हणून दत्तात्रय बिराजदार, अरविंद शिंदे, उमेश नेवाळे, बाबुराव पवार, दयानंद उटगे, अमर पराड, शंभू गाटे, आनंद पाटील, सिद्धेश्वर घुगरे, कुमार जाधव, दयानंद दणुरे, प्रशांत राचेटी यांची निवड झाली. शेवटी राजेंद्र कळमनकर यांनी आभार मानले.



### वर्धमान जैन वाचनालयात डॉ. रंगनाथन जयंती साजरी

**बार्शी, दि १३ ऑगस्ट-**

श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय, बार्शी येथे भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला. प्रथम डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन वाचनालयाचे ऑ. सेक्रेटरी आनंद पुनमिया यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वाचनालयाचे संचालक धीरज कुंकूलोळ, प्रमोद भंडारी उपस्थित होते. सूत्रसंचालन वाचनालयाचे सुरेश यादव यांनी केले. आभार संचालक प्रमोद भंडारी यांनी मानले. सहाय्यक ग्रंथपाल पल्लवी तौर, क्लार्क विरज पतंगे हे उपस्थित होते.

# बसस्थानकाची अस्वच्छता; अधिकाऱ्यांना घेतले फैलावर

## आ. आवताडे यांनी केली पंढरपूर बसस्थानकाची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ ऑगस्ट-**

महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी आणि दक्षिण काशी अशी ओळख असलेल्या पंढरपूरला दरवर्षी लाखो भावी आपल्या लाडक्या विठुरायाच्या दर्शनासाठी येत असतात. शेतकऱ्यांचा देव अशी ओळख असलेल्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी पंढरपूरला येणारा भाविक बहुतांश एसटी बसने प्रवास करतो. आपल्या गावावरून पंढरपूरला उतरल्यानंतर त्या भाविकांना मूलभूत सुविधा उपलब्ध असाव्यात आणि बसस्थानक परिसरात स्वच्छता असावी ही माफक अपेक्षा या भाविक प्रवाशांचे असते.

मात्र पंढरपूर बसस्थानक परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले असून स्वच्छ पिण्याचे पाणी देखील उपलब्ध नाही. बस स्थानक परिसरात जागोजागी घाण व कचरा साठलेला आहे. याबाबत




अनेक माध्यमातून बातम्या प्रसारित झाल्या आहेत. तसेच जागरूक नागरिक आणि प्रवाशांनी वारंवार बस स्थानक प्रशासनाकडे तक्रारी करून देखील दुर्लक्ष केले जात होते.

या सर्व बाबी पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी अचानक पंढरपूर बस स्थानकाला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यामध्ये बस स्थानकातील शौचालय, पिण्याचे पाणी, फलाट, तसेच बस स्थानकाच्या बाहेर आणि आपली बाजूस असलेले व्यापारी गाळे, या ठिकाणी जागोजागी कचरा व घाण साठलेली पाहायला मिळाली. त्यामुळे आमदार समाधान आवताडे चांगलेच संतप्त झाले आणि त्यांनी महामंडळ अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. यावेळी आगार व्यवस्थापक आणि स्थानक प्रमुख गैरहजर होते. त्यांना आमदार समाधान आवताडे यांनी फोन करून स्वच्छता कंत्राटदार कोण आहे. आणि तो योग्य पद्धतीने त्याचे काम करत नसेल तर त्याच्यावर कारवाई का केली जात नाही असा सवाल केला. त्याचबरोबर बसस्थानक परिसरातील जागोजागी पडलेला कचरा एका आठवड्यात पूर्णपणे स्वच्छ करून घ्या मी पुढच्या आठवड्यात पुन्हा येईन आणि स्वच्छता झाली असल्याची खात्री करेन असे सांगितले.

यावेळी त्यांच्यासोबत प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, पंढरपूर शहरचे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, नगर परिषदेचे उपमुख्य अधिकारी सुनील वाळुंजकर, परिवहन महामंडळाचे वाहतूक निरीक्षक दळवे, यांच्यासह इतर अधिकारी व आमदार समाधान आवताडे यांचे कार्यकर्ते, प्रवासी व बसस्थानक परिसरातील व्यापारी उपस्थित होते.

# वावडी स्पर्धेत शिवतांडव, जाधव, गाडेकर प्रथम

## हिरकणीत अनुजा मगर ठरल्या सोन्याच्या नथीच्या मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १३ ऑगस्ट-**

वावडी व हिरकणी महोत्सव संयोजन समितीच्या वतीने निमगाव (ता. माळशिरस) येथे आयोजित केलेल्या वावडी स्पर्धेत मोठ्या गटात शिवतांडव ग्रुप, मध्यम गटात तानाजी जाधव ग्रुप तर लहान गटात ६५ फाटा गाडेकर ग्रुपने बाजी मारत प्रथम क्रमांकाची बक्षिसे जिंकली तर महिलांसाठी झालेल्या हिरकणी महोत्सवात अनुजा संकेत मगर या सोन्याच्या नथीच्या मानकरी ठरल्या. प्रसिद्ध सिने अभिनेत्री माधुरी पवार यांच्या हस्ते सर्व बक्षीस विजेत्या संघांना व महिलांना बक्षीस वितरण करण्यात आले.

यावेळी डॉ. श्रीमंत कोकाटे, मल्ल सम्राट रावसाहेब मगर, साहित्यिक हनुमंत पवार, सपोनि भाऊसाहेब गोसावी, वृषाली माने-पाटील, रेवती कदम उपस्थित होते. सन २०२४ च्या वावडी स्पर्धेत लहान गटात ओम मगर, डी बॉईज, श्रीराज मगर, विकास काळे तर मध्यम गटात शिवतेज मगर, अभिषेक जाधव, निलेश मगर, सुदर्शन पवार तर मोठ्या गटात तोरणे, होलार गल्ली, होय हिंदूच यांनी अनुक्रमे चतुर्थ, तृतीय व द्वितीय क्रमांकाची पारितोषिके मिळविली. हिरकणी महोत्सवात टिफिनडबे छाया पाटील, संगीता कस्तुरे, आरशिया शेख, ऋतुजा मगर व जयदा शेख यांनी मिळविले तर हिरकणी कुकर कावेरी कदम, प्राजक्ता बांदल, प्रतिभा पाटील, मयुरी मगर यांनी पटकविले तर चांदीचे पैंजण वर्षाराणी मगर व ज्योती मगर यांनी मिळविले. प्रसिद्ध सिने अभिनेत्री माधुरी पवार यांचा सन्मान संयोजन समितीचे ज्येष्ठ सदस्य बाळासाहेब मगर व कल्पना मगर यांनी केला. स्पर्धेसाठी पुणे, सातारा, सांगली सोलापूर जिल्ह्यातून कला, क्रीडा, कृषी, उद्योग, वैद्यकीय, कृषी क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली. यावेळी सिने अभिनेत्री माधुरी पवार यांनी आपल्या अदाकारीने सर्वांनाच मंत्रमुग्ध केले. सूत्रसंचालन रामचंद्र आसबे तर आभार भारत मगर यांनी मानले.



> निमगावचा वावडी महोत्सव माझ्या माहितीनुसार बहुदा महाराष्ट्रातील हा एकमेव वावडी महोत्सव असेल. या महोत्सवात सामाजिक संदेश देऊन तीस-तीस फूट उंचीच्या वावड्या बनविल्या जातात व त्या आकाशात उडविल्या जातात. ही परंपरा, कला जतन करण्याचे काम संयोजन समिती करीत आहे. परंतु याचबरोबर ग्रामीण भागातील गोरगरीब, शेतमजूर महिलांनाही स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध होत आहे.
>
> **- श्रीमंत कोकाटे,** इतिहास तज्ज्ञ

# शिवसेना अक्कलकोट शाखा नव्याने गठीत होणार



### विधानसभेच्या पार्श्वभूमीवर हालचाली; काहींना नारळ, काहींना नव्याने मिळणार जबाबदारी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ ऑगस्ट-**

आगामी विधानसभा निवडणूक रणधुमाळी दोन महिन्यांवर येऊन ठेपली असून काउंटडाऊन सुरु झाले आहे. यामुळे प्रत्येक राजकीय पक्ष संघटन बांधणीमध्ये व्यस्त आहे. अनेक राजकीय पक्षानी खांदेपालट करुन नवीन कार्यक्षम नेतृत्त्वाला संधी नवीन कार्यकर्ते, नेते जोडणे काहींना जबाबदारी देणे अशा घडामोडीस प्रारंभ झाला आहे.

अक्कलकोट शहर शिवसेना शाखा नव्याने बांधणी करण्याचा मनोदव तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांनी पत्रकाद्वारे जाहीर केला आहे. आगामी विधानसभा नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणूक निमित्ताने शिवसेना अक्कलकोट शहर शाखा नव्याने गठित करणार आहे. यामुळे शिवसेना विचाराशी, पक्षाशी एकनिष्ठ कार्यकर्त्यांनी शिवसंपर्क सदस्य नोदणी अभियानात सामील व्हावे. जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करून शिवसेना घरोघरी पोहचणार, पक्ष संघटन मजबूत करणार नव्याने काही कार्यकर्ते, नेते पक्ष संघटने त सामिल करणार, जबाबदरी देणार, काहींना पदमुक्त करणार अशी माहिती तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांनी दिली आहे.

# राष्ट्रीय समाज पक्षाच्या सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी सुरेश गुत्तेदार यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**मैंदर्गी दि. १३ ऑगस्ट -**



राष्ट्रीय समाज पक्षाच्या सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड राष्ट्रीय समाज पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष काशिनाथ नाना शेवते यांच्या शुभहस्ते नियुक्ती करण्यात आली. गुरुवार दिनांक १ ऑगस्ट रोजी सर्जेराव जाधव सभागृह येथे बुथप्रमुखांचा मेळावा तसेच नवनियुक्त पदाधिकारी निवडीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्य महासचिव माऊली नाना सलगर, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील दादा बंडगर, अक्कलकोट विधानसभा निरीक्षक अजितदादा पाटील, सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर पुजारी, यशवंत सोंडगे, सोलापूर शहर अध्यक्ष सतीश बुजूरके, अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर आदी उपस्थित होते. नियुक्ती झाल्यानंतर आपले मनोगत व्यक्त करताना जिल्हा उपाध्यक्ष सुरेश गुत्तेदार म्हणाले की पक्षाने जो माझ्या वर विश्वास दाखवले आहे त्याला सार्थ ठरविण्याचे काम मी करणार असल्याचे सांगितले. तसेच आगामी विधानसभा निवडणुकीत पक्षाचे संघटन मजबूत करण्यासाठी तालुक्यात शाखा काढणार असल्याचे सांगितले.

# सांगोला तालुक्यात तीन हजार शिधापत्रिका वाढणार

## माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांच्या प्रयत्नाला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ ऑगस्ट-**

२०११ रोजी झालेल्या जनगणनेच्या आधारे सांगोला तालुक्याचा इष्टांक ७६.३२ इतका निश्चित करण्यात आला होता. परंतु २०१३ रोजी झालेल्या सर्वेक्षणात राजकीय हस्तक्षेप झाल्याने तालुक्यातील हजारो नागरिकांना शिधापत्रिकापासून वंचित राहावे लागत होते. यामुळे अनेक गोरगरीब जनतेवर उपासमारीची वेळ आली होती. ही बाब लक्षात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिपकआबा साळुंखे पाटील यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे सांगोला तालुक्याचा इष्टांक वाढवून मिळावा, अशी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्या मागणीला अखेर यश आले असून शिधापत्रिकेपासून वंचित असलेल्या



नवीन ११ हजार नागरिकांना आता शिधापत्रिकेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांच्या मागणीची तात्काळ दखल घेऊन छगन भुजबळ यांनी याबाबत संबंधित विभागाला आदेश दिले. याबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे आणि सांगोल्याचे तहसीलदार संतोष कणसे यांना पत्र देऊन सांगोला तालुक्यात नव्याने ११ हजार युनिटस् किंवा सुमारे अडीच हजार शिधापत्रिका वाढवण्याच्या सूचना दिल्या आहेत. तहसीलदार संतोष कणसे यांनी तालुक्यातील प्रत्येक गावात ग्राम दक्षता समितीला लेखी पत्र पाठवून ग्रामीण भागात शिधापत्रिकेपासून वंचित असलेल्या नागरिकांची तसेच गावात राहणाऱ्या विधवा, परितक्त्या महिला दिव्यांग व्यक्ती, अन्नसुरक्षा योजना तसेच निराधार नागरिकांची माहिती मागवली आहे. या शिधापत्रिकेवर शासनाच्या मोफत अन्नधान्य योजनेचा लाभही मिळणार असल्याने तालुक्यातील हजारो वंचित नागरिकांमधून आता आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

> सांगोला तालुक्यातील अत्यंत महत्त्वपूर्ण मागणीची महाराष्ट्र राज्य सरकारने तसेच छगन भुजबळ यांनी दखल घेऊन अडीच ते तीन हजार नवीन शिधापत्रिका देण्याचा निर्णय घेतला. त्याबद्दल महायुतीच्या सरकारचे आणि छगन भुजबळ यांचे सांगोला तालुक्याच्या वतीने आम्ही सदैव आभारी राहू,आणखी जे पात्र लाभार्थी शिधापत्रिकापासून वंचित राहतील त्याबाबतही वरिष्ठांनी शब्द दिला आहे. त्यानुसार एकही पात्र लाभार्थी शिधापत्रिका पासून वंचित राहणार नाही याची प्रकर्षाने काळजी घेऊ.
>
> **- दीपकआबा साळुंखे-पाटील,**
> जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

# अणदूर ते नागझरी : एक अतूट श्रद्धेची परंपरा

## श्रावण महिन्यात खंडोबांना नागझरी येथील होमकुंडातील पाण्याने केला जातो अभिषेक

**तभा वृत्तसेवा । श्रीकांत अणदूरकर**
**अणदूर, दि. १३ ऑगस्ट-**

आंध्र, तेलनगणा, कर्नाटक, महाराष्ट्र राज्यातील लाखो भाविकांचे आराध्य दैवत असलेल्या अणदूरचे श्री खंडोबा मंदिर हे केवळ एक जागृत देवस्थान म्हणूनच नव्हे, तर एक अतूट श्रद्धेच्या आणि परंपरेच्या प्रतीक म्हणूनही ओळखले जाते. या मंदिराची ख्याती केवळ श्री खंडोबा हा महादेवाचा अवतार असल्यामुळेच नाही, तर येथे जपल्या जाणाऱ्या अनेक विधीपूर्वक परंपरांमुळेही आहे. त्यांपैकी एक म्हणजे श्रावण महिन्यात श्री खंडोबांना नागझरी येथील होमकुंडातील पाण्याने अभिषेक करण्याची प्रथा. याची संपूर्ण माहिती श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टचे सचिव पत्रकार सुनील ढेपे यांनी दिली आहे.

नागझरी हे ठिकाण मैलारपूर (नळदुर्ग) श्री खंडोबा मंदिराजवळच असलेल्या एका डोंगरात वसलेले आहे. येथील होमकुंडातील पाणी वर्षभर गरम राहते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. या कुंडाचे पाणी १९७२ च्या भीषण दुष्काळातही आटले नव्हते, ही बाब या श्रद्धेला आणखी बळकटी देते. अणदूरहून नागझरी हे अंतर जवळपास चार किलोमीटर आहे. नागझरीहून मैलारपूर (नळदुर्ग) आणि नंतर अणदूर अशा प्रकारे, अणदूरच्या पुजारी रोहित बाळू मोकाशे आणि शुभम महेश मोकाशे दररोज एकूण नऊ ते दहा किलोमीटर अंतर चालून कापतात. श्रावण महिन्याच्या प्रत्येक पहाटे ते पाऊस-वाऱ्याची पर्वा न करता ही यात्रा करतात. त्यांच्या खांद्यावर कावड असते आणि त्या कावडीवर प्रत्येकी दोन अशा एकूण चार घागरी असतात.

मैलारपूर (नळदुर्ग ) हून एकदा कावड हाती घेतली की ती खाली टेकवू नये, असाही एक कडक नियम आहे. या नियमामुळे ही यात्रा आणखीनच आव्हानात्मक बनते. तरीही, हे पुजारी अविरतपणे, श्रद्धेने आणि समर्पणाने ही परंपरा जपत आहेत. ते नागझरी येथे पोहोचतात, स्नान करतात आणि मग होमकुंडातील पाणी घागरीत भरतात. यानंतर हे पुजारी मैलारपूर (नळदुर्ग) श्री खंडोबा मंदिराकडे जातात. तेथे एक घागर महादेवाला अर्पण केली जाते आणि एका रिकाम्या घागरीत जवळच्या नदीचे पाणी भरून ते परत येतात. संपूर्ण श्रावण महिना हा त्यांचा दिनक्रम असाच चालू राहतो.



> **धार्मिक विधीच नव्हे तर एक निष्ठा**
>
> आजच्या सुपरफास्ट युगातही, जिथे प्रत्येक गोष्ट जलदगतीने होते, तिथे ही परंपरा अजूनही कायम आहे. चालत जाऊन, घागरींमध्ये पाणी आणण्याची ही पद्धत आणि त्यातही कावड खाली न टेकवण्याचा नियम, हे केवळ एक धार्मिक विधी नसून, ती एक निष्ठा, श्रद्धा आणि परंपरेचे जतन करण्याचा एक मार्ग आहे. आज श्रावण मासाच्या निमित्ताने आपण या परंपरेला आणि त्यामागील भक्तीभावाला वंदन करूया.

# प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने आट्यापाट्या स्पर्धा

**अकलूज, दि. १३ ऑगस्ट-**



शंकरनगर येथील प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने रविवार दि. २५ ऑगस्ट रोजी श्रीमती रत्नप्रभादेवी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जन्मशताब्दीनिमित्त व जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील व मदनसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या अमृत महोत्सवी वाटचालीनिमित्त भव्य आट्यापाट्या स्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते पाटील यांनी दिली. स्पर्धेसाठी १,३५,००० रु.ची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. यामध्ये प्रथम क्रमांकास ४४ हजार द्वितीय क्रमांकास ३३ हजार तृतीय क्रमांकास २२ हजार चतुर्थ क्रमांकास ११ हजार तर उपांत्य फेरीत पराभूत होणाऱ्या चार संघास प्रत्येकी पाच हजारांचे बक्षीस देण्यात येणार आहेत. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सहभागी संघास ५००/- रुपये प्रवेश फी ठेवण्यात आली आहे. सहभागी खेळाडूंना मंडळाच्यावतीने मोफत भोजनाची सोय करण्यात आली आहे. नावनोंदणी करण्यासाठी ९८६०३३१७१७,९३२५२५२९९६,९४२०७८२३२३ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन मंडळाचे उपाध्यक्ष पोपट भोसले यांनी केले आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## राष्ट्रीय समाज पक्षाचे नायब तहसीलदारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. १३ ऑगस्ट-**

सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना सरसकट अर्थसहाय्य मिळण्याबाबत अक्कलकोटचे निवासी नायब तहसीलदार विकास पवार यांना राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील बंडगर यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले.



यावेळी अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर, युवक आघाडीचे तालुका अध्यक्ष दाजी कोळेकर, शहर युवक आघाडीचे अध्यक्ष निलेश लवटे, संतोष सोलंकर, सतीश बिराजदार, दत्ताराम भांगे, बाबू शिकलगार, गणेश कांदे शिवा जमगे, प्रसाद मुकडे, साईनाथ फुलारे, शिवाजी खांडेकर, रवी बजंत्री आदी उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे, ज्या शेतकऱ्यांनी गेल्या वर्षी ई-पीक पाहणी केली आहे परंतु काही कारणास्तव ऑनलाईन झाले नसल्याने बऱ्याच शेतकऱ्यांवर अन्याय होणार आहे. तरी शासनाने सरसकट शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार अनुदान देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### करकंब येथे प्रज्ञाशोध परीक्षेतील १९९ विद्यार्थ्यांचा सन्मान

**करकंब, दि. १३ ऑगस्ट-**

करकंब येथील सुवर्ण गार्डन मंगल कार्यालय येथे पंढरपूर तालुक्यातील इयत्ता १ ते ७ वीमधील प्रज्ञाशोध परीक्षेत यशस्वी झालेल्या १९९ विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. शालेय परीक्षांबरोबरच इतर स्पर्धा परीक्षांमध्येही विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून आपले कौशल्य पणाला लावूत उज्वल यश संपादन करावे, असे मत प्रा.सतीश देशमुख यांनी याप्रसंगी व्यक्त केले. यावेळी त्यांनी शैक्षणिक प्रबोधनपर काही कविताही सादर केल्या. याप्रसंगी पंढरपूर तालुक्यातील करकंब, उंबरे, पटकुरोली, नांदोरे, पंढरपूर या केंद्रातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षिका पालक उपस्थित होते. सूत्रसंचालन विशाल आमराळे यांनी तर आभार मनिषा शेटे यांनी मानले. याप्रसंगी पत्रकार एल. एम. जाधव, पांडुरंग नाईकनवरे, विजयकुमार जवळेकर, शेखर कोरके, रमेश खारे, ज्ञानदेव ढोबळे, प्रा.किसन सलगर, बलभीम पाटील, रविकिरण वेळापूरकर, देवकी दुधाणे, अविनाश देवकते, डॉ.संतोष वलगे, सुनील अडगळे, मनिषा शेटे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी रामभाऊ जोशी हायस्कूलच्या स्काऊट गाईडचे विद्यार्थी, नितीन शेटे, रणदिवे, सावंत, खंडू परदेशी यांनी सहकार्य केले.



### माळशिरस येथे तालुकास्तरीय रानभाज्या महोत्सव

**नातेपुते, दि.१३ ऑगस्ट-**

आदिवासी समाज सुधारक बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे औचित्य साधून पौष्टिक, विविध रोग , व्याधी, यावर कारगर उपाय असलेल्या आरोग्य व आहारदृष्ट्या अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या नैसर्गिक रित्या येणाऱ्या रानभाज्यांचा व त्यांच्या पाककृतींचा महोत्सव, प्रदर्शन तालुका कृषी अधिकारी कार्यालय माळशिरस येथे संपन्न झाला. रानभाज्या महोत्सवाचे उद्घाटन तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी सुरेश शेजुळ यांचे उपस्थित वसंतराव नाईक सेंद्रिय शेती कृषी भूषण पुरस्कार जगनाथ मगर यांच्या हस्ते झाले. महोत्सवात विविध प्रकारच्या २४ रान भाज्यांचे नमुने व पाककृती अधिनस्त कृषी सहाय्यक व तालुक्यातील कृषी शेतकरी बांधव यांनी सादर केल्या. जगन्नाथ मगर यांनी रानभाज्यांचे आहारातील महत्त्व विशद केले. प्रस्ताविक सतीश कोळेकर यांनी केले सदर महोत्सवासाठी सारिका एकपुरे, स्वप्ना गोफने व विद्या माळी यांनी रानभाज्याची पाककृती व पक्वान्नाचे सादरीकरण केले व उपस्थितीत उपस्थित त्यांना चवीसाठी उपलब्ध करून दिले कार्यक्रमाचे नियोजन नातेपुते मंडल कृषी अधिकारी सतीश कचरे, तालुका तंत्र व्यवस्थापक, आत्मा कुलदीप ढेकळे, व सहाय्यक तंत्र व्यवस्थापक आत्मा माळशिरस रेश्मा क्षीरसागर यांनी केले तालुकास्तरीय रानभाज्या महोत्सवासाठी तालुका अधिनिस्त कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडल कृषी अधिकारी, पुरस्कार प्राप्त शेतकरी व शेतकरी बांधव यांनी उपस्थिती दर्शवली.



### कर्मवीर ग्रंथालयात डॉ. रंगनाथन जयंती साजरी

**बार्शी, दि. १३ ऑगस्ट-**

येथील कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन् यांची जयंती ग्रंथपालदिन साजरी करण्यात आली. प्रथम प्रमुख मान्यवरांचे हस्ते प्रतिमांचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी शिवाजी वडेकर, सुहास सुतार, चंद्रकांत वडेकर, सोमनाथ गायकवाड, प्रभाकर सातपुते, पांडुरंग आस्वदे, प्रेम अग्रवाल यांच्यासह सभासद, वाचक आदी उपस्थित होते. ग्रंथपाल विनोद गायकवाड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले.

### घरातून साडेतीन तोळ्याचे दागिने व रोख ४० हजार चोरट्याने पळविले

**बार्शी, दि. १३ ऑगस्ट-**

तुळजापूर रोड येथील घरातील कपाट ठेवलेले रोख रक्कम व दागिने याची किंमत १ लाख ५३ हजार रुपयांची चोरीची फिर्याद पोलिसांत दाखला झाली. ही घटना दि. ८ ते १० ऑगस्टच्या दरम्यान घडली. याबाबत स्वाती दिनेश देशमुख रा तुळजापूर रोड यांनी शहर पोलिसांत अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीचे कोष्टी गल्ली येथे ज्वेलरीचे शॉप असून दिवसभर विक्री झालेले पैसे हे घरातील कपाटात ठेवत होते. तसेच दागिनेही कपाटात ठेवून दिवसभर शॉप चालवत होते. दि १० ऑगस्ट रोजी कपाटात पाहिले असता सुमारे साडेतीन तोळे सोन्याचे दागिने घडयाळ व रोख ४० हजार रुपये चोरीस गेल्याचे दिसून आले. बार्शी शहर पोलीस ठाणे याचा अधिक तपास करीत आहेत.

## जनता आपल्या पाठीशी असल्याने विजय निश्चित

### प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील; शिवस्वराज्य यात्रा मोहोळ येथे दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १३ ऑगस्ट-**

जेव्हा जेव्हा संकट आले तेव्हा सोलापूरकर धावून आले आहेत शिवसेना राष्ट्रवादीचे काही आमदार निघून गेले पण जनता आहे तिथेच आहे सरकारला पराभव समोर दिसत असल्यामुळे तिजोरी खाली करण्याच्या प्रयत्न होताना दिसत आहे काहीही होऊ द्या एक उमेदवार ठरवा लोक आपल्या मागे आहेत विजय आपलाच होणार असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) चे प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांनी मोहोळ मध्ये केले

शिवस्वराज्य यात्रा आज मोहोळ येथे दाखल झाली त्यानिमित्त मोहोळ येथील स्वातंत्र्य सेनानी संदीपान गायकवाड मंगल कार्यालय येथ सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते

याप्रसंगी खासदार अमोल कोल्हे, खा सदार धैर्यशिल मोहीते-पाटील, महिबुब शेख, बळीराम काका साठे, उत्तमराव जानकर, मोहोळ तालुका अध्यक्ष व नरखेडचे माजी सरपंच विनायक पाटील, लोकसेवक संजय क्षीरसागर, मोहोळ विधानसभा संयोजक सतीश पाटील मसले चौधरी,




ॲड. पवन गायकवा, विनय पाटील आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक तालुकाध्यक्ष आणि नरखेडचे माजी सरपंच विनयकुमार पाटील यांनी केले. लोकसेवक संजय क्षीरसागर म्हणाले की आम्ही शरद पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आम्ही राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षमध्ये लोकसभेपूर्वी प्रवेश केला आहे. तालुक्यामध्ये परिवर्तनाचे वारे वाहत आहेत हे लोकसभेच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार खासदार प्रणिती शिंदे यांना मिळालेल्या लीडमध्ये दिसून आले आहे. त्रासदायक ठरणारे अनगरचे अप्पर तहसील कार्यालय रद्द करण्यासाठी शरद पवार यांच्या कानावर घातले असल्याची माहिती दिली.

यावेळी उत्तमराव जानकर बोलताना म्हणाले, बीडच पार्सल परत पाठवल आता इंदापूरच पार्सल परत पाठवा जो काकांचे ऐकतो तोच पुतण्या पुढे जातो असे सांगत असे सांगत सर्वच प्रकल्प गुजरातला नेले जात आहेत मग तुम्ही मत मागायला आल्यावर महाराष्ट्रातील जनताही तुम्हाला गुजरातला पाठवल्या शिवाय राहणार नाही.शरद पवार साहेबांच्याच विचाराच्या उमेदवारास मतदान करा असे अवाहन महेबुब शेख यांनी केले. खा. धैर्यशील मोहीते-पाटील म्हणाले, प्रणिती शिंदे यांना ६३ हजार मताधिक्य दिल्या बद्दल मोहोळच्या जनतेचे आभार मानले. व म्हणाले की मताची विभागणी होवू नये यासाठ बंडखोरी चालणार नाही ती पक्षाला परवडणार नाही महाविकास आघाडीच्या माध्यमातून जे उभा राहतील ते जनता निवडून देणार आहे तसे जनतेने ठरवलेल आहे.

खासदा डॉ. अमोल कोल्हे म्हणाले, आमचा योजनांना विरोध नाही परंतु त्याचा हेतू चांगला पाहिजे तो चांगला नाही. त्यांचे आमदार मंत्री म्हणतात यावेळी नावासमोरचे बटन दाबा तरच पुढे योजना सुरु राहील, अशी त्यांची अवस्था आहे. लोकसभेला आपण भरभरून मतदान केले विजय झाला म्हणून गाफील राहू नका, असेही अवाहन केले. संजय क्षीरसागर यांचा आज वाढदिवस असल्याने त्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पक्षाचे शहराध्यक्ष राजेंद्र रसाळ राजेंद्र रसाळ युवा अध्यक्ष आयाज सुरकी, विक्रांत दळवे,श्रीकांत गायकवाड, रणजित चवरे, हिंमत येवले. ॲड. विनोद धावणे. ॲड. शुभम मोटे, ॲड. विठोबा पुजारी महेश धुमाळ, डॉ. बाळासाहेब वाघमोडे, सोमनाथ व्यवहारे, मधुकर सिरसाट, बीरूदेवकते, श्रीकांत लांडगे, दत्ता पाटील, रणजित आत्करे, दादा डोलारे, दिलीप धावणे आदींसह तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कटफळ अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना मिळणार मदत

### आ. शहाजीबापू पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१३ ऑगस्ट-**

भरधाव वेगाने जाणाऱ्या मालट्रक चालकाने एसटीची वाट पाहत थांबलेल्या मजूर महिलांना चिरडल्याने सांगोला तालुक्यातील कटफळ येथील सहा महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.दरम्यान आ.शहाजीबापू पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी पत्रव्यवहार करून कटफळ अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक मदत देण्याची मागणी केली होती.यावर मुख्यमंत्री



एकनाथ शिंदे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत विशेष बाब म्हणून तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे आदेश मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या सहसचिवांना दिले आहेत,अशी माहिती आ.शहाजीबापू पाटील यांनी दिली.

दि.१८ जून रोजी दुपारी पंढरपूर-कराड रोडवरील चिकमहूद जवळ(बंडगरवाडी) पाटी येथे आश्विनी शंकर सोनार,इंदुबाई बाबा इरकर,शिरमाबाई लक्ष्मण जाधव,कमल यल्लाप्पा बंडगर,सुलोचना रामा भोसले,मनीषा आदिनाथ पंडित सर्वजण रा.कटफळ ता.सांगोला यांचा अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला होता.तर मिनाबाई दत्तात्रय बंडगर या गंभीर जखमी झाल्या होत्या.आ.शहाजीबापू पाटील यांनी या घटनेबाबत दुःख व्यक्त करून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची तसेच जखमी महिलेच्या उपचारासाठी २५ हजार रुपयांची व्यक्तिगत मदत दिली होती.तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क साधून मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून अधिकची मदत मिळवून देण्यासाठी पत्रव्यवहार केला होता.लवकरच कटफळ अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक मदत देण्यात येईल असे आ. शहाजीबापू पाटील यांनी सांगितले.



## संत निरंकारी मंडळाच्या शिबिरात ८० जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१३ ऑगस्ट-**

संत निरंकारी मंडळाच्या शिबिरात ८० जणांची रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन महादेव बिराजदार, चांदभाई तांबोळी, रणवीर राऊत यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाला बार्शी तालुक्याच्या वन अधिकारी अलका करे, डॉ. गणेश सातपुते, प्रा. खोत, अमृत राऊत, ॲड. तुषार गव्हाणे, दीपक राऊत, गव्हाणे, देशमुख, गोविंद पवार, दिनेश वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमासाठी किशोर ढोले, ऋषिकेश शेळके, संगीता भोसले, विश्वनाथ कापसे, राजेंद्र चव्हाण, शशिकांत शिंदे, उत्तम कावरे, ॲड. शाम पाटील, डॉ. अंकुश नवले, गणेश उमाप, गोविंद कसबे यांचे सहकार्य लाभले. रक्त संकलन रामभाई शहा ब्लड बँक बार्शी यांनी केले व आभार विठ्ठल बचुते यांनी मानले.



## अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष भोसले यांच्याकडून मल्लिकार्जुन मंदिर बांधकामास पाच लाखांचा धनादेश

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ ऑगस्ट-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांनी श्रावण मासाचे औचित्य साधून नव्याने उभारत असलेल्या ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिर बांधकामास जाहीर केलेल्या पाच लाखांच्या देणगीचा धनादेश न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते मंगळवारी अन्नछत्र मंडळाच्या अतिथी कक्षात मंदिर समितीस देण्यात आला.

यावेळी श्री मल्लिकार्जुन मंदिर समितीचे प्रशांत लोकापुरे, स्वामिनाथ हिप्परगी, सुनील गोरे, बसवराज माशाळे, अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे काका, प्रा. आडवीतोटे, विजकुमार कापसे, शिवराज स्वामी, राजु नागुरे, सिद्धराम कवटगी यांच्यासह न्यासाचे विश्वस्त संतोष भोसले, मनोज निकम, आतिश पवार, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, बाळासाहेब पोळ, महांतेश स्वामी, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांचा पैसा लुटून कोणी तिजोऱ्या भरल्या?

### शेतकरी संघटनेचे शंकर गायकवाड यांचा सवाल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ ऑगस्ट-**

पुणे येथे कृषी आयुक्त कार्यालय व पिक विमा कंपनीच्या राज्यस्तरीय कार्यावरती मागील महिन्यात केलेल्या आंदोलनानंतर, सरकारने खरीप २०२३ च्या वंचित शेतकऱ्यांसाठी ७१५० कोटी मंजूर केले. परंतु महिना उलटला तरी अद्यापपर्यंत सर्व शेतकऱ्यांना ही रक्कम दिली गेली नाही, मग हा शेतकऱ्यांचा पैसा लुटून कोणी तिजोऱ्या भरल्या, असा संतप्त सवाल शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांनी बार्शी तालुक्यातील हत्तीज येथे, विठ्ठल रुक्मिणी सभागृहात झालेल्या कार्यक्रमांमध्ये केला.



सन २०२३ मधील खरीप व रब्बीचे पीक विम्याचे पैसे आठवड्याच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा न झाल्यास संबंधित शासकीय व विमा कंपनीच्या राज्यस्तरीय कार्यालयावरती तीव्र स्वरुपाची आंदोलने करणार असल्याचा इशाराही यावेळी त्यांनी दिला.

यावेळी शेतकरी संघटनेचे तालुका कार्याध्यक्ष महादेव काशीद, रोहित गीते, योगेश पाटील, विजय सातपुते, प्रदीप पाटील, अनंत जाधव, विठ्ठल सातपुते, भारत दळवे, जीवन गीते, चंद्रकांत पाटील, ज्ञानदेव वाळवे, शिवराम जाधव, प्रवीण पाटील, रमेश पाटील, चंद्रहास बोकडे, बाबासाहेब सावंत, नेताजी गीते, ज्ञानदेव कुटे, शांतिनाथ पाटील, तुषार कुटे, कुबेर गीते, दादा गीते, बापूराव गीते, बिरुदेव बनसोडे, बंटू सावंत, सुहास साळुंखे, पोपट सावंत, शंकर सावंत, अविनाश सातपुते, रोहित पाटील, गोपाळ बनसोडे, उमेश सावंत, रोहित जाधव, बाळू गरड आदींसह पंचक्रोशीतील बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधाकर गीते यांनी केले तर मधुकर गीते यांनी आभार मानले.

## पाच वर्षात फसवणुकीचे नाही तर विकासाचे राजकारण केले

### आमदार संजयमामा शिंदे; संगोबा, आवाटी येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १३ ऑगस्ट-**

सन २०१९ नंतर करमाळा मतदारसंघाचा आमदार झाल्यापासून आपण तालुक्यात विकासाचे राजकारण केले. एखादी गोष्ट होत असेल तर त्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला व ती कामे मार्गी लावली. परंतु एखादी न होणारी गोष्ट विनाकारण लोकांना खोट्या भूलथापा देऊन फसवणूक करणे हे काम मी केलं नाही आणि मी तसले राजकारण करतही नाही. मतदारसंघात जवळपास ३ हजार कोटींचा निधी आपण उपलब्ध केला, असल्याचे प्रतिपादन आमदार संजयमामा शिंदे यांनी केले.

संगोबा व आवाटी येथे विविध विकास कामांचा भूमीपूजन व लोकार्पण सोहळा आ.संजयमामा शिंदे यांचे हस्ते व माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी ते



बोलत होते. यावेळी व्यासपीठावर तानाजी झोळ, विलास पाटील, चंद्रहास निमगीरे, उध्दव माळी, सुनील सावंत, ॲड. राहुल सावंत, कंदरचे सरपंच मौला मुलाणी, अशोक पाटील, ॲड. रविंद्र विध्ने, उपसरपंच अमर भांगे, अजिंक्य पाटील, किरण फुंदे, गोरख गुळवे, विनय ननवरे आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते करमाळा बोरगाव घारगाव ते जिल्हा रस्ता ५-४ कोटी ५० लाख, बोरगाव ते निलज रस्ता ग्रामा ८१ - २ कोटी, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना रामा ६८ ते सटवाई वस्ती निलज ते बिटरगाव श्री रस्ता ३ कोटी २८ लाख, पर्यटन विभाग संगोबा घाट -९० लाख, आवाटी दर्गा वॉल कंपाऊंड -९९ लाख,गौंडरे फाटा ते नेरले रस्ता २ कोटी ८५ लाख,फिसरे हिसरे हिवरे ते कोळगाव इजिमा ८ रस्ता - २ कोटी या अर्थसंकल्पामध्ये मंजूर झालेल्या रस्ता कामांचे तसेच प्रधानमंत्री ग्राम सडक व पर्यटन विभागाकडून मंजूर झालेल्या कामांचे भूमिपूजन व लोकार्पण झाले. कार्यक्रमासाठी राजेंद्र बाबर, ॲड. आजीत विघ्णे, दादासाहेब सावंत, मानसिंग खंडागळे, अशोक पाटील, अशपाक जमादार, अभिषेक आव्हाड, शहाजी झिंजाडे, युवराज गपाट, दत्तात्रय अडसूळ, राजेंद्र धांडे, तात्या पाटील, राजेंद्र पवार, सुहास रोकडे, सतीश शेळके, मयूर रोकडे, बापू तांबे, बबनराव मुरुमकर, आशिष गायकवाड, भरत अवताडे, सुजित बागल, परमेश्वर भोगल, गौतम ढाणे, नानासाहेब मोरे, पोपट सरडे, संतोष गायकवाड, भोजराज सुरवसे उपस्थित होते.

## लमाण तांडा समृद्धी योजनेच्या सदस्यपदी किरण राठोड

**अक्कलकोट, दि. १३ ऑगस्ट-**



संत सेवालाल महाराज बंजारा, लमाण तांडा समृद्धी योजनेच्या अशासकीय सदस्यपदी तालुक्यातुल डिग्गेवाडी तांड्यातील किरण राठोड व उत्तर सोलापूर तालुक्यातील प्रतापनगर येथील अशोक चव्हाण यांची निवड शासनाचे उपसचिव पंडित जाधव यांच्या स्वाक्षरीने शासन निर्णय ग्रामविकास विभागाकडून काढण्यात आलेल्या परिपत्रकान्वे जाहीर करण्यात आले आहे. या योजनेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये किरण राठोड व अशोक चव्हाण या शासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे . किरण राठोड व अशोक चव्हाण यांच्या निवडीचे जिल्ह्यातून सर्व स्तरातून अभिनंदन होत असून तांडा समृद्धी योजनेतून सर्वांगीण विकासाची ग्वाही उभयत्यांनी दिली.

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत 'आर्य चाणक्य'ची तिरंगा रॅली

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ ऑगस्ट -**
धाराशिव शहरातील आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त देशभर सुरू असलेल्या हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत आज तिरंगा रॅली काढली.

या तिरंगा रॅलीत विद्यार्थी विद्यार्थिनींनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी कार्य केलेल्या महापुरुषांचा जयजयकार करत देशभक्तीचे दर्शन घडवले.

शाळेचे मुख्याध्यापक डॉ. मनीष देशपांडे यांच्या हस्ते या रॅलीला हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरुवात करण्यात आली. तर यानिमित्ताने प्रशालेत करण्यात आलेल्या ध्वजारोहण प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका देशमाने यांच्या हस्ते संपन्न झाले.

ही रॅली आर्य चाणक्य विद्यालयापासून समर्थनगर मार्गे काढण्यात आली होती.






## ▶▶संक्षिप्त वृत्त...



### पाथर्डीच्या जि.प. शाळेत तिरंगा रॅली

**कळंब, दि.१३ ऑगस्ट -**
तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी येथे हर घर तिरंगा अंतर्गत विद्यार्थ्यांची तिरंगा रॅली काढण्यात आली. याप्रसंगी ग्रामस्थ, ग्रामपंचायत व शाळेच्या वतीने तिरंगा ध्वजाचे वाटप करण्यात आले. गावातील प्रमुख रस्त्यांवरुन रॅली काढण्यात आली. घरोघरी सन्मानपुर्वक तिरंगा ध्वज फडकावला आहे. विद्यार्थ्यांनी विविध देशभक्ती पर घोषणा दिल्या. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालय, आरोग्य उपकेंद्र इत्यादी ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले. या तिरंगा रॅलीमध्ये सरपंच नानासाहेब पिंगळे, अर्जुन जाधव, संदेश जोशी, ठाकर, धनंजय गव्हाणे, सरोजिनी पोते, मनीषा पवार, सुरेखा भावले, वंदना पिंगळे, मंदाकिनी काकडे, विद्यार्थी, ग्रामस्थांनी सहभाग घेतला.



### कांबळे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**तेर, दि.१३ ऑगस्ट -**
धाराशिव तालुक्यातील तेर सोसायटीचे गटसचिव डी.बी. कांबळे सेवानिवृत्त झाल्याबद्दल धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा तेरचे शाखाधिकारी एस.एम. मांदळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अनिल पतंगे, अनिल कावळे, नामदेव वाकुरे, सुरेश बुकन उपस्थित होते.



### राजीव गांधी विद्यालयात ध्वजारोहण

**जळकोट, दि.१३ ऑगस्ट -**
हर घर तिरंगा अभियानांतर्गत राजीव गांधी विद्यालय, हंगरगा (नळ) येथे ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. दि.१३ रोजी राजीव गांधी विद्यालय, हंगरगा (नळ) येथे देशभर चाललेल्या हर घर तिरंगा अभियान अंतर्गत सुरुवातीस गावातून तिरंगा रॅली काढण्यात आली. त्यानंतर विद्यालयाचे मुख्याध्यापक घोडके यांच्या हस्ते सर्व अतिथीच्या उपस्थितीत विद्यालयाच्या नवीन इमारतीवर पहिला तिरंगा ध्वज फडकावला. यावेळी सरपंच अतुल कलशेट्टी, दयानंद चौगुले, प्रवीण चौगुले, दिलीप पाटील, संतोष बिराजदार, दादा मुदगडे, मोहन कांबळे, ग्रामसेवक पाटील, तलाठी जोगदंड व समस्त ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

### संपर्क प्रमुखपदी आश्रूबा कोळेकर

**तेर, दि.१३ ऑगस्ट -**



राष्ट्रीय समाज पक्षाच्या मराठवाडा विभाग संपर्क प्रमुखपदी धाराशिव तालुक्यातील कोळेकरवाडी येथील आश्रूबा कोळेकर यांची निवड करण्यात आली. राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रदेश अध्यक्ष काशीनाथ शेवते व मुख्य महासचिव ज्ञानेश्वर सलगर यांनी आश्रूबा कोळेकर यांची निवड केली आहे.

### स्वातंत्र्यादिनानिमित्त प्रश्न मंजुषा स्पर्धा

**कदेर, दि.१३ ऑगस्ट -**
भारत शिक्षण संस्था, उमरगा संचलित श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय, तलमोड (ता.उमरगा) शाळेत स्वातंत्र्य दिन यानिमित्त दि.१३ ऑगस्ट रोजी प्रश्न मंजुषा घेण्यात आली. याप्रसंगी मुख्याध्यापक जयवंत मोरे, सहशिक्षक माळी के.बी., जाधव जे.जी., सूर्यवंशी एम.आर., राठोड एन.एच., बिराजदार ए.एस., वडदरे एन.टी., शिक्षकेत्तर कर्मचारी पाटील ए.एस. मोरे व विद्यार्थी उपस्थित होते.



### शालेय लॉन टेनिस स्पर्धा संपन्न

**धाराशिव, दि.१३ ऑगस्ट -**
जिल्हास्तरीय शालेय लॉन टेनिस स्पर्धा तुळजाभवानी स्टेडियम येथील लॉन टेनिस कोर्ट वर पार पडल्या. स्पर्धेचे उद्घाटन भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे व दत्ता कुलकर्णी यांच्या हस्ते पार पडले. दोघांनीही श्रीफळ फोडून स्पर्धेचे उद्घाटन करून सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजसिंह राजेनिंबाळकर, अभय इंगळे, क्रीडाधिकारी भैरवनाथ नाईकवाडी, सुजित साळुंके, राजाभाऊ कारंडे, अमोल राजेनिंबाळकर, अजिंक्य राजेनिंबाळकर, गणेश मोरे, क्रीडा कोच डिंपल ठाकरे, अक्षय बिराजदार, अजिंक्य वराळे, इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक जिल्हा लॉन टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष युवराज नळे यांनी केले. तर आभार सचिव हर्षद जैन यांनी मानले.

# भाजपाचे जिल्हास्तरीय अधिवेशन व विस्तारीत कार्यकारिणीची धाराशिवात आज बैठक

## जिल्ह्यातील सर्व आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधींनी उपस्थित राहावे : जिल्हाध्यक्ष संताजीराव चालुक्य-पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ ऑगस्ट -**
धाराशिव जिल्हा भारतीय जनता पार्टीचे जिल्हास्तरीय अधिवेशन व विस्तारित कार्यकारिणीची बैठक बुधवार, १४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता स्वस्तिक मंगल कार्यालय, बार्शी नाका, धाराशिव येथे आयोजित करण्यात आली आहे. या जिल्हास्तरीय अधिवेशन व विस्तारित कार्यकारिणी बैठकीस भाजपाचे आजी-माजी पदाधिकारी, आमदार, माजी आमदार, लोकसभा व विधानसभा निवडणूक लढलेले उमेदवार, प्रदेश पदाधिकारी, प्रदेश कार्यकारिणी



सदस्य, विविध आघाड्या, प्रकोष्ट, मोर्चे जिल्हा, तालुकाध्यक्ष, महामंत्री, तालुका पदाधिकारी, विद्यमान नगराध्यक्ष, माजी नगराध्यक्ष, नगरसेवक, माजी नगरसेवक, सरपंच, चेअरमन, सहकारी बँकेचे संचालक, शिक्षण संस्था संचालक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष संताजीराव चालुक्य-पाटील यांनी केले आहे.

जिल्हास्तरीय अधिवेशनात भारतीय जनता पार्टीचे माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री माजी आमदार संभाजीराव पाटील-निलंगेकर हे प्रमुख मार्गदर्शक असून तुळजापूर विधानसभा मतदार संघाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी मंत्री बसवराज पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने हे अधिवेशन आणि विस्तारित कार्यकारिणीची बैठक महत्त्वपूर्ण आहे.

त्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष संताजीराव चालुक्य-पाटील यांनी केले आहे.

## 'शिवस्वराज्य यात्रा' आज तुळजापूरात

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ ऑगस्ट**
राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची राज्यभर सुरू असलेली शिवस्वराज्य यात्रा शहरात बुधवार दि.१४ ऑगस्ट रोजी येणार असून सकाळी श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतल्यानंतर धाराशिव बायपास पुल रोड जवळील केवडकर कार्यालय ठिकाणी सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या सभेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रवादीचे प्रांताध्यक्ष जयंतराव पाटील, खा. अमोल कोल्हे, जितेंद्र आव्हाड, आ. रोहित पवार, राजेश टोपे, रोहिणी खडसे, महेबूबभाई शेख, पंडित कांबळे, जीवन गोरे यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या शिवस्वराज यात्रेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सक्षणा सलगर, तालुकाध्यक्ष धर्यशिल पाटीलसह सर्व शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## तुळजापूर येथील नविन बस स्थानकाचे सप्टेंबर महिन्यात उद्घाटन

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ ऑगस्ट -**
नव्याने बांधकाम होत असलेल्या तुळजापूर येथील बसस्थानकाचे सप्टेंबर महिन्यात होणार उद्घाटन होणार असून शहरवासी, भाविकांच्या सेवेत नविन बसस्थानक सुरु होणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

दि.१२ ऑगस्ट रोजी आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी नव्याने बांधकाम होत असलेल्या बसस्थानकाला भेट दिली. शारदीय नवरात्र दि.३ आक्टोंबरला घटस्थापन होत असल्या कारणाने भाविक, शहर वासियांच्या दृष्टी कोणातुन शहरातील मध्यवर्ती असणारे बसस्थानक हे लवकर सुरु व्हावे या दृष्टी कोणातुन संबंधीत कॉंट्रक्ट, एस.टी. महामंडळाचे संभाजीनगर, धाराशीवचे सर्व अधिकारी यांची सर्कीट हाऊस (रेस्टहाऊस) येथे बैठक घेतली. तसेच सदरील होत असलेल्या कामाची पहाणी समक्ष जागेवरती जाऊन केली. पुढील महिन्यापर्यंत लवकरात लवकर बस स्थानक हे भाविकांसाठी सुरु व्हावे बाबत सुचना दिल्या. तथा कामाच्या दर्जा बाबतही सांगितले.



बैठकीस विनोद गंगणे, सचिन रोचकरी, आनंद कदले, सतिश दंडनाईक, नरेश अमृतराव, लखन पेंदे, सचिन पाटील, नरसिंग बोदले, राजेश्वर कदम, राजेश बच्चु शिंदे, माऊली भोसले, धैर्यशील दरेकर, रत्नदीप भोसले, आण्णाप्पा पवार बैठकीस उपस्थित होते.

## 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत नळदुर्ग न.प.च्या वतीने विद्यार्थ्यांची प्रभात फेरी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१३ ऑगस्ट -**
हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत दि.१३ ऑगस्ट रोजी नळदुर्ग नगर पालिकेच्या वतीने शहरातुन शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीमध्ये शालेय विद्यार्थ्यांबरोबरच नगरपालिकेचे कर्मचारी, बचत गटाच्या महिला, सफाई कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

हर घर तिरंगा उपक्रमाअंतर्गत दि.१३ ऑगस्ट रोजी नळदुर्ग नगरपालिकेच्या वतीने शहरातुन शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली.

नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी झेंडा दाखवुन प्रभात फेरीची सुरुवात केली. ही प्रभात फेरी नगरपालिकेपासुन निघाल्यानंतर राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, शास्त्री चौक, भवानी चौक, चावडी चौक, क्रांती चौक, किल्ला गेट, कुरेशी गल्ली, हुतात्मा स्मारक मार्गे नगरपालिकेत आल्यानंतर प्रभात फेरीचे विसर्जन करण्यात आले. या प्रभात फेरीमध्ये जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळा, जि.प. प्रशाला मुलांची मराठी व उर्दु शाळा या शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

त्याचबरोबर या प्रभात फेरीमध्ये नगरपालिकेचे कार्यालयीन अधीक्षक अजय काकडे, लेखापाल गोविंद अंबर, सहाय्यक प्रकल्प अधिकारी सुरज गायकवाड, नगर अभियंता वैभव चिंचोले, पाणी पुरवठा अभियंता दिक्षा शिरसाट, दीपक कांबळे, समीर मोकाशी, रानुबाई सपकाळ, माधुरी जाधव, फुलचंद सुरवसे, बाबा डुकरे, दस्तगीर जागीरदार, प्रविण चव्हाण, नितीन पवार, खंडु शिंदे, अमित गायकवाड, शहाजी येडगे, खंडु नागणे, सोनु देडे, कल्पना गायकवाड, जिजाबाई जाधव, वहिदा सौदागर, सुनंदा जाधव, रंजना गायकवाड, इंदुमती भोसले यांच्यासह सफाई कर्मचारी सहभागी झाले होते.

### विभागीय कृषी सहसंचालक दिवेकर यांची प्रक्षेत्रास भेट

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१३ ऑगस्ट -**
विभागीय कृषी सहसंचालक साहेबराव दिवेकर यांनी धाराशिव तालुक्यातील हिंगळजवाडी गावात भेट देऊन विविध योजना अंतर्गत राबवण्यात आलेल्या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रात भेट दिली.

सोयाबीन उत्पादक शेतकरी बाळासाहेब नाईकनवरे यांच्या क्षेत्रावर अंबाजोगाई येथील कृषी विज्ञान केंद्राचे कृषी विद्या वेत्ता वसंत सूर्यवंशी यांनी सोयाबीनवरील युनो मुझे पिवळा विषाणू बाबत माहिती देऊन नियंत्रणाचे शेतकरी यांना उपाय सांगितले.

## आठवडी बाजारात ठेकेदारास कर वसुलीस करण्यास नागरिकांचा मज्जाव

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१३ ऑगस्ट -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथील आठवडी बाजारात मुरूम टाकण्याची मागणी नागरिकांनी ग्राम पंचायतकडे निवेदनाद्वारे केली होती. परंतू ग्राम पंचायतने बाजारात मुरूम टाकला नसल्याने संतप्त नागरिकांनी ठेकेदारास कर वसुली करू दिली नाही.

तेर येथील आठवडी बाजारात ग्रामपंचायत यांनी लवकरात लवकर मुरूम टाकण्यात यावा अन्यथा पुढील आठवड्यात आठवडी बाजारात ठेकेदारास कर वसुली करू दिली जाणार नाही, असा इशारा नागरिकांनी तेर ग्राम पंचायतला निवेदनाद्वारे दिला होता. परंतू ग्रामपंचायत यांनी मुरूम टाकला नसल्याने सोमवार १२ ऑगष्टला तेर येथे आठवडी बाजार असल्याने ठेकेदारास कर वसुली सचिन देवकते, शिवाजी पडुळकर, विठ्ठल कदम यांनी करु दिली नाही.

सध्या ग्राम पंचायतीकडे निधी उपलब्ध नसल्याने आठवडी बाजारात मुरूम टाकला नाही. त्यामुळे येत्या २ ते ३ दिवसात ग्रामपंचायत कडून आठवडी बाजारात मुरूम टाकण्यात येईल. त्यामुळे आठवडी बाजारातील कर वसुली करण्यास आपणाकडून सहकार्य करावे, असे लेखी आश्वासन दिल्यानंतर ठेकेदारास कर वसुली करू देण्यात आली. ग्रामपंचायतने लेखी आश्वासन दिल्यानंतर ठेकेदारास कर वसुली करू दिली.

## शिवबा नगर जि.प. शाळेच्या आवारात गटारीचे साम्राज्य

### उपाया-योजना करण्याची नागरिकांची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.१३ ऑगस्ट -**
उमरगा तालुक्यातील कदेर गावात जि.प. शाळेचा समोर रस्त्यावर गटारीचे साम्राज्य पसरले आहे. पावसाचे पाणी आणि लोकांचे घरातील आंघोळीचे व घाण पाणी हे रस्त्यावर सोडले जात आहे.तो रहदाळीचा रस्ता आहे. तो शिवबा नगर येथील मुख्य रस्ता आसून त्यातून महिला, पुरुष, शाळकरी मुले यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

गटारीमुळे त्या पाण्यावर शेवाळे स्वरूप तयार झाले आहे. रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून त्यातून वाहने घेऊन जाणं सुध्दा अवघड झाले आहे. तिथे राहणारे लहान मुले आणि शाळेत शिकणाऱ्या मुलांना डेंग्यू, मलेरिया, टायफॉइड अशा आजारांना सामोरे जावे लागेल याची भीती मात्र सर्वांना लागली आहे. जिल्हा परिषद शाळेत गरीब आणि शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेत आहेत.



सदरील लहान मुले याच घाण पाण्यातून येत जात आहेत. आणि दुपारी जेवणाचा सुट्टीमध्ये हे लहान मुले जेवण्यासाठी मैदानात बसतील तेव्हा यातील डोळ्याला न दिसणारे लहान जंतू त्यांचा जेवणात जाऊन विषबाधा होऊ शकते. यामुळे पालकात भीतीचे वातावर निर्माण झाले आहे. हे सर्व प्रकार प्रशासन उघड्या डोळ्यांनी पाहत आहे; परंतु काही उपाय योजना करत नाही. त्यामुळे लोकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

या साचलेल्या घाण गटारीचा पण्यावरती काहीतरी उपाय योजना प्रशासनाने करावी, अशी मागणी जनतेतून होत आहे.

## २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादकांना अर्थसहाय्य मिळण्यासाठी ई-पीक पाहणीची अट लावू नये : आ. कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१३ ऑगस्ट -**
२०२३ च्या खरीप हंगामामध्ये कापूस व सोयाबीन पिकाला अत्यंत कमी दर मिळाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. त्या नुकसानीवर उपाययोजना म्हणून राज्य शासनाने सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे, दोन हेक्टर पर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये ई-पीक पाहणी पोर्टलद्वारे कापूस व सोयाबीन लागवडीची नोंद केली आहे, असे नोंदणीकृत शेतकरीच अर्थसहाय्याकरिता पात्र राहतील अशी अट टाकण्यात आली आहे. ही अट रद्द करावी, अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी केली आहे.



यावेळी पाटील यांनी पत्रात म्हटले की, शेतकरी एक हेक्टरमध्ये जवळपास १५ क्विंटल सोयाबीनचे उत्पन्न घेतात. २०२१-२२ मध्ये सोयाबीन पिकाचा सरासरी भाव १० हजार रुपये क्विंटल होते. मोदी सरकारचे व्यापारीहित धोरण शेतकऱ्यांना मारक ठरले आहे. सोयाबीन पिकाचे भाव कमी होऊन आता चार ते साडेचार हजार रुपये प्रति क्विंटल एवढे झाले आहेत. मोदी सरकारच्या धोरणामुळे शेतकऱ्यांचे हेक्टरी ७५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. राज्य सरकार एक क्विंटल सोयाबीन पिकाचा भाव म्हणजेच हेक्टरी पाच हजार रुपये अर्थसहाय्य देऊन शेतकऱ्यांची चेष्टा करत आहे. त्यातही शासन निर्णयात लावलेल्या जाचक अटीमुळे अनेक शेतकरी अर्थसहाय्यापासून वंचित राहणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार आहे. २०२३ मध्ये शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी केली परंतु त्यावेळी निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणीमुळे त्यांची नोंद ऑनलाईन होऊ शकली नाही. त्यामुळे ई-पीक पाहणीची अट न लावता सातबारावर पीक पेऱ्यात सोयाबीन व कापूस पिकाची नोंद असेल किंवा विमा भरताना पिकांची खात्री केल्याशिवाय विमा भरून घेतला जात नाही. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीन व कापूस पिकाचा विमा भरला आहे अशा नोंदी ग्राह्य धरून शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देणे आवश्यक आहे. जेणेकरून सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकरी अर्थसहाय्यापासून वंचित राहणार नाहीत.

२०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ई-पीक पाहणीची अट न लावता सातबारावर पीक पेऱ्यात सोयाबीन व कापूस पिकाची नोंद असेल वा ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीन व कापूस पिकाचा विमा भरला आहे अशा सर्व शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्यात यावे, असेही आ. पाटील यांनी मुख्यमंत्री यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

## श्री सिद्धेश्वर विद्यालयाच्या वतीने 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत महारॅली




**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.१३ ऑगस्ट -**
तालुक्यातील कसगी गावात सिद्धेश्वर विद्यालयाचा वतीने हर घर तिरंगा मोहीम राबविण्यात आले.

भारतीय स्वातंत्र्याचा गौरवशाली परवा निमित्त जनतेच्या मनात स्वातंत्र्यलढाणाच्या स्मृती तेवत राहाव्यात व देशभक्तीची जाज्वल भावना कायमस्वरूपी मनात राहावी व त्यांचे स्मरण व्हावे, या उद्देशाने दि.९ ते १५ ऑगस्ट या कालावधीत हर घर तिरंगा अभियानांतर्गत कसगी गावात तिरंगा ध्वज घेऊन अभियान राबवण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा. विठ्ठल पटणे, विठ्ठल बदोले, विजयसिंह राजपूत, मुख्याध्यापक आर.एम. माशाळे, सर्व शिक्षक, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत महारॅलीचे आयोजन करून गावातील प्रत्येक घरावरती १५ ऑगस्ट रोजी भारत देशाच्या ७८ वा स्वातंत्र्य दिनाच्या वर्धापनानिमित्त तिरंगा ध्वजारोहण करावे, असे आव्हान विद्यालयाच्या वतीने करण्यात आले.

# वर्ग-२ च्या जमिनी वर्ग-१ करण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय

## पाच टक्के नजराणा भरून जमिनी होणार नियमानुकूल... आ.राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ ऑगस्ट-**

मराठवाड्यातील देवस्थान व इनाम वर्ग-२ जमिनी रेडीरेकनर दराच्या ५ टक्के नजराणा भरून वर्ग-१ करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आल्याची बाब अतिशय स्वागतार्ह असून अनेक दिवसापासून अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच सातत्याच्या पाठपुराव्याने हा विषय मार्गी लावण्यात यश आल्याचे समाधान असल्याची प्रतिक्रिया आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केली आहे.



दि.३० जुलै रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यासह झालेल्या बैठकीत यास तत्वतः मान्यता देण्यात आली होती. सदरील बैठकीस आ. राणाजगजितसिंह पाटील देखील उपस्थित होते. आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत रेडीरेकनर दराच्या ५ टक्के नजराणा भरून या वर्ग-२ जमिनी वर्ग १ करण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले आहे. राज्य सरकारने जिल्ह्यातील इनाम व देवस्थानच्या जमिनी नियमानुकूल करण्यासंदर्भात घेतलेल्या या निर्णयामुळे शेतकरी आणि प्लॉटधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे, असे मत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केले आहे.

रेडिरेकणर दराच्या ५ टक्के नजराणा भरून वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये परावर्तित करण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय अतिशय आनंददायी असून जिल्हयावासीयांच्या वतीने महायुती सरकारचे आभार मानण्यात आले आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची सदिच्छा भेट

**धाराशिव, दि.१३ ऑगस्ट -**

पुणे-११ वेस्ट इंडीयन शुगर मीलस् असोसिएशन, पुणेचे अध्यक्ष व नॅचरल शुगरचे संस्थापक अध्यक्ष बी.बी.ठोंबरे आणि असोसिएशनचे सदस्य रवि गुप्ता, रोहित नारा या सन्माननीय सदस्यांनी दि.११ ऑगस्ट रोजी जयपुर येथे राजस्थानचे नवनियुक्त राज्यपाल ना. हरिभाऊ बागडे यांची भेट घेवून यथोचीत सन्मान करून अभिनंदन केले. ना.हरिभाऊ बागडे यांची राजस्थानचे राज्यपाल म्हणून नियुक्तनंतर हार्दिक अभिनंदन केले. वेस्ट इंडीयन शुगर मीलस् असोसिएशन, पुणे च्या ३१ ऑगष्ट २०२४ रोजीचे वार्षिक सर्वसाधारण सभेचे उद्घाटक म्हणून ना. हरिभाऊ बागडे यांना निमंत्रण देवून ना.हरिभाऊ बागडे यांना पुढील यशस्वी कारकिर्दीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.




### युवा भारुडकार कृष्णाई उळेकर हिचा सन्मान

**धाराशिव, दि.१३ ऑगस्ट -**

नृसिंह प्रतिष्ठान हिप्परगा-रवा तालुका लोहारा येथे लोककलेत करत असलेल्या कामाची दखल घेऊन युवा भारुडकार कृष्णाई प्रभाकर उळेकर हिला उमरगा-लोहारा तालुक्याचे आ. ज्ञानराज चौगुले, तहसीलदार सुभाष जाधव, संयोजक विजय लोमटे यांच्या शुभहस्ते मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. आ. ज्ञानराज चौगुले म्हणाले कृष्णाईने वेगळं क्षेत्र निवडून या कलेत आपला ठसा, ओळख निर्माण केली आहे. याप्रसंगी महेंद्र कावरे, विशाल सूर्यवंशी व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



### नशामुक्त भारतासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा : बनसोडे

**जळकोट, दि.१३ ऑगस्ट -**

सध्या युवा पिढी फार मोठया प्रमाणात व्यसनाधीन होत आहे.अलिप्त राहून त्यामुळे आरोग्यावर दुष्परिणाम होताना दिसून येत आहेत. या व्यसनापासून युवकांनी नशामुक्त भारत करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन नशाबंदी मंडळ महाराष्ट्राचे धाराशिव जिल्हा संघटक तथा परिवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव मारुती बनसोडे यांनी केले. भैरवनाथ माध्यमिक विद्यालय, चिकुंद्रा (ता.तुळजापूर) येथे आयोजित नशामुक्त भारत अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. समाज कल्याण अधिकारी कार्यालय जि.प. धाराशिव, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य जिल्हा शाखा धाराशिव व परिवर्तन सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक पवार हे होते. यावेळी गरड, गायकवाड व विद्यालयातील विद्यार्थिनी, विदयार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन भैरवनाथ कानडे यांनी केले. शेवटी व्यसन मुक्तीची शपथ विद्यार्थ्यांना देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### बालहक्क जनजागृती कार्यक्रम

**धाराशिव, दि.१३ ऑगस्ट -**

कळंब येथील सवित्रीबाई फुले उच्च व माध्यमिक विद्यालयात नुकतेच बालहक्कविषयक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी बालहक्क व मुलांच्या समस्या यावर चर्चा करण्यात आली. यावेळी बालविवाहाविषयी माहिती देण्यात आली. बालकासंबंधीच्या विविध योजनांचे आणि चाइल्ड हेल्प लाईन १०९८ ची माहितीही देण्यात आली. चाइल्ड हेल्प लाईनचे सूपरवायझर अमर भोसले,पल्लवी प्रशाळेचे मुख्याध्यापक पठाण यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. चाइल्ड हेल्प लाईन १०९८ जनजागृती उपक्रम प्रभारी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी ए.बी.कांबळे,जिल्हा बाल संरक्षण अधिकारी ए.बी.कोवे व चाइल्ड हेल्प लाईन १०९८ चे प्रकल्प समन्वयक व्ही.पी.चव्हाण यांच्या मार्गदर्शनात संपन्न झाला.

## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जि.प.च्या शाळेत वृक्षारोपण



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ ऑगस्ट-**

स्वातंत्र्य दिन अमृत महोत्सवाचे औचित्य साधून सोनारी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या प्रांगणामध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

मंगळवारी सोनारी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून, वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोनारी देवस्थान मठाचे पिर महंत शामनाथ महाराज, आंबी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ खरड, राष्ट्रवादी कॉंग्रेस भूम-परंडा-वाशी विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष नवनाथ जगताप, युवा सेना तालुका अध्यक्ष राहुल डोके, सरपंच दिपक दुबळे, राम पाटील, औदुंबर गाडे, माजी उपसरपंच अंगत फरतडे, आदी उपस्थित होते.

भारत स्वातंत्र्य दिनाचा अमृतमहोत्सव साजरा होत असून, या निमित्ताने शासन स्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. याच अनुषंगाने सोनारी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला.

जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सावंत, पिर महंत शाम नाथ महाराज, नवनाथ जगताप यांच्या हस्ते शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, आंबी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ खरड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला पालक व सोनारी पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रूपामाता नॅचरल शुगर पाडोळी (आ) चे रोलर पूजन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ ऑगस्ट-**

रूपामाता ग्रोटेक प्रा. लि. संचलित, रूपामाता नॅचरल शुगर युनिट क्र. १ पाडोळी (आ) या कारखान्याच्या सहाव्या गळीत हंगामाच्या सन २०२४-२५ साठीच्या रोलर पूजनाच्या कार्यक्रम रुपामाता उद्योग समूहाचे संस्थापक तथा भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य ॲड.व्यंकटराव गुंड व सधन शेतकरी रामदास गुंड यांच्या शुभहस्ते दि.११ ऑगस्ट रोजी संपन्न झाला.



धाराशिव-तुळजापूर मतदारसंघातील शेतकऱ्यांची व सुशिक्षित युवकांची गरज लक्षात घेऊन सदरील कारखाना ग्रामीण भागात उभारण्याचा संकल्प केल्याचे यावेळी ॲड. गुंड यांनी सांगितले. यंदाच्या हंगामात तीन लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट आहे, यासाठी वाहतूक यंत्रणा, ऊस तोडणी यंत्रणा सज्ज असून, यंत्र सामग्रीच्या दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत. येणारा गळीत हंगाम सर्वांच्या सहकार्याने यशस्वीपणे संपन्न होईल असा विश्वास ड.व्यंकटराव गुंड यांनी व्यक्त केला. कारखाना वेळेत चालू होण्यासाठी सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी सर्व विभागाची कामे वेळेत पूर्ण करावीत असे आवाहन यावेळी करण्यात आले. सदर कार्यक्रम प्रसंगी अधिकारी, कर्मचारी, ऊस उत्पादक शेतकरी, दूध उत्पादक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हॅन्डबॉल क्रीडा स्पर्धेत जयप्रकाश विद्यालय जिल्ह्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ ऑगस्ट-**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथील जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत हॅन्डबॉलमध्ये प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल खेळाडूंचा सत्कार डॉ.आंबेडकर बालविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे यांच्या हस्ते करण्यात आला.



क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने दि.१२ ऑगस्ट रोजी आयोजित जिल्हास्तरीय शालेय हॅन्डबॉल क्रीडा स्पर्धा श्री श्री रविकिरण विद्यालय, धाराशिव येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या १७ वर्ष वयोगट मुलींच्या संघाचा जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. तसेच १४ वर्षे व १९ वर्ष वयोगट संघाने अंतिम सामन्यांमध्ये द्वितीय क्रमांक आला आहे. या सर्व यशस्वी खेळाडूंना प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रा.प्रशांत कोळगे, अश्विनकुमार पवार यांनी मार्गदर्शन केले.

या सर्व यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन जि.प.सदस्य रामदास कोळगे, माजी ग्रा.पं.सदस्य राजनारायण कोळगे, रुईभरचे माजी सरपंच बालाजी कोळगे, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, जयप्रकाश विद्यालयाचे मुख्याध्यापक जयप्रकाश कोळगे, प्रशासकिय अधिकारी शिवकन्या साळुंके, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक डोंगरे.के.ए, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपास्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन कांबळे यांनी तर आभार के.ए डोंगरे यांनी मानले.

## अतुल कुलकर्णी यांची बदली; संजय जाधव नवे पोलिस अधिक्षक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ ऑगस्ट-**

राज्यात येत्या दोन तीन महिन्यांत विधानसभा निवडणूक जाहीर होणार आहे. या निवडणुकीपूर्वी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांची बदली राज्य सरकारने केली आहेत. पोलीस अधीक्षक यांच्या बदलीचा आदेश मंगळवारी काढण्यात आला. त्यांची जागी बारामती येथील अप्पर पोलिस अधिक्षक संजय वाय.जाधव यांची नेमणूक करण्यात आली आहे.

## पोलीस उपनिरीक्षक आनंद जाधव यांना विशेष सेवा पदक

**धाराशिव, दि.१३ ऑगस्ट-**



जिल्ह्याचे सुपूत्र आनंद बब्रुवान जाधव यांना नक्षलग्रस्त भागात केलेल्या सेवेबद्दल त्यांना विशेष सेवा पदक जाहिर करण्यात आले आहे. जाधव हे सध्या बीड जिल्ह्यातील शिरसाळा पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. गडचिरोली येथे तीन वर्षे पोलीस दलात कार्यरत असताना पोलीस उपनिरीक्षक आनंद बब्रुवान जाधव यांनी विविध उपक्रमासाठी परिश्रम घेतले होते.

## एकलव्य बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**शिराढोण, दि.१३ ऑगस्ट-**

स्वातंत्र्य दिननिमित्त एकलव्य बहुउद्देशिय सामाजिक संस्थेच्या यांच्या वतीने कळंब तालुक्यातील शिराढोण येथील जि. प. शाळेच्या मैदानावर भव्य खुल्या व्हॉलीबॉल क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिराढोण गावच्या प्रथम नागरिक सरपंच लक्ष्मी म्हेत्रे या उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणुन गावचे उपसरपंच अमोल माकोडे, माजी पं.स.सदस्य राजेश्वर पाटील, माजी सरपंच पद्माकर पाटील, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सरोजिनीताई राऊत, शिराढोण पोलीस स्टेशनचे कल्याण नेहरकर, माजी जि.प. सदस्य शहाजी पाटील, कळंब-धाराशिव मतदार संघाचे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे नवनिर्वाचित अध्यक्ष नितीन पाटील, शरदचंद्र महाविद्यालय चे प्राचार्य डॉ.साजेद चाऊस, काका डांगे, अमीन खतीब, ग्रा.पं. सदस्य नितीन पाटील, वि.का.सो.चे माजी




चेअरमन नासेर पठाण, ग्रा.पं.सदस्या ज्योती महाजन, जि.प. प्रशाला शाळेचे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोलसिंह चंदेल, शिक्षणतज्ञ वरुण पाटील, शा.व्य.समितीचे सदस्य राजपाल देशमुख, समितीचे सदस्य सतीश शिंपले, गोविंद वाघमारे, पालक राहुल माने, किरण सहाणे, अण्णासाहेब पालकर, सामाजिक कार्यकर्ते किरण पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष नामदेव माकोडे, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे अध्यक्ष विजय हांडे, लातूर जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश बुरशे, राष्ट्रीय व्हॉलीबॉल चॅम्पियन प्रकाश मुंदडा, व्हॉलीबॉल स्टेट चॅम्पियन शरद पाटील, व्हॉलीबॉल प्रशिक्षक अन्वरभाई सय्यद, व्हॉलीबॉल प्रशिक्षक रतन उबाळे, कळंब व्हॉलीबॉल प्रशिक्षक रमेश अण्णा सहालुगडे मुरुड, जिवन नाईकवाडे, प्रशालेतील क्रिडा निदेशक शिंदे, के. एन. विद्यालय चे क्रिडा प्रशिक्षक काझी सर, सामाजिक कार्यकर्ते सुरेश महाजन, हे उपस्थितीत होते.

या स्पर्धेसाठी गावचे माजी सरपंच पद्माकर पाटील यांच्या तर्फे प्रथम पारितोषिक २१०० रुपये, राजकमल चिकन शॉपचे मालक जिलानी यांच्यातर्फे द्वितीय पारितोषिक ११०० रुपये आणि सामाजिक कार्यकर्ते शामियोदिन काझी यांच्या तर्फे ७०० रुपये, विजेत्या संघाला गायत्री कॉम्प्युटर शिराढोणचे संचालक अमोलसिंह चंदेल यांच्यातर्फे प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देण्यात आले.

विजयी संघ १७ वर्षे कळंब (मुली), १७ वर्षे मुरुड(मुले) आणि १९ वर्षे शिराढोण( मुले) यांना देण्यात आले. संस्थेच्या वतीने शिराढोण गावातील विविध खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय खेळाडू प्रकाश मुंदडा, लक्ष्मी म्हेत्रे, रणजित गवळी, पांढरी जाधवर, पवन म्हेत्रे, रमेश खडबडे, आकाश पवार, अन्वर सयद, कुलदीप पाटील, अजय पाटील, बबलू शेख, विजय ठोंबरे, यांचा सन्मान करण्यात आला. डॉ.साजेद चाऊस यांनी उपस्थित खेळाडूंना खेळाचे महत्व पटवून मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष गोविंद म्हेत्रे, उपाध्यक्ष अमित गाडे, सदस्य स्वप्निल गाडे, नीलेश नाईकवाडे, अजय नाईकवाडे, अक्षय गाडे यांनी सर्व खेळाडूंना अल्पोपाहार व बक्षिसे देऊन आभार व्यक्त केले.

## सोयाबिन पिकावर मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव ; नियंत्रणासाठी तात्काळ उपाययोजनेचे कृषी विभागाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ ऑगस्ट-**

जिल्हयातील काही भागात सोयाबीन पिकावर पिवळा मोझॅक तसेच काही ठिकाणी हिरवा मोझॅक म्हणजेच केवडा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.याचा सोयाबीन पिकावरील प्रभाव वाढल्यास जवळपास १५ ते ७५ टक्क्यापर्यंत उत्पादनात घट येऊ शकते.त्यामुळे शेतकऱ्यांनी या रोगाच्या नियंत्रणासाठी कृषी विभागाशी संपर्कासह तात्काळ उपाययोजना करण्याचे आवाहन कृषी अधिक्षक जिल्हा कृषी अधिकारी रविंद्र माने यांनी केले आहे.

सोयाबीन पिकावर पिवळा मोझॅक काही ठिकाणी हिरवा मोझॅक म्हणजेच केवडा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. मोझॅकचा प्रसार हा पांढऱ्या माशी या रसशोषक किडीद्वारे केला जातो.हा रोग पानातील रसामार्फत पसरतो.जर सोयाबीन पिकांच्या झाडाची पाने ही जाडसर, आखूड तसेच कडक होतात.तसेच खालच्या बाजूने सुरकुतलेली किंवा मुरगळलेली दिसून येतात.पाने साधारण पानांपेक्षा जास्त गर्द हिरव्या रंगाची दिसतात.त्याबरोबरच प्रादुर्भावामुळे झाडाची वाढ खुंटल्याचे दिसून आल्यास हिरवा मोझॅक असल्याचे ओळखावे. सोबतच सोयाबीनच्या पानाच्या मुख्य शिरीपाशी विखुरलेल्या अवस्थेत पिवळ्या रंगाचे चट्टे अथवा अनियमित पट्टे दिसून येतात,त्यानंतर पाने जसे जसे परिपक्व होत जातात तसे तसे त्यावर गंजलेले तांबूस रंगाचे चट्टे दिसतात.जर जास्त प्रादुर्भाव असल्यास पाने अरुंद होतात व मुरगळलेली दिसल्यास पिवळा मोझॅक हा रोग असल्याचे समजून त्यानुसार उपाययोजना कराव्यात. अधिक माहितीसाठी गावातील कृषि सहाय्यक, मंडळ कृषि अधिकारी अथवा तालुका कृषि अधिकारी कार्यालयास संपर्क करावा.असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी रविंद्र माने यांनी केले आहे.

सोयाबीनवरील पांढरी माशी, मावा, आणि मोझॅक विषाणूचे एकात्मिक व्यवस्थापन मोझॅक (केवडा) झालेली प्रादुर्भावग्रस्त झाडे दिसून येताच ती वेळोवेळी तात्काळ समूळ काढून बांधावर न फेकता जाळून अथवा जमिनीत पुरून नष्ट करावीत. जेणेकरून निरोगी झाडांवर होणारा किडीचा व रोगांचा प्रसार कमी करणे शक्य होईल. तसेच पीक तणमुक्त ठेवावे, पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी पिकामध्ये १२ इंच x १० इंच आकाराचे हेक्टरी १० ते १५ पिवळे चिकट सापळे लावावेत. त्रयुक्त खताचा संतुलित वापर करावा तसेच ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. रोगाच्या प्रसारास कारणीभूत असलेल्या मावा व पांढऱ्या माशीच्या व्यवस्थापनासाठी पिकावर रोगाची लक्षणे दिसताच किंवा प्रतिबंधात्मक उपाय म्हणून असिटामिप्रीड २५ टक्के + बाइफेन्थ्रीन २५ टक्के डब्ल्यूजी १०० ग्रॅम ( ५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात साध्या पंपाने ) (लेबल क्लेम कीटकनाशक) किंवा थायमिथोक्झाम १२.६ टक्के + लॅम्बडा सिहॅलोथ्रीन ९.६ टक्के झेडसी ५० मिली (२.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात साध्या पंपाने) यापैकी एका किटकनाशकाची फवारणी प्रति एकर याप्रमाणात करावी. वरील कीटकनाशकाचे प्रमाण साध्या पंपासाठी आहे पेट्रोल पंपासाठी हे प्रमाण तीन पट वापरावे.

## शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीने संभाषण कौशल्य कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ ऑगस्ट-**




शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवच्या वतीने संभाषण कौशल्य कार्यशाळेचे आयोजन दि.१२ ऑगस्ट रोजी स्वयंवर मंगल कार्यालय येथे करण्यात आले होते.

या कार्यशाळेच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गौरव बागल अध्यक्ष शिवराज्याभिषेक सोहळा समिती हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सुनीलराव मिसाळ हे लाभले होते. या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्रातील आघाडीचे वक्ते शिवव्याख्याता साईनाथ रुद्रके यांची उपस्थिती होती.

प्रमुख मार्गदर्शक व वक्ते साईनाथ रुद्रके यांनी आपल्या अभ्यासपूर्ण मांडणीतून तसेच प्रभावी वक्तृत्वाच्या बळावर संभाषण कौशल्य मधील वेगवेगळ्या पैलूवर प्रकाश टाकला. सूत्रसंचालन कसे करावे? आभार प्रदर्शन कसे करावे? प्रभावी व्याख्यान कसे द्यावे? संवाद संभाषण कौशल्य कसे आत्मसात करावे? वीर रस शांत रस हास्य रस करून रस यासह विविध रसांचे रसाळ भाषेमध्ये वर्णन करण्यात आले होते.

व्याख्यान करताना हाताचे हावभाव तसेच चेहऱ्यावरील हावभाव यांचे सूक्ष्म पणे काम दाखवून दिले. सूत्रसंचालन करताना तसेच आभार प्रदर्शन करताना घ्यावयाची काळजी याबाबतीत देखील त्यांनी अतिशय समर्पक असे मार्गदर्शन केले. या विविध विषयावर सुमारे दोन तास अतिशय प्रबोधनपर असे मार्गदर्शन केले. शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांसाठी या संभाषण कौशल्य कार्यशाळेचा खूप मोठा फायदा झालेला आहे. समितीच्या सदस्यांनी या कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमास समितीचे सुनील मिसाळ, आकाश भोसले, अजय तनपुरे, योगेश आतकरे, संजय मुळे, प्रतापसिंह काकडे, विश्वंभर आगळे यांच्यासह समितीचे बहुसंख्य आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


(छाया: नरेंद्र गडप्पा)

## बांगलादेश मधील हिंदूवरील आत्याचाराच्या निषेधार्थ
# १७ ऑगस्ट रोजी नांदेड बंद

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१३ ऑगस्ट -**
बांगलादेशमध्ये हिंदूवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ दि.१७ ऑगस्ट रोजी सकल हिंदू समाजाच्या वतीने नांदेड जिल्हा बंदचे आयोजन करण्यात आले आहे. या बंदमध्ये सर्व व्यापारी, शैक्षणिक संस्था आदींनी सहभाग घेवून बंद यशस्वी करावा, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे प्रांत कार्यकारिणी सदस्य कृष्णा देशमुख यांनी पत्रकार परिषदेत केले.

या पत्रकार परिषदेस विश्व हिंदू परिषदेचे जिल्हाध्यक्ष डॉ.रवीकुमार चटलावार, व्यापारी असोसिएशनचे हर्षद शहा, गणेश महाजन, राजेंद्र हुरणे, प्रेम फेरवानी, निखिल लातूरकर, प्राचार्य सु.ग.चव्हाण, दिपक बोधने, राजकुमार बोडसे, सुदेश पईतवार, शशिकांत पाटील आदींची उपस्थिती होती.

बांगला देशमध्ये मागील आठ दिवसांपासून हिंदूंवर अत्याचार सुरु आहेत. अनेक हिंदू मंदिरे उदध्वस्त करण्यात आली आहेत. महिलांवर बलात्काराच्या घटना देखील घडत आहेत. अत्याचाराची आतापर्यंतची हि चौथी वेळ असून, या अत्याचाराच्या विरोधात मुस्लिम संघटना गप्प का? असा प्रश्न कृष्णा देशमुख यांनी उपस्थित केला. दि.१७ ऑगस्ट रोजी पुकारण्यात आलेल्या बंदच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे आगारप्रमुख, जिल्हाधिकारी तसेच शिक्षणाधिकाऱ्यांची भेट घेण्यात येणार आहे. या बंदमध्ये रामजन्मोत्सव समिती, मारवाडी युवा मंच, सराफा असोसिएशन, बागेश्वर धाम आदीसह अनेक संघटना सहभागी असून, सर्वांनी हा बंद यशस्वी करावा, असे आवाहन सकल हिंदू समाजाच्या वतीने कृष्णा देशमुख यांनी केले.

# शेतकऱ्यांना पीक विम्यापोटी सरसकट अर्थसाह्य करा : माजी खा. चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१३ ऑगस्ट -**
सन २०२३ मध्ये खरीप हंगामासाठी ई पीक पोर्टलवर ज्यांनी सोयाबीन आणि कापूस लागवडीची नोंदी केली अशा शेतकऱ्यांना अर्थसहाय देण्याची केलेली घोषणा मागे घेऊन तातडीने सरसकट अर्थसाह्य करावे अशी मागणी माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे केली आहे.



गतवर्षी म्हणजे सन २०२३ मध्ये खरीप हंगामाच्या काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले होते. सोयाबीन आणि कापूस या नगदी पिकाला मोठा फटका बसल्याने शेतकरी हवालदिल झाला होता. अशा परिस्थितीत पूरग्रस्त भागाचे पंचनामे करून तातडीने पिक विमा मंजूर करण्यासाठी ही शेतकऱ्यांकडून विनंती करण्यात आली होती. या अनुषंगाने शासन दरबारी पाठपुरावाही करण्यात आला मात्र पीक विम्याचा प्रश्न भिजत पडला आहे. अशा परिस्थितीत सन २०२३ च्या खरीप हंगामासाठी ई पीक ॲपद्वारे कापूस आणि सोयाबीन लागवडीची नोंद केलेल्या नोंदणीकृत शेतकऱ्यांनाच अर्थसहाय्य देण्याची घोषणा करण्यात आली आहे. यानुसार ०.२० हेक्टर खालील शेतकऱ्याला १००० रुपये तर ०.२० हेक्टरच्या वरील दोन हेक्टर मर्यादा ठेवून पाच हजार रुपये अर्थसाह्य करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्या अनुषंगाने कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना आवाहन करण्यात आले आहे. मात्र हा निर्णय शेतकऱ्यांचे हितासाठी मारक आहे. ज्या शेतकऱ्यांनी काही त्रुटीच्या कारणास्तव किंवा तांत्रिक अडचणीमुळे ई पीक विम्याच्या पोर्टलवर नोंदणी केल्या नाहीत अशा शेतकऱ्यांनाही अर्थसहाय्य देण्यात यावे. सध्याचा काळ हा शेतकऱ्यांसाठी अत्यंत जोखमीचा आणि आर्थिक दृष्ट्या अडचणीचा काळ आहे. ही बाब लक्षात घेता राज्य शासनाने तातडीने हा निर्णय बदलत २०२३ मधील कापूस आणि सोयाबीन उत्पादकांना सरसकट अर्थसहाय्य करावे अशी मागणी ही माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी केली आहे. मागणीचे निवेदन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे पाठवले आहे.

## संक्षिप्त वृत्त



### हू.ज.पा. मध्ये अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

**हिमायतनगर**-हिमायतनगर येथील हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागामार्फत महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. उज्वला सदावर्ते मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून दै. तरुण भारत चे प्रतिनिधी मनोज पाटील हे होते. ते बोलताना म्हणाले की अहिल्याबाई होळकर ३१ मे १७२५ ते १३ ऑगस्ट १७९५ या भारतातील मराठा माळवा राज्याच्या एच ओलकर राणी होत्या. तिला भारतातील सर्वात दूरदर्शी महिला शासन एक मानले जाते. ती तिच्या शहाणपणासाठी धैर्यासाठी आणि प्रशासकीय कौशल्यासाठी प्रसिद्ध होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून प्राध्यापक डॉ. डि. के . कदम होते. अध्यक्षीय समारोपात ते म्हणाले की अहिल्याबाई होळकर हिंदू मंदिराच्या महान प्रवर्तक आणि निर्मात्या होत्या. तिने भारतभर शेकडो मंदिरे आणि धर्मशाळा बांधल्या. अहिल्याबाईंचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील सध्याच्या अहमदनगर जिल्ह्यातील चोंडी गावात झाला. त्यांचे वडील माणकोजीराव शिंदे हे गावचे पाटील होते. त्यांचा मृत्यू १३ ऑगस्ट १७९५ रोजी वयाच्या ७० व्या वर्षी अहिल्याबाईंचे निधन झाले. अहिल्याबाईंच्या पश्चात त्यांचे सेनापती आणि पुतणे तुकोजीराव होळकर आले. त्यांनी लवकरच १७९७ मध्ये त्यांचा मुलगा काशीराव होळकर यांच्या बाजूने सिंहासनाचा त्याग केला. अशी माहिती बोलताना सांगितले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉ. डीसी देशमुख सर यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्राध्यापक डॉ . एस. एन. भदरगे सर यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### ‘स्वातंत्र्य सूर्याची किरणे’ या ग्रंथाचे प्रकाशन

**नांदेड** -भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व दिवशी डॉ. अनंत दा. राऊत लिखित ‘स्वातंत्र्य सूर्याची किरणे’ या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ बुधवार, दि. १४ ऑगस्ट रोजी सकाळी १०-३० वाजता कै.नरहर कुरुंदकर सभागृह, पीपल्स कॉलेज नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.व्यंकटेश काब्दे यांच्या हस्ते होत आहे. सुप्रसिद्ध नाटककार प्रा. दत्ता भगत हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

# मुख्यकार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी घेतले तिर्थक्षेत्र काळेश्वरचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,१३ ऑगस्ट -**
नांदेड शहरालगत पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांचे श्रध्दास्थान असलेल्या तिर्थक्षेत्र काळेश्वर विष्णूपुरी येथे दुसऱ्या श्रावण सोमवार निमित्ताने भाविक भक्तांनी मोठया संख्येने उपस्थित राहून दर्शन घेतले. यावेळी नांदेड जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी मिनल करणवाल यांच्यासह अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार आदींनी दर्शन घेतले.



श्रावण महिन्यातील दुसरा सोमवारी दि. १२ ऑगस्ट रोजी भाविक भक्तांनी मोठया प्रमाणात गर्दी केली होती. यावेळी पुजारी गणेशअप्पा महाराज धनमणे यांच्या उपस्थितीत विधीवत पुजन व आरती नंतर देव दर्शनासाठी भाविक भक्तांना सोडण्यात आले. सकाळी नांदेड जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी मिनल करणवाल यांनी तिर्थक्षेत्र काळेश्वर मंदिरात विधीवत पुजन करून दर्शन घेतले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, गटविकास अधिकारी पांडुरंग नारवटकर, विस्तार अधिकारी गोविंद मांजरमकर, पांडुरंग नारवटकर, विठ्ठल कांबळे, यांच्यासह माजी शिक्षण विस्तार अधिकारी बंडु अमदुरकर उपस्थित होते. यावेळी ग्रामपंचायत विष्णुपूरी व विश्वस्त समिती यांच्या तर्फे सरपंच प्रतिनिधी राजु हंबर्डे, विश्वस्त समितीचे सचिव शंकरराव हंबर्डे, बालाजी हंबर्डे, सतिश भेंडेकर, ग्रामसेवक संजय कानोडे, शिक्षक उदय हंबर्डे, निशांत पळणाटे, भास्कर हंबर्डे यांनी सत्कार केला. भाविक भक्तांसाठी सुमित मोरगे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी देवस्थान परिसरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधिकारी, पोलीस अमलंदार, महिला पोलीस कर्मचारी व होमगार्ड यांच्या कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.

# अंगणवाडीत बालकांच्या खाऊमध्ये किडे

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,१३ ऑगस्ट -**
तालुक्यातील मौजे डोंगरगाव येथील अंगणवाडी सेविका खाऊ मध्ये भोंगे किडे पाहूनही खाऊ बनवून बालकांना देत असल्याची तक्रार दि. ९ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडी जिल्हा अध्यक्ष पूजाताई माधव पाटील व्यवहारे यांनी बाल विकास प्रकल्प अधिकारी पंचायत समिती मुदखेड यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे.

डोंगरगाव येथील लहान बालकांचे आरोग्य धोक्यात असून अंगणवाडत खाऊ मध्ये भोंगे, किडे असल्याचा प्रकार दि.९ ऑगस्ट रोजी उघडकीस आला असून अनेक दिवसापासून खाऊ व्यवस्थित शिजवा किंवा खाऊ बघून शिजवा अशी सूचना मागील काही दिवसांपूर्वी स्थानिक डोंगरगाव येथील महिलांनी अंगणवाडीतील सेविकेला दिली होते. परंतु अंगणवाडीतील सेविकांना वारंवार सांगून देखील ऐकत नसल्याचे या निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहे. अंगणवाडी सेविकेला वारंवार सूचना देऊन देखील अंगणवाडीतील सेविका ऐकत नाही त्यामुळे गावातील अंगणवाडीत जाणाऱ्या बालकांच्या आरोग्याच्या



जीवितास धोका निर्माण झाल्यास काय करावे असा प्रश्न देखील स्थानिक नागरिकांच्या मनात पडला असून या घटनेची चौकशी करून तात्काळ संबंधितावर कारवाई करण्यात यावी असे निवेदन बाल विकास प्रकल्प अधिकारी पंचायत समिती मुदखेड यांच्याकडे देण्यात आले आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडी जिल्हा अध्यक्ष पूजाताई माधव पाटील व्यवहारे, शहराध्यक्ष महंमद बुराण, शेख इरफान, मोहम्मद साजिद, गजानन बोडके, माधव पाटील व्यवहारे, ज्ञानेश्वर गायकवाड, शेख हाकिम, शेख खाजा भाई, दिलीप सरोदे, शेख मुखीद शेख जानेमिया यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# किनी येथील शेतकऱ्यांची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,१३ ऑगस्ट -**
साततच्या नापिकीमूळे कर्जबाजारी झालेल्या तरुण शेतकऱ्यांनी कंटाळून घरात दोरीने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना दि.७ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता घडली आहे.



किनी व परिसरात आत्महत्या करण्याचे सत्र चालु आहे की काय असे दिसते.मागील आठ दिवसापूर्वी किनी येथील नरेशरेड्डी कुंटालवाड नामक तरुण शेतकऱ्यांनी कर्ज बाजारीस कंटाळून आत्महत्या केली होती. तर लगेच दोन दिवसाला म्हणजे दि.७ ऑगस्ट रोजी किनी येथील लक्ष्मण धर्मन्ना कडकुंटवाड पद्मशाली वय ३८ या तरुण शेतकऱ्यांनी सततच्या नापीकीमूळे आणि बँकेतील कर्ज न फेडता येत असल्याने अखेर त्याने दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घरातील सर्व शेतात गेल्याचे पाहून त्याने घरातील तुळईला दोरीचा फास घालुन आत्महत्या केली आहे. घरातील कर्ता पुरुष गेल्याने कडकुंटवाड परिवारावर संकट कोसळले कै. लक्ष्मण कडकुंटवाड याच्या पश्चात आई दोन मूले एक मुलगी, पत्नी असा परिवार आहे.

## होमगार्ड नोंदणीच्या दिनांकात बदल

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१३ ऑगस्ट -**
नांदेड जिल्हा होमगार्डमधील रिक्त असलेला होमगार्ड अनुषेष भरण्यासाठी होमगार्ड नोंदणीचे आयोजन १६ ऑगस्टपासून पोलीस मुख्यालय, नांदेड येथे केले होते. प्रशासकीय कारणास्तव या दिनांकामध्ये बदल करण्यात आलेला आहे.

कागदपत्रे पडताळणी व शारीरीक क्षमता चाचणीसाठी अर्ज क्रमांकानुसार उमेदवारांना पोलीस मुख्यालय येथे बोलाविण्याचे सुधारित वेळापत्रकाबाबत सविस्तर माहिती https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1php या संकेतस्थळावर देण्यात येणार असल्याची माहिती प्रभारी जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक डॉ. के.ए.धरण यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविली आहे.

## प्रकृती अस्वस्थतेमुळे खा. वसंतराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सर्व कार्यक्रम रद्द

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१३ ऑगस्ट -**
मतदारसंघातील कार्यक्रम, विविध भेटीगाठी या सततच्या धावपळीमुळे नांदेड लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार वसंतराव चव्हाण ह्यांना व्हायरल इन्फेक्शन झाल्यामुळे त्यांची प्रकृती अस्वस्थ आहे. दरम्यान नांदेड येथून पुढील उपचारासाठी हैदराबाद येथे जात असल्याने खा. वसंतराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सर्व कार्यक्रम रद्द करण्यात येत असल्याची माहिती चव्हाण कुटुंबीय, नायगाव तालुका काँग्रेस तसेच नांदेड शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने देण्यात आली आहे.



नांदेड लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खा. वसंतराव चव्हाण हे सतत कार्यमग्न असल्याने यादरम्यान त्यांना व्हायरल इन्फेक्शन झाल्यामुळे त्यांची प्रकृती ठिक नसल्याने पुढील उपचारासाठी ते हैदराबाद येथे जात आहेत. दरम्यान त्यांच्या वाढदिवसानिमित्त १५ ऑगस्ट रोजी नायगाव येथे आयोजित करण्यात आलेला महाकीर्तन सोहळा व महाप्रसादाच्या कार्यक्रमसह अभिष्टचिंतन सोहळा रद्द करण्यात आला आहे.

# नायगाव तहसीलसमोर गरजवंत शेतकऱ्यांसाठी बेमुदत उपोषणाचा लढा

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,१३ ऑगस्ट -**
गरजवंत शेतकऱ्यांच्या मागण्यासाठी मागण्या मान्य होईपर्यंत बेमुदत उपोषणकर्ते ,देवोदास पीराजी वडजे,काशिबा आमनाजी वाकरडे रा. टेंभुर्णी यांनी स्वांतत्र्य दिनाच्या तोंडावर तहसील कार्यालय नायगाव समोर बेमुदत उपोषण चालू केले आहे .



राज्यामध्ये शेतकऱ्यांची आर्थिक, सामाजिक अवस्था बिकट झालेली आहे. निसर्गाचा कोप, प्रशासनाची आरेरावी व वेळकाढूपणा राजकीय नेत्यांनी जाणूनबुजून शेतकऱ्यांना आर्थिक भिकारीपणा आणण्याचे व त्यांना त्यांचा मानसिक छळ करून दयनीय आवस्था केली आहे. आपल्या राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या जास्तित जास्त वाढत आहेत. पिक कर्जासाठी बँका जवळ येवू देत नाहीत. अश्या दुहेरी आडचणीत शेतकरी असताना राजकीय मंडळी विधान सभेचे आराखडे रंगविण्यात व्यस्त आहेत.असा आरोप उपोषण कर्त्यानी केला आहे.

उपोषण कर्त्यानी खालील मागण्या केल्या आहेत .तीन लाख रुपयापर्यंतचे सरसकट कर्ज माफ करण्यात यावे, (सिबील ची अट रद्य करण्यात यावी), शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चावर आधारीत शेतीमालास हमीभावचा कायदा करण्यात यावा, शेतकऱ्यांच्या माल विनाअट खरेदी करावा. यात दलाल हटाव, किसान बचाव कट्टी काटा, माती माउश्चर व बट्टा या अटी रद्द करण्यात याव्यात.अशा मागण्या केल्या आहेत. या उपोषणस्थळी माधवराव चिंतले, चंद्रकांत पवार,डोईवाड उपस्थित होते.

# पशुधन पंधरवडा अंतर्गत पाळज येथे पशुरोग निदान शिबिर



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१३ ऑगस्ट -**
पशुधन पंधरवाडा अंतर्गत पाळज येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. भूपेंद्र बोधनकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १२ ऑगस्ट रोजी पशुरोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले.

नांदेड जिल्ह्यातील पशुधनाच्या उत्पादक क्षमतेचा पुरेपूर वापर करून पशुपालनापासून मिळणाऱ्या उत्पादनाद्वारे राष्ट्रीय सकल उत्पादनात भर टाकण्याच्या उद्देशाने पशुपालकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी नांदेड जिल्ह्यात १ ते १५ ऑगस्टदरम्यान पशुसंवर्धन पंधरवडाचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने भोकर तालुक्यातील पाळज येथे दि.१२ ऑगस्ट रोजी पशुरोग निदान शिबीर आयोजित करण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ. विजय चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. सुनील जाधव, डॉ. सुरेश पाईकराव, सरपंच सुभाष चटलावार यांची उपस्थिती होती. या शिबिरात वंध्यत्व निवारण, गर्भ तपासणी, शेळ्या- मेंढ्यांचे जंत निर्मूलन, लहान - मोठ्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या तसेच पशूंचे लसीकरण करण्यात आले. या शिबिराचा परिसरातील शेतकरी, पशु पालकांनी लाभ घेतला. शिबीर यशस्वी करण्यासाठी डॉ. गणेश कल्याणकर, डॉ. लक्ष्मण पुजरवाड, डॉ. लक्ष्मण सनकाडे, पशुधन पर्यवेक्षक सुमेध बनसोडे, प्रणिता कांबळे, संजय धनवे, विष्णू पांचाळ, सुरेश आरकलवाड आदींनी परिश्रम घेतले.

# लाडकी बहीण येजनेत किनवट- माहूर तालुक्यातील ५४ हजार महिला पात्र

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,१३ ऑगस्ट -**
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी किनवट मतदारसंघ क्षेत्रनिहाय समितीच्या बैठकीत शासनाच्या पोर्टलवर १२ ऑगस्ट २०२४ रोजीपर्यंत सादर झालेल्या किनवट माहूर तालुक्यातील ५४ हजार ५९० पात्र अर्जाना अंतिम मान्यता दिल्याची माहिती समितीचे अध्यक्ष आ भीमराव केराम यांनी दिली आहे.रक्षाबंधनदिनी पात्र लाभार्थ्यांना दोन हप्त्याचे ३ हजार रु थेटलाभ हस्तान्तरद्वारे प्राप्त होणार असल्याने लाडक्या बहिनीच्या चेहऱ्यावर हास्य फुलले आहे.

राज्यातील शिंदे व फडणवीस सरकारने महिलांच्या सबलीकरणासाठी राज्यात मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण ही महत्वकांक्षी योजना सुरू केली असून या योजनेला किनवट माहूर सारख्या ग्रामीण भागातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आ. भीमराव केराम यांच्या अध्यक्षतेखाली विधानसभाक्षेत्र समितीची बैठक नुकतीच संपन्न झाली असून या बैठकीत १२ ऑगस्ट २०२४ रोजी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पोर्टलवर किनवट तालुक्यातून ३८ हजार ५७३ तर माहूर तालुक्यातून १७३४३ असे एकूण ५५ हजार ९१६ अर्ज सादर झाले आहेत. दाखल अर्जाची छाननी केल्यानंतर किनवट तालुक्यातील ३७ हजार ६५८ तर माहूर तालुक्यातील १६ हजार ९०५ असे एकूण ५४ हजार ५६३ पात्र अर्जाचा समितीने स्वीकार केले असून ते जिल्हाधिकारी नांदेड यांच्या डॅशबोर्डवर पाठविण्यात आले आहेत.दोन्ही तालुक्यातील एकूण ११९२ अर्जात त्रुटी असल्यामुळे ते तात्पुरत्या स्वरूपात अस्वीकार करण्यात आले असून संबंधित लाभार्थ्यांच्या आयडीवर त्रुटीपूर्ततेसाठी पाठविण्यात आली आहेत. शासन



निर्णयानुसार अपात्रतेच्या कारणाची खात्री करूनच ५९ अर्ज कायमस्वरूपी अस्वीकार केले असून ५४ हजार ५९० पात्र अर्जाना समितीने अंतिम मान्यता दिली आहे.या बैठकीस तहसीलदार शारदा चोंडेकर, माहूरचे तहसीलदार किशोर यादव, किनवटचे गटविकास अधिकारी पुरुषोत्तम वैष्णव, माहूरचे गटविकास अधिकारी सुरेश कांबळे, बालविकास प्रकल्प अधिकारी अस्विनी ठकरोड, अशासकीय सदस्य करपुडे पाटील, सुदर्शन नाईक, दत्ता आडे, आ केराम यांचे जनसंपर्क अधिकारी संतोष मरस्कोल्हे, विस्तार अधिकारी श्री वाघमारे हे उपस्थित होते.

CMYK

लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल



# श्रावणनिमित्त शिवनाम सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. १३ ऑगस्ट-**

श्रावण मासानिमित्त राष्ट्रसंत डॉ शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या संजीवन समाधीसमोर अखंड शिवनाम सप्ताह व राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांचे चतुर्थ अनुष्ठान आयोजित करण्यात आले आहे.

दि. ५ ते २६ ऑगस्ट दरम्यान अखंड शिवनाम सप्ताह आयोजित करण्यात आला असून त्यातील प्रथम सत्र संपन्न झाली आहे. द्वितीय सत्रात पहाटे पाच ते सहा शिव पाठ सात ते नऊ संजीवन समाधी रुद्राभिषेक ९ ते ११ परम रहस्य पारायण व आरती दुपारी दोन वाजता गाथा भजन सायंकाळी सहा वाजता शिवपाठ रात्री आठ ते दहा शिव कीर्तन व ११ ते पहाटे पाच पर्यंत शिवजागर असा दिनक्रम असून याच कालावधीतील १६ ऑगस्टपासून २१ ऑगस्टपर्यंत राष्ट्रसंतांचे उत्तर अधिकारी राजू शेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांचे पाच श्रावणमास तपोनुठण असून दिनांक २१ ऑगस्ट रोजी मौन मुक्ती व महाप्रसाद होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन भक्ती स्थळाचे प्रमुख आचार्य गुरुराज स्वामी महाराज, अध्यक्ष भगवंतराव पाटील, चाभार्गेकर मनमत, आप्पा पालापुरे, सुप्रिया गोटे, बाबुराव देशमुख, सिद्धेश्वर पाटील, धन्यकुमार शिवणकर, शिवप्रसाद कोरे, शीला शेटकर, शिवलिंग पाटील, किनीकर मोहन कावडे गुरुजी, नागनाथ कलशेट्टी, पानगावकर, मारुती भालके, जळकोटकर दिलीप स्वामी शंभू उंबरगा रतिकांत स्वामी तोंडारकर पद्मिनी खराडे आदींनी केले.

## संक्षिप्त वृत्त



### मुलांना आवडीप्रमाणे करिअर निवडू द्या : आ. विक्रम काळे

**लातूर, दि. १३ ऑगस्ट-**

सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. विद्यार्थी, पालकांमध्ये मार्क्स घेण्याची स्पर्धा सुरू आहे. करिअरच्या संधी अनेक आहेत म्हणून आपल्या पाल्यांनी डॉक्टर, इंजिनियर्स व्हावे असा हट्ट न करता पालकांनी मुलांची आवड ओळखून आवडीप्रमाणे त्यांना करिअर निवडू द्यावे, असे प्रतिपादन शिक्षक आ.विक्रम काळे यांनी गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात त्यांनी केले. मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेद्वारा गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व शिष्यवृत्ती वितरण समरंभाचे आयोजन दयानंद सभाग्रहात करण्यात आले होते. याप्रसंगी आ. विक्रम काळे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी होते. व्यासपीठावर संस्थेचे सचिव ॲड. आशिष बाजपाई, उपाध्यक्ष राजेंद्र मालपाणी, शरदकुमार नावंदर, ईश्वरप्रसाद डागा, लक्ष्मीकांत करवा, बालकिशन बांगड, शामसुंदर खटोड, डॉ. अनिल राठी, आनंद लाहोटी, कुमुदिनी भार्गव, किशोर भराडिया, संजय बियाणी, चैतन्य भार्गव व सर्व शाळांचे मुख्याध्यापक यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक संस्थेचे सचिव ॲड. आशिष बाजपाई यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक, पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### सांगवीतांडा येथील आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**अहमदपूर, दि. १३ ऑगस्ट-**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून तालुक्यातील सांगवीतांडा येथील प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेत १२ ऑगस्ट रोजी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंत भटके मागास जनसेवा मंडळाचे अध्यक्ष डॉ. पांडुरंग टोंपे तर व्यासपीठावर जि.प.च्या माजी सदस्या प्राचार्या रेखा तरडे-हाके, यशवंत भटके मागास जनसेवा मंडळाच्या सचिव माजी प्राचार्या शोभा टोंपे गुंठे, युवक नेते कुलदीप हाके, सहाय्यक पोलिस निरीक्षक एस.के.पठाण, विनोद गुंठे, मुख्याध्यापिका महानंदा गोरगे, स्वाती कदम आदींची प्रमुख उपस्थिती होती. कुलदीप हाके, सहाय्यक पोलिस निरीक्षक के. एस.पठाण, प्राचार्या रेखा तरडे, माजी प्राचार्या शोभा टोंपे आदींनी मनोगत व्यक्त केली तर अध्यक्षीय समारोप डॉ. पांडूरंग टोंपे यांनी केला.. प्रास्ताविक विलास पडिले यांनी तर सूत्रसंचालन नरसिंग सांगवीकर व आभार रामचंद्र बाबळसरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नागनाथ जवणे, विद्युलत्ता घोगरे, वंदना कदम, पंकज आडे, मनोज नरवटे, अजय मिटकरे, गणेश जाधव, विजयकुमार कोतवाड, ज्ञानोबा व्हटमुर्गे, बबीता यादव, अक्षय फुले, सचिन येचाळे, लक्ष्मी राजगे, केशव राठोड आदींनी परिश्रम घेतले.

### भाजपा निलंगा विधानसभेचे आज अधिवेशन

**निलंगा, दि. १३ ऑगस्ट-**

**आ.राम शिंदे यांची प्रमुख उपस्थिती**





निलंगा विधानसभा मतदारसंघातील भाजपा पदाधिकारी,कार्यकारिणी सदस्य आणि कार्यकर्त्यांचे अधिवेशन बुधवार दि.१४ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आले आहे.माजी मंत्री आ.राम शिंदे यांचे या अधिवेशनात मार्गदर्शन होणार असल्याची माहिती आ.संभाजीराव पाटील-निलंगेकर यांनी दिली. भाजपाने विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे.त्या अनुषंगाने विधानसभा मतदारसंघ निहाय अधिवेशन व मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. निलंगा विधानसभा मतदारसंघातील निलंगा, शिरूर अनंतपाळ व देवणी या तीन तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते या मेळाव्यास उपस्थित राहणार आहेत.माजीमंत्री आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या अध्यक्षतेत हे अधिवेशन होणार आहे.निलंगा येथील बँक कॉलनीत वृंदावन मंगल कार्यालयात दुपारी १२.३० वाजता हे अधिवेशन संपन्न होणार आहे. भाजपा महायुती सरकारने राबवलेल्या जनहिताच्या योजनांचा लाभ तळागाळातील सामान्य नागरिकांना मिळत आहे.आता शासनाने राज्यातील महिलांसाठी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे.त्यामुळे राज्यात महिला वर्गात समाधानकारक वातावरण निर्माण झाले आहे.निलंगा विधानसभा मतदारसंघात या योजनेतून सर्वाधिक नोंदणी झालेली आहे. माजी मंत्री आ. राम शिंदे व आ. संभाजी पाटील निलंगेकर या अधिवेशनात पुढील रणनीतीबाबत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन पक्षाच्यावतीने करण्यात आले आहे.असे आवाहन निलंगा तालुकाध्यक्ष कुमुद लोभे, शिरुर अनंतपाळ तालुकाध्यक्ष मंगेश पाटील व देवणी तालुकाध्यक्ष काशिनाथ गरीबे यांनी केले आहे.

# मुरुड येथे १ कोटी २० लाखांचा गुटखा, तंबाखू वाहनासह जप्त

**दोन गुन्हे दाखल; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई**



**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १३ ऑगस्ट-**

१२ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकास पोलीस ठाणे मुरुड हद्दीमध्ये काहीही व्यक्ती प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ, तंबाखूजन्य गुटखाची अवैध विक्री करण्यासाठी साठवून ठेवला आहे. अशी माहिती मिळाल्याने याची खात्री करून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस अधिकारी व अमलदारांच्या पथकाने १२ ऑगस्ट रोजी मुरुड येथील गुट्टे नगर परिसरामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी, घरामध्ये, दोन ठिकाणी छापा मारला तेथे वेगवेगळ्या कंपनीचे, विक्रीसाठी प्रतिबंधित असलेले गुटका, सुगंधित पानमसाला असा ६६ लाख ४० हजार १०१ रुपयाचा तर दुसऱ्या ठिकाणी ५३ लाख ३२ हजार २४० असा एकूण ०१ कोटी १९ लाख ७२ हजार ३४१ रुपयांचा प्रतिबंधित गुटका, सुगंधित पान मसाला तंबाखूचा मुद्देमाल तसेच वाहतूक करण्यासाठी वापरण्यात येणारा छोटा हत्ती वाहनसह जप्त करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे पथकाकडुन जिल्ह्यातील अवैध धंद्यावर कारवाई करण्याची मोहीम राबवित आहेत.

मुरुड पोलिसात प्रतिबंधित गुटका व सुगंधित तंबाखूची अवैधरित्या साठवणूक केले यात अनिल वसंत कापसे, गुट्टे नगर, मुरुड, विशाल गुट्टे, मुरुड, संदिपान बाबुराव विटेकर, मुरुड. बाळासाहेब ब्रिजलाल लोहिया, मुरुड. भैरू नरसू गुट्टे, गुट्टे नगर मुरुड. यांच्यावर दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे मुरुड पोलीस करीत आहेत.ही कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, यांचे नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड, पोलीस अमलदार विनोद चिलमे, रामहरी भोसले, माधव बिल्लापट्टे, नवनाथ हासबे,मोहन सुरवसे, रियाज सौदागर, तुराब पठाण, राजाभाऊ मस्के, जमीर शेख प्रदीप चोपणे यांनी पार पाडली.

# वगळलेल्या ९ गावातील शेतकऱ्यांची नावे अनुदान यादीत समाविष्ठ करा

**आ. अभिमन्यू पवार यांची कृषी आयुक्ताकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. १३ ऑगस्ट -**



गेल्या खरीप हंगामामध्ये ई - पीक पाहणी अपव्दारे सोयाबीन लागवडीची नोंद शेतकऱ्यांनी केलेली असतानाही अनेक गावातील शेतकऱ्यांची नावे मंजूर यादीतून आयुक्त कृषी कार्यालय यांनी दिलेल्या डाटा मध्ये दिसून येत नाहीत. त्यामुळे शासन निर्णयानुसार मदतीस पात्र असतानाही काही तांत्रिक चुकीमुळे या मदतीपासून शेतकरी वंचित राहात आहेत . याबाबत त्वरित कार्यवाही करून २०२३ च्या खरिप हंगामातील सोयाबीन उत्पादक औसा मतदारसंघातील वगळलेल्या ९ गावातील शेतकऱ्यांची नावे समाविष्ठ करुन तात्काळ अनुदान देण्यात यावे .अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी कृषी आयुक्ताकडे केली आहे.

२०२३ च्या खरीप हंगामातील सोयाबीन उत्पादक शेतर्क्यांना किंमतीत झालेल्या घसरणीमुळे प्रति शेतकरी प्रति हेक्टर रु.५०००/- प्रमाणे २ हेक्टर मर्यादेपर्यंत आर्थिक मदत मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयातील मदतीसाठी पात्रतेच्या निकषामध्ये सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये ई-पीक पहाणी अप द्वारे सोयाबीन लागवडीची नोंद केलेले शेतकरी अर्थसहाय्यासाठी पात्र असतील. असे नमूद केले आहे.या खरीप हंगामामध्ये ई-पीक पाहणी अप द्वारे सोयाबीन लागवडीची नोंद शेतकर्यांनी केलेली असतानाही औसा तालुक्यातील एकंबी, एकंबीवाडी, एकंवीतांडा, वांगजी, याकतपूर, देवताळा, येळवट, वरवडा, वानवडा अशी ९ गावे मंजूर यादीतून आयुक्त कृषी कार्यालय यांनी दिलेल्या डाटा मध्ये दिसून येत नाहीत. त्यामुळे या गावातील शेतकरी शासन निर्णयानुसार मदतीस पात्र असतानाही कांही तांत्रिक चुकीमुळे या मदतीपासून वंचित राहत आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी करून औसा तालुक्यातील सन २०२३ च्या खरीप हंगामातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी पात्र असतानाही वगळलेल्या ९ गावांचा समाविष्ठ करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत मंजूर करण्याबाबत त्वरित कार्यवाही करावी, अशी मागणी आ. पवार यांनी केली आहे.

# शिवस्वराज्य यात्रा बुधवारी उदगीरमध्ये

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. १३ ऑगस्ट-**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची 'शिवस्वराज्य यात्रा' बुधवार दि. १४ ऑगस्ट रोजी दुपारी ३:०० वाजता उदगीर शहरात दाखल होत आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार डॉ. अमोल कोल्हे, कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे, डॉ.जितेंद्र आव्हाड, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, राजेश टोपे, मेहबूब शेख यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून उदगीर शहरातील शिवाजी चौक परिसरात जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रदेश सरचिटणीस बसवराज पाटील नागराळकर यांनी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले आहे.

किल्ले शिवनेरी (जुन्नर) येथून शिवछत्रपतींचा आशीर्वाद घेऊन राज्यात मार्गस्थ झालेली राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व डॉक्टर अमोल कोल्हे यांचे नेतृत्व शिवस्वराज्य यात्रा महाराष्ट्राचा दौरा करत राज्यातील सरकारचे महायुतीचे काळे कारनामे जनतेसमोर मांडत आगामी विधानसभा निवडणुकीत राज्यातील महायुतीचे सरकार बदलण्याचे आव्हान केलं जात आहे.

उदगीर शहरात जनस्वराज यात्रा दाखल झाल्यानंतर लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चौक, डॉ. झाकीर हुसेन चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गे भव्य मोटार सायकल रॅलीच्या साक्षीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराजांना नतमस्तक होऊन जाहीर सभेला सुरुवात होणार आहे. या पत्रकार परिषदेला उदगीर विधानसभेचे माजी आमदार सुधाकर भालेराव, प्रदेश सरचिटणीस बसवराज पाटील नागराळकर, प्रदेश सरचिटणीस प्रा. शिवाजीराव मुळे, विधानसभा अध्यक्ष अजित पाटील, तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, तालुकाध्यक्ष नेमीचंद पाटील, शहराध्यक्ष अजीम दायमी, प्रदेश युवक कार्याध्यक्ष चंदन पाटील नागराळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# लातुरात १६, १७ ऑगस्टला सार्वजनिक भंडारा उत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १३ ऑगस्ट-**

लातूरच्या शिवछत्रपती मार्केट यार्डात प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही शनिवार, दि. १७ ऑगस्ट २०२४ रोजी श्री सार्वजनिक सत्यनारायण महापूजा-भंडारा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या ३० वर्षांपासून मार्केट यार्डातील सर्व संघटना व कृषी उत्पन्न बाजार समिती, लातूर यांच्या वतीने श्रावण महिन्यात हा उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा केला जातो. या उत्सवाचे औचित्य साधून शुक्रवार, दि. १६ ऑगस्ट रोजी रात्री आठ वाजता समाज प्रबोधनकार हभप. रुपाली सवणे यांचे कीर्तन होणार आहे. शनिवारी श्री सत्यनारायण महापूजा व महापूजेनंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. या सोहळ्याचा लातूर शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# जनसामान्यांच्या मदतीसाठी शिवसेनेची महिला आघाडी सरसावली

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. १३ ऑगस्ट-**

येथील तहसील कार्यालयातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी लागणारे रहिवाशी, उत्पन्न, जात, नान क्रिमिनल व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र तर शेतर्क्यांना भूमी प्रमाणपत्राची आवश्यकता असते. गेल्या एक महिन्यापासून ऑनलाईन प्रमाणपत्र देण्यासाठी साईटच चालत नसल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांची गैरसोय होत आहे . यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही . तसेच श्रावणबाळ व संजय गांधी निराधार योजनेतील लाभधारकांचे मंजुरी प्रमाणपत्र ऑफलाइन पद्धतीने तात्काळ देऊन विद्यार्थी , शेतकरी ,निराधार वयोवृध्दांचे होणारे नुकसान टाळावे. अशी मागणी शिवसेनेच्या महिला आघाडीच्या संघटिका जयश्री उटगे यांनी तहसिलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गेल्या महिनाभरापासून विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी लागणारी तहसिल कार्यालयाअंतर्गत प्रमाणपत्र सरोवर वारंवार डाऊन होत असल्याने वेळेत मिळत नाहीत. याचबरोबर शेतकऱ्यांना न्यायालयीन कामासाठी व शेजाऱ्यांचा वाद मिटविण्यासाठी लागणारी कागदपत्रे वेळेत मिळत नाहीत. तर श्रावण बाळ व संजय गांधी निराधार योजनेतील लाभधारकांना आनलाईन सेवा सुरळीत नसल्याने मंजुरी पत्र मिळत नाही .यासाठी ऑफलाइन पद्धतीने प्रमाणपत्राचे वाटप करण्यात यावे.




तीन वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झालेल्या शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्या कराव्यात. प्रभारी नियुक्तीच्या ठिकाणी कायम स्वरूपी अधिकारी, कर्मचारी यांची तात्काळ नियुक्ती करावी . आणि नगर परिषदेमध्ये बांधकाम व इतर कामगारांसाठी होत असलेली आर्थिक पिळवणूक थांबवावी. अशा सर्वसामान्यांच्या मागण्यांचे निवेदन शिवसेनेच्या महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका जयश्री ताई उटगे यांनी नूतन तहसीलदार घनशाम अडसुळ यांना दिले आहे. या निवेदनावर अशोक कुंभार, गोविंद खंडागळे, संजय उजळंबे, सुरेश भुरे, किरण कदम इत्यादींच्या सह्या आहेत.

# ‘आ. देशमुखांमुळेच लातूर ग्रामीणचा सर्वांगिण विकास’

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १३ ऑगस्ट-**

विकासरत्न विलासराव देशमुख यांच्या प्रेरणेने लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे क्रियाशील आमदार धिरज देशमुख यांनी आजपर्यंत लातूर ग्रामीणच्या विकासासाठी कोट्यावधी रुपयांचा निघी आणला आहे. या निधीतून रस्ते, पाणी, वीज, आरोग्याच्या सुविधा, शैक्षणिक सुविधा मोठया प्रमाणात निर्माण करता आल्या. आमदार धिरज देशमुख यांच्यामुळेच लातूर ग्रामीणचा सर्वांगिण विकास झाला आहे, असे प्रतिपादन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख यांनी केले.

लातूर तालूक्यातील निवळी व टाकळी (शि) येथे दि.१२ ऑगस्ट रोजी महिला बचतगटांचे मेळावे झाले.त्याप्रसंगी बचत गटाच्या महलांशी संवाद साधला श्रीमती



वैशाली देशमख बोलत होत्या. यावेळी रीड लातूरच्या संस्थापक दीपशिखा देशमुख यांच्यासह डॉ. सारीका देशमुख, सुनिता आरळीकर, दैवशाला राजमाने, सीमा क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. निवळी येथील निळकंटेश्वर मंदिरात दर्शन घेऊन येथील मंदिर सभाग्रहाचे भूमिपूजन देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर विशाल पाटील यांच्या निवासस्थानी महिला बचतगटाचा मेळावा घेण्यात आला. टाकळी (शि) येथील हनुमान मंदीरात बचत गटांचा महिला मेळावा झाला. वैशाली देशमुख म्हणाल्या की, गेल्या काही दिवसांपासून राज्य सरकारने लाडकी बहिनण योजना आणली आहे. पण त्यासाठी महिलांचे बॅंक खाते असणे गरजेचे आहे. त्यासाठी महिलांना आपल्या बॅंक खात्यात १५०० रूपये अगोदर जमा करावे लागत आहे. त्यामुळे या सरकारच्या भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन केले. लातूर ग्रामीणचे आमदार धीरज देशमुख हे लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमनही आहेत.त्यामुळे या बँकेच्या माध्यमातून त्यांनी महिलांकडून एक रुपायाही न घेता महिलांचे खाते जिल्हा बँकेमार्फत काढून देत आहेत. तसेच जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पाच लाखांपर्यंत बिनव्याजी कर्जाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. लातूर ग्रामीणच्या विकासाचा ध्यास घेतलेले आ. धिरज देशमुख यांना तमाम मतदारांनी पुन्हा संधी देऊन धीरज देशमुख यांच्या रुपाने आपल्या हक्काचा आमदार निवडूण आणावा, असे आवाहन केले. यावेळी मंगल पाटील, ठकुबाई शिंदे, वैजयंता जगदाळें, अमोल दिवटे, शंकर सगर, रंगनाथ माने, विशाल पाटील, हणमंत जगदाळे, संपतराव जाधव उपस्थित होते. तर टाकळी (शि) येथील महिला बचत गटाच्या मेळाव्यास महानंदा काळे, भागेक्षी शेटे, अनिता चव्हाण, कमल शेळके, विलास ढगे, अर्चना कदम, सुर्वणताई कुरकुटे, शिवकन्या दगडे, मंगल घाडके, सुदामती ढगे यांच्यासह रामराव ढगे, निळकंट बचाटे, श्रीनिवास पाटील, नंदकुमार पाटील, श्रीनीवास शेळके, संतोष दगडे आदी उपस्थित होते.

### जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना सदिच्छा भेट

तालूक्यातील निवळी व टाकळी (शि) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली देशमुख व रीड लातूरच्या संस्थापक दीपशिखा देशमुख यांनी भेट दिली. यावेळी दीपशिखा देशमुख म्हणाल्या की, आ. धीरज देशमुख यांनी आईसाहेब यांना आग्रह केला होता की, ग्रामिण भागातील तसेच शहरी भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पहिलीत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थांना इंग्रजी भाषा बोलता यावी. त्यामुळे रीड लातूर हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. त्यानंतर श्रीमती वैशालीताई देशमुख म्हणाल्या की, जगभरात वावरत असताना इंग्रजी बोलने आवश्यक आहे. इंग्रजी भाषा पहिलीपासून शिकवली तर ती लवकर अवगत होते. म्हणून हा रीड लातूरचा उपक्रम सुरु करण्यात आला आहे.